# एम.ए. भाग दोन

## मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक ८ :

# दलित साहित्य (वैकल्पिक)

मराठी साहित्य-संस्कृतिक्षेत्रात १९६० नंतरच्या दशकात दलित साहित्याची एक वाङ्मयीन व सामाजिक-सांस्कृतिक स्वरूपाची चळवळ सुरू झाली. या चळवळीतून निर्माण झालेल्या दलित साहित्याने मराठी साहित्यात मोलाची भर घातलेली आहे. अशा महत्त्वाच्या साहित्यप्रवाहाचा अभ्यास विद्यापीठीय स्तरावर होणे आवश्यक ठरते. या दृष्टीने दलित साहित्याची वाङ्मयीन व सामाजिक / सांस्कृतिक पार्श्वभूमी, दलित साहित्याची संकल्पना व स्वरूप, त्यातील विद्रोहाची जाणीव व तिचा साहित्यिक आविष्कार, या साहित्यप्रवाहातील विविध साहित्यप्रकार, तसेच या साहित्याचे व साहित्यिक चळवळीचे वाङ्मयीन व सामाजिक कार्य इत्यादी गोष्टींचा सुव्यवस्थित अभ्यास करणे, हे या अभ्यासविषयकपत्रिकेचे उद्दिष्ट आहे.

**विभाग : एक**

१) महाराष्ट्रातील दलित साहित्याच्या चळवळीची पार्श्वभूमी

अ) सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय परिस्थिती / वास्तव,

ब) दलितांच्या सामाजिक-राजकीय चळवळी
(आंबेडकरपूर्व, आंबेडकरी व आंबेडकरोत्तर)

क) दलित साहित्याची पूर्वपरंपरा

२) दलित साहित्याची चळवळ

अ) दलित साहित्याच्या चळवळीचे स्वरूप-राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक चळवळींशी असलेला अनुबंध.

ब) दलित साहित्याची संकल्पना-विविध भूमिका.

❖❖❖❖

# १

# महाराष्ट्रातील दलित साहित्याच्या चळवळीची पार्श्वभूमी

**उद्दिष्टे :**

१) महाराष्ट्रातील दलित साहित्याच्या चळवळीची पार्श्वभूमी समजावून घेणे.

२) त्या अनुषंगाने भारतीय जात व वर्ण यासंस्थांचे स्वरूप व तद्संबंधीचे विचार समजावून घेणे.

३) एकोणिसाव्या शतकातील राजकीय स्थित्यंतर आणि एकूणच महाराष्ट्रीय समाज जीवनात उमटलेले त्याचे पडसाद अभ्यासणे.

४) त्या अनुषंगाने तत्कालीन महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक इत्यादी परिस्थितीचा आढावा घेणे.

दलित साहित्य हा १९६० नंतर मराठी साहित्यात विकसित झालेला एक ठळक साहित्यप्रवाह आहे. १९६० नंतर ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य व स्त्रीवादी साहित्य हे प्रवाहही उदयास आले आहेत. या सर्व साहित्य प्रवाहांच्या मुळाशी असणाऱ्या प्रेरणा गेल्या शतकातील विविध सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय घडामोडींच्या आहेत आणि या सर्व साहित्यप्रवाहांच्या मुळाशी शोषणाधिष्ठित समाजरचना नष्ट झाली पाहिजे, हे समान सूत्र आहे. म्हणूनच सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्धचा आवाज उठविणारे साहित्य या प्रवाहांतून निर्माण झालेले दिसते.

वरील प्रवाहांपैकी दलित चळवळीतून निर्माण झालेल्या व दलित चळवळीसाठी लिहिल्या गेलेल्या दलित साहित्याने मराठी साहित्यात मोलाची भर घातलेली आहे. दलित साहित्य प्रवाहाचा विचार करताना महाराष्ट्रातील दलित साहित्याच्या चळवळीची पार्श्वभूमी समजावून घेणे आवश्यक आहे. ही पार्श्वभूमी समजावून घेताना सर्वात प्रथम भारतीय 'जात' व 'वर्ण' या संस्थाचा परिचय करून घेणे गरजेचे आहे. तसेच एकोणिसाव्या शतकातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीचा आढावा घेता येईल. आणि त्या अनुषंगाने एकोणिसाव्या शतकात सुरू झालेल्या परिवर्तनवादी चळवळींचे स्वरूप समजावून घेता येईल.

महाराष्ट्रातील दलित चळवळीची पार्श्वभूमी समजून घेताना भारतीय जात व वर्ण या संस्थांचा थोडक्यात ऐतिहासिक मागोवा घेणे आवश्यक ठरेल. मराठीतील जात व वर्ण या शब्दासाठी इंग्रजीत 'कास्ट' हा शब्द वापरला जातो. मात्र वर्ण व जात या वेगळ्या संस्था असून जातिसंस्था ही वर्णसंस्थेच्या पोटी जन्माला आली आहे. मानव समाजाच्या आद्यावस्थेत पहिला अवयवी, गणसमाज स्त्रीने जन्माला घातला. महाभारतामध्ये या

समाजाचा 'स्त्रीराज्य' असा उल्लेख केलेला आढळतो. या समाजात आर्थिक विषमता नव्हती. परिणामी हा समाज वर्गविरहित होता. ऋग्वेदातील आद्य वर्णव्यवस्था द्वैवर्ण्य होती. ही संस्था सिंधूसंस्कृतीच्या स्त्रीसत्ताक समाजव्यवस्थेत जन्माला आली. म्हणून ती आर्यपूर्व होती. पुढे पशुपालन व शेती हे दोन्ही व्यवसाय पुरुषांच्या हाती गेले आणि राज्य व मालमत्तेचा वारसा मातृवंशातील पुरुषाकडे आला. याकाळात युद्धजित परगणीयांना शेतीकामासाठी दास बनविले जाई. यातून दासवर्ण अस्तित्वात आला. या दासदासींची खरेदी-विक्री स्वामीगणाच्या जत्रेत वा यज्ञोत्सवात गुरांप्रमाणे होत होती. या काळची क्षत्रिय, ब्राह्मण व दास ही त्रैवर्ण व्यवस्था मातृवंशकतेवर उभी होती. यामध्ये मातेचा जो वर्ण तोच वर्ण तिच्या अपत्यांचाही असायचा. या मातृवंशक दासांच्या श्रमांवर मोहोजदडो-हडप्पाची नागर संस्कृती उभी राहिली आहे.

आर्य हे पशुपालक होते. तसेच ते पितृवंशक होते. 'वैश्य' हा वर्ण आर्यांनी जन्माला घातला. त्यांनी प्रथम सरस्वती तीरावरील शूद्र गणांना जिंकून गुलाम केले. म्हणून आर्यांच्या वर्णव्यवस्थेत 'दासा'ऐवजी चौथा 'शूद्र' वर्ण रूढ झाला. पितृवंशक चातुर्वर्ण्यव्यवस्था अशा प्रकारे उदयाला आली. या चातुर्वर्ण्यव्यवस्थेमध्ये दासशूद्रांना उपनयनाचा अधिकार नव्हता. कारण उपनयन झालेल्या स्वामीगणीयाला सर्व गणाधिकार प्राप्त होत असत. तो जनपदाचा एक स्वामी बने. यामुळेच या वर्णधर्माचे उल्लंघन हा सर्वात मोठा गुन्हा मानला जात होता. हा गुन्हा करणाऱ्यांना प्राणदंड दिला जाई. परमसहिष्णु भासणारा (वैदिक वा नववैदिक वा) हिंदुधर्म हा राजधर्म किंवा वर्णजातिधर्म किंवा स्त्रीधर्म यांचे उल्लंघन होताच मात्र असहिष्णुतापूर्ण वर्तन करताना दिसतो.

महाभारतीय युद्धातून राजर्षिसत्ता कमजोर झाल्या आणि संघगण उदयाला आले. पुढे बुद्धकाळात त्याच्या नेतृत्वाखाली भारतात सामंतप्रथाक क्रांती होऊन दासप्रथाक श्रमाची जागा निमस्वतंत्र सामंतप्रथाक श्रमाने घेतली. म्हणजेच वर्णव्यवस्थेची जागा जातिव्यवस्थेने घेतली. पण वर्णव्यवस्थेची चौकट मात्र तिने कायम ठेवली. म्हणून 'अस्पृश्यता' ही सामंतप्रथेतून अवतरली, असे म्हणता येईल.

वर्णव्यवस्थेमध्ये तत्त्वत: सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक सत्तेची तीन वर्गांमध्ये विभागणी झालेली होती. शूद्रांच्या व अतिशूद्रांच्या वाट्याला मात्र सेवेचीच कामगिरी आली होती. अस्पृश्यांचे जिणे अत्यंत हीन व अपमानास्पद असे होते. गावाबाहेरील वेगळी वस्ती, शिक्षणाचा अभाव, बलुत्यांवरील निर्वाह आणि पुनर्जन्म, प्रारब्ध इत्यादी कल्पनांवरील दृढ विश्वास यांमुळे या अन्यायाविरुद्ध बंड करण्याचा विचारही त्यांच्या मनाला शिवणे शक्य नव्हते. तेराव्या शतकानंतर महाराष्ट्रात जे भक्तिमार्गी पंथ उदयाला आले त्यांच्या कार्यामधून शूद्रातिशूद्रांच्या आध्यात्मिक उत्कर्षाचा मार्ग काहीसा मोकळा झाला. मात्र वारकरी चळवळीची सुधारणा धार्मिक क्षेत्रापुरती मर्यादित होती. जन्मसिद्ध जातिव्यवस्थेवर किंवा परंपरागत आचार-विचारांवर संतांनी आघात केले नाहीत असे नाही परंतु ते सर्वार्थाने समाजात खोलवर झिरपले नाहीत. त्यामुळे या संप्रदायामध्ये शूद्रातिशूद्रांना आत्मोद्धाराची

संधी मिळाली पण त्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीमध्ये कोणताही बदल झाला नाही. पुढील शिवशाहीच्या कालखंडामध्ये सर्व जातींच्या लोकांना लष्करात सामावून घेण्यात आले. अस्पृश्यांची स्वतंत्र पथकेही स्थापन झाली. आणि तत्कालीन लढायांमध्ये त्यांना इतरांच्याबरोबरीने पराक्रमही गाजविले. पुढे पेशवाईच्या कालखंडात राज्यकारभारामध्ये कर्मठ विचारांच्या राज्यकर्त्यांचे वर्चस्व आले. साहाजिकच लढायांमध्ये अस्पृश्यांनी गाजविलेली मुर्दुमकी सामाजिक विषमता कमी होण्यास कामी आली नाही.

### ब्रिटीश राजवटीची भूमिका

ब्रिटीश साम्राज्यशाहीने भारत जिंकल्यानंतर त्यांनी एका बाजूला भारताच्या काही भागात कायमधारापद्धती व उरलेल्या भागात रयतवारीपद्धती लागू केली. यांतून त्यांनी युरोपीय सामंतप्रथेचे मालमत्तासंबंध लादले आणि मर्यादित स्वरूपात विकास करून निमभांडवली वर्गसंबंध आणले. या नव्या निमसरंजामी वर्गसंबंधांच्या जोडीला भारतीय सामंतप्रथाक जातिव्यवस्था निमसामंती स्वरूपात कायम राहिली. अशा प्रकारे वसाहतिक राजवटीत वर्गजातियुक्त असा द्वैती निमसरंजामी समाज अस्तित्वात आला.

इंग्रजी शासनव्यवस्थेत कायद्याचे राज्य, व्यक्तिगत जबाबदारी ही तत्त्वे अंतर्भूत होती. परंतु येथील धार्मिक व सामाजिक व्यवस्थेत आपण ढवळाढवळ करणार नाही असे इंग्रज राज्यकर्त्यांनी येथील जनतेला आश्वासन दिले होते. म्हणून अस्पृश्यतेसारख्या रूढीची अन्याय्यता पटत असूनही इंग्रजांनी ती नाहीशी करण्याचा प्रयत्न केला नाही. याचबरोबरीने स्वहित सांभाळण्यासाठी वरिष्ठ वर्गांना न दुखविणे हे धोरण त्यांनी अवलंबिले. जुन्या शासनपद्धतीत पाटील, कुलकर्णी व महार हे गावाचे वतनी कामगार होते. इंग्रजांनी आपल्या राज्यशासनाच्या सोयीसाठी पाटील-कुलकर्ण्यांच्या वतनाचे नक्त नेमणुकांत रूपांतर केले. त्यांना आपल्या पगारी नोकरवर्गात सामील करून घेतले. पण याचवेळी महाराचे बलुते मात्र त्यांनी कायम ठेवले. त्यामुळे मध्ययुगीन बंधनांतून महारांची मुक्तता होऊ शकली नाही.

अव्वल इंग्रजी कालखंडात भारतात प्रबोधनाचे युग आले. या काळात अर्वाचीन महाराष्ट्रातील जातिविषयक चिंतनास आरंभ झालेला दिसतो. या काळात जातिमीमांसेचे तीन संप्रदाय दिसतात. ते म्हणजे ब्राह्मणी, अब्राह्मणी आणि मार्क्सवादी. भारतीय विचारदर्शनातील पारंपरिक संघर्ष ब्राह्मणीवाद विरुद्ध अब्राह्मणीवाद असा होता. म्हणून महाराष्ट्रातील जातिविषयक विचार करताना हा संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे.

ब्राह्मणी परंपरेतील जातिमीमांसा – प्रबोधनकालीन समाज चिकित्सेवर ब्राह्मणी संस्कृतीचा ठसा उमटलेला आहे. बाळशास्त्री जांभेकर, गंगाधरशास्त्री फडके, विष्णुबुवा ब्रह्मचारी, भाऊ महाजन, लोकहितवादी या प्रबोधनकालीन विचारवंतांपासून ही अर्वाचीन ब्राह्मणी परंपरा सुरू होते. जातिविषयक प्रश्नांसंबंधी, जातिसंस्थेच्या इष्टनिष्टतेसंबंधी सुरू झालेल्या चर्चेत पहिल्यापासून ब्राह्मणवर्ग आघाडीवर असलेला दिसतो. मात्र यांच्यात

सुरुवातीपासून दोन प्रमुख गट दिसून येतात. यातील एक गट जातिसंस्थेचे समर्थन करणारा आहे. तर दुसरा गट जातिसंस्थेतील दोष स्पष्ट करून त्यामध्ये सुधारणा अपेक्षिणारा आहे. या काळात गंगाधरशास्त्री फडक्यांसारख्या व्यक्तींनी जातिसंस्थेचे समर्थन केलेले दिसते. 'हिंदुधर्मतत्त्व' (१८५२) या पुस्तकामध्ये 'जातिभेद हे ईश्वरी संकेतानुसार निर्माण झाले असून ते पाळण्यात कोणताच वाईटपणा नाही' असे गंगाधरशास्त्री फडके यांनी म्हटले आहे. विष्णुबुवा ब्रह्मचारी 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंधा'तून समाजवादसदृश विचार मांडतात पण 'वेदोक्त धर्मप्रकाश' या पुस्तकात कर्मानुसार व्यक्तींमध्ये जेष्ठ-कनिष्ठता कशी ठरवायची या प्रश्नाला टाळताना दिसतात. त्यांची ही कृती जातिबद्ध समाजरचना व्यक्तीविचाराला कशी मर्यादित करते, यांवर प्रकाश टाकते.

जातिव्यवस्थेतील दोष दर्शविणारे विचार दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, राजारामशास्त्री भागवत यांसारख्या सुधारकांनी मांडलेले दिसतात. सुधारकांचा हा संप्रदाय राष्ट्रवादी चळवळींवर जहालाचे वर्चस्व प्रस्थापित होईपर्यंत बराच क्रियाशील दिसतो. यामध्ये लोकहितवादी व राजारामशास्त्री भागवत यांचे विचार विशेष महत्त्वाचे आहेत. लोकहितवादींनी आपले विचार शतपत्रांतून मांडले. शतपत्रांतून त्यांनी चातुर्वर्ण्यजन्य विषमतेवर प्रथम टीका केली. त्यांच्या पत्रांतून व्यक्त झालेली समाजपरिवर्तनाची निकड डॉ. आंबेडकरांना स्वागतार्ह वाटली. लोकहितवादींची पत्रे आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारता'तून क्रमश: प्रसिद्ध केली. असे असले तरी जातीच्या प्रश्नासंबंधीच्या त्यांच्या आकलनास व चिंतनास एक प्रकारची ब्राह्मणी विचारांची मर्यादा होती, असे म्हणावे लागेल. कारण हिंदू समाजाची प्रगती किंवा अधोगती मोजण्याचा त्यांचा मानदंड ब्राह्मणवर्गच होता, असे दिसते.

यानंतर न्या० महादेव गोविंद रानडे व त्यांचे उदारमतवादी सहकारी यांनी परंपरागत अन्याय व अमानुष रूढी नाहीशा करण्यासाठी समाजाची विवेकबुद्धी जागृत करण्यावर भर दिला. गोपाळ गणेश आगरकर यांनी पूर्णपणे बुद्धिवादी कसोट्यांचा आग्रह धरून सामाजिक रूढींवर प्रहार केले त्यांनी विवेकाधिष्ठित व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. जातिव्यवस्थेच्या संदर्भात राजारामशास्त्री भागवत यांनी केलेले तत्त्वचिंतन लक्षात घ्यायला हवे. राजारामशास्त्री भागवत यांच्यामते महाराष्ट्रात जाती अजिबात नव्हत्या. जैनांचा महाराष्ट्रात प्रवेश झाल्यावर जाती निर्माण झाल्या. याकरिता त्यांनी भाषाशास्त्र, व्युत्पत्तिशास्त्र, इतिहासशास्त्र इत्यादी शास्त्रांचा आधार घेऊन विश्लेषण केले आहे. वेदकालीन वर्णव्यवस्था, तिचे बदलते स्वरूप, बौद्ध व जैन धर्मांचा वर्णव्यवस्थेवर झालेला परिणाम, महाराष्ट्रातील मध्ययुगीन जातिव्यवस्थेचे स्वरूप इत्यादी विषयांवर त्यांनी सखोल, व्यासंगी विवेचन केले आहे. मात्र जातिव्यवस्थेच्या आर्थिक पायाकडे लक्ष देणे गरजेचे आहे असे त्यांना वाटलेले दिसत नाही.

जातिव्यवस्थेमुळे सामाजिक ऐक्यास बाधा पोचते, सामाजिक ताण-तणाव वाढतात यापलिकडे जाऊन ही व्यवस्था माणसांचे / व्यक्तींचे प्रचंड शोषण करणारी व्यवस्था आहे, म्हणून तिचा विचार तिच्या शोषणप्रधान स्वरूपाच्या परिघात केला पाहिजे, असा विचार ब्राह्मणी परंपरेतील विचारवंतांना करावासा वाटलेला नाही. या परंपरेतून निर्माण झालेल्या जातिमीमांसेची ही मोठी मर्यादा मानावी लागते.

ब्रिटीश राजवटीत वर्गीय समाज उदयास आला. नवशिक्षित, मध्यमवर्गीय वर्गाच्या हितसंबंधांचे संरक्षण होण्याच्या निकडीतून राष्ट्रवादी तत्त्वज्ञान उदयास आले. ही राष्ट्रवादी विचारसरणी निश्चितच प्रागतिक होती. पण परंपरागत जातिबद्ध समाजरचनेच्या संदर्भात मात्र ती प्रतिगामी ठरली. कारण जातिनिर्मूलनाचा प्रागतिक विचार उच्च जातियांच्या हितसंबंधांना सुरूंग लावणारा असल्याने या परंपरेतील मीमांसकांकडून जातिसंस्थेची फक्त मीमांसा झाली, निर्मूलन होऊ शकले नाही. म्हणूनच राजवाडे, केतकर, सावरकर, श्री० म० माटे ही सर्वच मंडळी जातिसंस्था व तिच्याशी निगडीत असलेल्या प्रश्नांचा विचार हा मुख्यत्वे हिंदुराष्ट्रवादाच्या संदर्भातच करताना दिसतात. किंबहुना राजवाड्यांसारख्या निर्भिड इतिहास संशोधकालाही ब्राह्मणी जातीयतेच्या मर्यादा ओलांडता आल्या नाहीत. ही अर्वाचीन जातिमीमांसेला पडलेली ब्राह्मणी मर्यादा होती. मात्र वरील मंडळींच्या कार्यातूनच पुढे श्री० गो० स० घुर्ये किंवा श्रीमती इरावती कर्वे यांच्या कार्याला चालना मिळाली. हे या मंडळींचे योगदान सांगता येईल.

प्रबोधन काळामध्ये अर्वाचीन महाराष्ट्रात जातिसंस्थेविषयी जे विचारमंथन झाले त्यात ब्राह्मणी विचारवंतांबरोबरच अब्राह्मणी विचारवंतांनीही आपले जातिसंस्थेविरोधी विचार सातत्याने मांडलेले दिसतात. या संदर्भात तुकाराम तात्या पडवळ यांनी 'एक हिंदू' या टोपणनावाने लिहिलेले 'जातिभेदविवेकसार' (१८६१) आणि सीदोबा बापूजी मिसाळ यांनी लिहिलेले 'जातिभेदावर संभाषण' (१८७०) या पुस्तकांचा उल्लेख करता येईल. मात्र अर्वाचीन महाराष्ट्रातील अब्राह्मणी विचारपरंपरा आत्मनिर्भर झाली ती महात्मा जोतिबा फुले यांच्या क्रांतिकारक विचारांतूनच. महात्मा फुले यांनी 'ब्राह्मणाचे कसब' (१८६६), 'गुलामगिरी' (१८७३) या पुस्तकांतून वर्ण-जातींसंदर्भात विचार मांडले आहेत. त्यांच्या मते वर्ण-जातींचा इतिहास हा शूद्रातिशूद्रांच्या शोषणाचाच इतिहास आहे. वर्णसंस्था आणि जातिसंस्था या शोषणाधिष्ठित संस्था असून त्यांचा संपूर्ण बीमोड झाला नाही तर न्यायाधिष्ठित, समताधिष्ठित समाजाची निर्मिती असंभवनीय आहे, असे महात्मा फुले यांचे स्पष्ट मत होते. म्हणून महात्मा फुले यांना अब्राह्मणी परंपरेचे मूलस्रोत मानावे लागते. महात्मा फुले यांच्यापासून सुरू झालेली ही अब्राह्मणी जातिमीमांसा महर्षी वि० रा० शिंदे, राजर्षी शाहू छत्रपती, डॉ० बाबासाहेब आंबेडकर व धर्मानंद कोसंबी यांच्यापर्यंत विकसित झालेली दिसते. मात्र या परंपरेत महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि नंतर डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जेवढा गौरव झाला तेवढा महर्षी वि० रा० शिंदे यांच्या विचारांचा झाला नाही. कारण महर्षी शिंदे प्रार्थनासमाजवादी होते आणि त्यांनी राष्ट्रीय पक्षाशी व गांधीवाद्यांशी सहकार्य केले होते.

महर्षी वि० रा० शिंदे यांच्या कार्याच्या मुळाशी महाराष्ट्रातील विद्रोही भक्तिचळवळीची प्रेरणा होती. किंबहुना अर्वाचीन अब्राह्मणी परंपरेचे स्फूर्तिस्थान ही भक्तिचळवळच होती असे म्हणता येते. भारतातील पारंपरिक वैचारिक संघर्ष ब्राह्मणी परंपरा व अब्राह्मणी परंपरा यांमध्ये अडकलेला होता. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळ जर केवळ ब्राह्मणविरोधाच्या नकारात्मक राजकारणात अडकून पडली तर समाजपरिवर्तनाच्या चक्राची गती रूद्ध होईल व पर्यायाने दलितांचा प्रश्न पुढे ढकलला जाईल याची भीती महर्षी शिंदे यांना वाटत होती. विनाकारण अस्पृश्य मानलेल्या या समाजघटकास कोणताच अस्पृश्यतेतर समाजघटक राजकारणामध्ये घेण्यास तयार होणार नाही, या गोष्टीची महर्षी शिंदे यांना खंत वाटत होती. म्हणूनच जातवार प्रतिनिधित्वाच्या विरोधी भूमिका घेणारे महर्षी शिंदे दलितांसाठी मात्र राखीव जागांचा आग्रह धरताना दिसतात. तसेच दलितांचा विद्रोह हा अखेरीस अब्राह्मणी परंपरेतूनच निर्माण होणार आहे, पण यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न झाले पाहिजेत याचीही जाणीव महर्षी शिंदे यांना होती.

ब्रिटीशांच्या आगमनानंतर भारतात जे वर्गीय स्थित्यंतर झाले त्याचे भानही महर्षी शिंदे यांना होते. म्हणूनच ते एकाबाजूला अस्पृश्यांना राखीव प्रतिनिधित्व देण्यासाठी आग्रह धरतात तर दुसऱ्या बाजूला वर्गीय संघटना बांधण्याची गरज प्रतिपादितात. म्हणजेच वसाहतकाळामध्ये जाती वर्गग्रस्त व वर्ग जातिग्रस्त होण्याची प्रक्रिया महर्षी शिंदे यांना स्पष्ट जाणवली होती. म्हणूनच त्यांनी जातिविमोचनाला व वर्गीय संघर्षाला सारखेच महत्त्व दिले. वर्ग-जातिनिर्मूलनासाठी संयुक्त आघाडी असावी हा महर्षी वि० रा० शिंदे यांचा विचार महत्त्वाचा मानावा लागतो.

महर्षी वि० रा० शिंदे यांच्याप्रमाणे अब्राह्मणी जातिमीमांसेच्या संदर्भात श्री० धर्मानंद कोसंबी यांचे तत्त्वचिंतन मोलाचे आहे. कोसंबी यांनी संस्कृत, बौद्ध, जैन, पारसी इत्यादी साहित्याचा आधार घेऊन ब्राह्मणी जातिमीमांसेच्या सिद्धान्तांपुढे आव्हान उभे केले. कोसंबींच्या विचारमीमांसेवर अब्राह्मणवादाबरोबरच मार्क्सवादी विचारसरणीचाही प्रभाव आढळतो. जातिभेद नष्ट होण्यासाठी समाजरचना बदलण्याची, कुटुंबसंस्था बदलाची गरज आहेच. पण त्याहीपेक्षा अधिक माणसाच्या मनोवृत्तीत आमूलाग्र बदल झाला पाहिजे असे ते सांगतात. असे परिवर्तन घडवून आणण्यासाठी योग्य अशी दिशा मार्क्सवादातून मिळेल असा त्यांना विश्वास वाटत होता. समाजवादाला अहिंसेची जोड मिळाली तरच मानवजातीचे कल्याण होईल असे त्यांना मनापासून वाटत होते.

महात्मा जोतिबा फुल्यांपासून सुरू झालेली जातिमीमांसेची अब्राह्मणी परंपरा विसाव्या शतकाच्या आरंभी महर्षी वि० रा० शिंदे, धर्मानंद कोसंबी यांनी खूप सकस बनविली आणि या परंपरेतूनच पुढे डॉ. आंबेडकरांचा जातिव्यवस्थाविरोधी विद्रोही विचार आक्रमक स्वरूपात उदयास आला. जातिव्यवस्था ही शोषणाची यंत्रणा आहे. तिच्या दृढीकरणास येथील हिंदूधर्म कारणीभूत आहे. भारतातील आर्थिक विषमतेस व सामाजिक शोषणास इथली जातिव्यवस्थाच जबाबदार असल्याने जातिव्यवस्थेचे निर्मूलन

झाल्याशिवाय भारतात खऱ्या अर्थाने लोकशाही नांदणार नाही असे डॉ० आंबेडकर यांचे म्हणणे होते. आंबेडकरांच्या जातिविषयक विचारांवर श्री० व्यं० केतकर व इतिहासाचार्य वि० का० राजवाडे यांच्या संशोधनाचा प्रभाव दिसतो. जातीची श्री. व्यं. केतकरांनी केलेली व्याख्या आंबेडकरांनी मान्य केली होती. फक्त जातीचे जन्मजात सदस्यत्व व जातीबाहेर बेटीव्यवहारास बंदी या जातीच्या दोन शर्ती केतकर सांगतात ते डॉ. आंबेडकरांना मान्य नाही. त्यांच्या मते या दोन्ही एकच नसून एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यातून जातिनिर्मूलनाचा प्रभावी मार्ग म्हणून ते आंतरजातीय विवाहाकडे पाहातात. जातिवादी समाजरचनेमध्ये दलितांच्या सामाजिक न्याय्य हक्कांसोबतच त्यांचे न्याय्य आर्थिक हितसंबंधही नेहमीच डावलले गेले. त्यांना आर्थिक विकासाची संधी नाकारली गेली. जातिबद्ध समाजरचनेत दलितांचा उत्कर्ष होणार नाही हे डॉ० आंबेडकरांनी जाणले. म्हणून एका बाजूला राखीव मतदारसंघ, राखीव प्रतिनिधित्व, आर्थिक व राजकीय सवलती यांचा पुरस्कार करीत डॉ० आंबेडकर आपल्या जातिनिर्मूलन लढ्याची व्यूहरचना करताना दिसतात. आंबेडकरांपर्यंत येऊन पोहोचलेली ही अब्राह्मणी जातिमीमांसा पुढे विकसित केली ती मार्क्सवादी विचारवंत श्री० शरद पाटील यांनी होय.

जातिमीमांसेची ही अब्राह्मणी परंपरा ब्राह्मणी परंपरेहून सर्वार्थाने भिन्न आहे. ब्राह्मणी परंपरेतील जातिमीमांसेला या अब्राह्मणी परंपरेने संघर्षवादी, परिवर्तनवादी बनविले असे म्हणता येईल.

### जातिसंस्थेची मार्क्सवादी मीमंसा

अर्वाचीन महाराष्ट्रातील जातिमीमांसेला सर्वात शास्त्रशुद्ध बैठक देण्याचा प्रयत्न मार्क्सवादी विचारवंतांनी केला. विशेषत: इ.स. १९१७ मधील रशियन राज्यक्रांतीनंतर मार्क्सवादी विचारसरणीने भारतात मूळ धरावयास सुरुवात केली. महाराष्ट्रात वर्ण-जातिव्यवस्थेचा मार्क्सवादी दृष्टिकोनातून पहिला विचार श्री. श्रीपाद अमृत डांगे यांनी केला. त्यांच्यानंतर गं. बा. सरदार, नलिनी पंडित, दामोदर कोसंबी इत्यादींनी आपल्या लेखनाद्वारे जातिव्यवस्थेचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र जातिसंस्थेची मार्क्सवादी मीमांसा अधिक सकस, समृद्ध करण्याचे पहिले श्रेय दामोदर कोसंबी यांनाच द्यावे लागते.

अर्वाचीन महाराष्ट्रातील जातिमीमांसकांच्या मार्क्सवादी संप्रदायामध्ये मुख्यत्वे तीन विचारप्रवाह दिसून येतात. १) पारंपरिक मार्क्सवादी विचारप्रवाह, २) अपारंपरिक मार्क्सवादी विचारप्रवाह, ३) मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवादी विचारप्रवाह. यांपैकी पारंपरिक मार्क्सवादी विचारप्रवाहानुसार जात ही सरंजामी किंवा सामंतप्रथाक वर्गसमाजाची ऊर्ध्ववास्तू आहे. त्यामुळे वर्गीयसमाजामध्ये उत्पादन व्यवस्थेत आमूलाग्र बदल होताच वर्गीय क्रांती होईल व या क्रांतीमध्ये जुन्या उत्पादन संबंधांवर आधारित असलेली उर्ध्ववास्तू आपोआप नष्ट होईल. थोडक्यात भारतातील सामंतप्रथाक व्यवस्थेला शह देणारी भांडवलशाही क्रांती झाली की जातिव्यवस्थेची इमारत कोसळेल असे या मीमांसेचे सार आहे. पारंपरिक मार्क्सवादी विचारसरणीतील उणीवा सर्वात प्रथम श्रीमती नलिनी

पंडित यांनी दाखवून दिल्या. इ.स. १९६५ साली लिहिलेल्या 'जातिवाद आणि वर्गवाद' या पुस्तकामध्ये त्या जात व वर्ग या संस्थांची सुस्पष्ट मार्क्सवादी मीमांसा करतात.

जात आणि वर्ग या दोन अगदी स्वतंत्र कल्पना आहेत असे त्या सांगतात. आणि युरोपीय वर्गवादी भूमिकेतून जातिसंस्थेकडे पाहाताना येणाऱ्या अडचणींची मीमांसाही करतात.

वर्ग-जातीलढ्यासंबंधीचा युवक क्रांतिदलाचा नवा विचार म्हणून श्री. एस. जी. सरदेसाई यांच्या 'क्लास स्ट्रगल ॲण्ड कास्ट कॉन्फ्लिक्ट इन रूरल इंडिया' या पुस्तकाची नोंद करावी लागते. या पुस्तकात औद्योगिकीकरणाच्या आणि आर्थिक प्रश्नावरील जनआंदोलनाच्या प्रक्रियेत जातीय भेद कालांतराने मावळतील. हा विचार अव्यवहारी आहे असे स्पष्ट शब्दात सरदेसाईंनी आत्मपरीक्षण केले आहे. मार्क्सवाद्यांना आलेले जातिविषयक नवे भान लक्षणीय मानवे लागते.

पारंपरिक मार्क्सवादी विचारसरणीच्या पार्श्वभूमीवर श्रीमती गेल ओमव्हेट अपारंपरिक मार्क्सवादी दृष्टिकोनातून जातिसंदर्भात विश्लेषण करतात. 'जातिव्यवस्था व भारतीय समाजक्रांती' या विषयावरील सत्यशोधक मार्क्सवादी मासिकाने सुरू केलेल्या चर्चेत गेल ऑमव्हेट यांचे तीन लेख १९८२ मध्ये प्रसिद्ध झाले आहेत. त्यात त्यांनी जातीचे विवेचन करताना म्हटले आहे, 'जात ही नातेगोतेसंबंध (जात्यंतर्गत विवाह) हा गाभा असलेली विशिष्टभूत अशी सामाजिक संस्था (फेनोमेनन) आहे. नातेगोतेसंबंध व कुटुंब हे ऊर्ध्ववास्तूचा भाग असल्याने जात ही एक ऊर्ध्ववास्तू ठरते. त्यांच्या मते ऊर्ध्ववास्तू ही एकजिनसी वास्तू नसून ती एक व्यापक कल्पना आहे. यात शासनसंस्था, धर्म, विचारसरणी इत्यादींचा समावेश करता येतो. म्हणून जात ही केवळ सरंजामशाही वर्गाची ऊर्ध्ववास्तू नाही. त्यांचा हा विचार पारंपरिक मार्क्सवादी विचारसरणीतील भौतिकवादाला आव्हान देणारा आहे.

जातिसंस्थेची वर्ग-जातिवादी किंवा मार्क्स-फुले-आंबेडकरवादी मीमांसा श्री. शरद पाटील यांनी केली आहे. श्री. शरद पाटील यांनी 'दासशूद्रांची गुलामगिरी' या द्विखंडीय ग्रंथामध्ये वर्ण, जातिव्यवस्थेच्या उदय, विकासाची सखोल चर्चा केली आहे. त्यांच्या मते जातिव्यवस्था ही उत्पादनसंबंधांच्या विकसनातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. आद्य भारतीय समाज हा स्त्रीसत्तावादी होता. या स्त्रीसत्तेच्या पोटी आद्य द्वैवर्ण्यव्यवस्था पुढे मातृवंशिकतेवर उभी असलेली त्रैवर्ण्यव्यवस्था, पितृवंशकेतच्या पोटी आलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था व या वर्णव्यवस्थेतूनच पुढे जातिव्यवस्था, अशा क्रमाने भारतातील वर्ण-जातिव्यवस्थेचा विकास झाला आहे. ब्रिटिश वसाहतवाद येण्यापूर्वी भारतात 'वर्ग' ही संस्थाच नव्हती. वासाहतिक काळात येथे वर्गाचा उदय झाला असे ते सांगतात. जातिसंस्थेच्या मार्क्सवादी संप्रदायातील हा सर्वात अलीकडचा विचारप्रवाह आहे.

❖❖❖❖

# २

# दलितांच्या सामाजिक-राजकीय चळवळी (आंबेडकरपूर्व, आंबेडकरी व आंबेडकरोत्तर)

उद्दिष्ट्ये :

१) दलितांच्या सामाजिक-राजकीय चळवळी समजावून घेणे.

२) या अनुषंगाने दलित चळवळीचा आंबेडकरपूर्व, आंबेडकरी व आंबेडकरोत्तर असा चढत्या क्रमाने परिचय करून घेणे.

३) आंबेडकरपूर्व दलितांच्या सामाजिक-राजकीय चळवळींचा आढावा घेणे. इत्यादी कार्याचे स्वरूप अभ्यासणे.

४) आंबेडकरी चळवळीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय व सामाजिक, शैक्षणिक इत्यादी कार्यकर्तृत्वाचा परिचय करून घेणे.

५) आंबेडकरोत्तर चळवळीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महानिर्वाणानंतरच्या दलित चळवळीचे स्वरूप व आजची दलित चळवळ यांचे स्वरूप अभ्यासणे.

६) एकविसाव्या शतकातील जागतिकीकरण व या जागतिकीकरण प्रक्रियेचा दलित चळवळीवर झालेला परिणाम थोडक्यात समजावून घेणे.

दलितांच्या सामाजिक-राजकीय चळवळींचे स्वरूप समजावून घेताना या चळवळींची विभागणी तीन टप्प्यांत करावी लागते. १) आंबेडकरपूर्व चळवळी व त्यांचे स्वरूप, २) आंबेडकरी चळवळ व त्याचे स्वरूप व ३) आंबेडकरोत्तर चळवळ व त्यांचे स्वरूप या तीन टप्प्यांचा थोडक्यात पुढीलप्रमाणे विचार करता येईल.

## डॉ० बाबासाहेब आंबेडकरपूर्व चळवळी व त्यांचे स्वरूप

महात्मा जोतिबा फुले यांच्या चळवळीमुळे प्रथमच बहुजन समाज सामाजिक समतेच्या प्रक्रियेत सामील झाला आणि पुढील काळात त्यात पूर्वाश्रमीचा अस्पृश्य वर्गही दाखल झाला. या काळातील चळवळी प्राथमिक स्वरूपाच्या व मर्यादित असल्या तरी त्यामागील विचार भक्कम असाच आहे. गोपाळबुवा कृष्णा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बंदसोडे पाटील, गणेश आकाजी गवई इत्यादींचे, या काळातील कार्य पुढील काळातील दलित चळवळीच्या दृष्टीने मोलाचे असेच आहे. म्हणून त्यांच्या कार्याचा थोडक्यात परिचय करून घेणे आवश्यक आहे.

गोपाळबाबा वलंगकर यांच्या कार्यापासून अस्पृश्यांच्या आत्मोद्धाराच्या चळवळींचा प्रारंभ झाला. गोपाळबाबा वलंगकर सैन्यात होते. १८८६ला त्यांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. सैन्यातून निवृत्त झाल्यावर ते महात्मा जोतिबा फुले यांच्या सहवासात आले. महात्मा फुले यांच्या विचारसरणीचा त्यांच्यावर प्रभाव पडला. यामुळे गोपाळबाबा वलंगकरही समाजव्यवस्था, रूढी-परंपरा, जातिभेद, स्त्रियांचे प्रश्न यांकडे सहानुभूतीनेच केवळ नव्हे परिवर्तनवादी दृष्टीने पाहावयास शिकले.

गोपाळबाबा वलंगकर यांचा कालखंड एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धाचा कालखंड आहे. या कालखंडात स्वराज्यवादी चळवळींचा प्रभाव मोठा होता. अशा परिस्थितीत सामाजिक व तेही अस्पृश्यांच्या जागृतीचे प्रश्न मांडणे, हे कठीण काम होते. गोपाळबाबा वलंगकर यांनी हे कार्य केले हे विशेष होय. याकरिता त्यांनी दापोली येथे ‘अनार्य दोष परिहार’ नावाची संस्था स्थापन केली. तिच्या शाखा सुरू करण्याच्या उद्देशाने त्यांनी महाराष्ट्रात ठिकठिकाणी दौरे केले. गोपाळबाबा वलंगकर यांनी अस्पृश्यता ईश्वरप्रणीत नसून ती सामाजिक रूढी आहे. वरिष्ठ वर्गांनी स्वार्थासाठी अतिशूद्रांवर लादलेली गुलामगिरी आहे, असे सांगितले आहे. त्यांनी ‘हिंदूधर्मदर्पण’ आणि ‘विटाळविध्वंसन’ ही दोन पुस्तके लिहिली. तसेच ‘दीनबंधू’ या पत्रातून लेखन केले आहे. त्यांचे ‘विटाळविध्वंसन’ हे पुस्तक अत्यंत बुद्धिप्रामाण्यवादी आणि हिंदुधर्मविशारदांना निरूत्तर करणारे असे पुस्तक आहे. हिंदू समाजव्यवस्थेची पुनर्रचना व्हायला हवी अशी निकड हे पुस्तक व्यक्त करते.

गोपाळबाबा वलंगकर यांची विवेकनिष्ठा, तर्कशुद्धता, अन्याय-जुलमाविरुद्ध झुंजण्याची कठोर प्रवृत्ती, आक्रमकता पण तत्त्वनिष्ठ प्रतिपादन यांचे दर्शन ‘विटाळविध्वंसन’मध्ये घडते.

गोपाळबाबा वलंगकर यांनी १८९४ मध्ये महारांची पुनः सैन्यात भरती करण्यात यावी अशा आशयाची मागणी करणारे निवेदन ब्रिटीश सरकारला सादर केले होते. महारांना सैन्य भरतीतून वगळणे म्हणजे त्यांच्या पोटापाण्याचा एक मार्ग बंद करणे होते. आणि पर्यायाने त्यांच्या महत्त्वाकांक्षेला पायबंद घालणेही होते. दलितांची सैन्यातील भरती हा त्यांच्या आर्थिक स्थैर्याचा व सामाजिक प्रतिष्ठेचा प्रश्न आहे हे गोपाळबाबा यांनी जाणले होते. म्हणूनच त्यांनी महार समाजातील व्यक्तीची सैन्यात पुन्हा भरती करावी अशा आशयाचे निवेदन ब्रिटीश सरकारला सादर केले होते. एकोणिसाव्या शतकातील गोपाळबाबा वलंगकर यांचे कार्य पुढील चळवळीच्या दृष्टीने मोलाचे असेच आहे.

गोपाळबुवा वलंगकर यांनी चालविलेले जनजागृतीचे कार्य पुढे पुण्याच्या शिवराम जानबा कांबळे यांनी चालविले. त्यांनी अस्पृश्यांचे संघटन केले. हिंदु धर्मपोशिंदे आणि सरकार यांना अस्पृश्यांच्या प्रश्नांची वारंवार जाणीव करून दिली. तसेच अस्पृश्यांना आपले मानून त्यांच्या विकासाला हातभार लावावा अशी विनंती केली, याचबरोबरीने

अधिवेशने, वाचनालये, सत्याग्रह इत्यादी प्रकारे अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी आपल्या कार्याकरिता लेखन व भाषण यांचा वापर केला. लेखन, वाचन, चिंतन आणि समाजकार्य ही त्यांच्या कार्याची चतु:सूत्री सांगता येईल.

शिवबा जानबा कांबळे यांनी अस्पृश्योन्नतीचे ध्येय समोर ठेवून 'श्रीशंकर प्रासादिक सोमवंशीय हितचिंतक मित्र' समाजाची स्थापना केली. 'सोमवंशीय मित्र' नावाचे मासिक काढले. या मासिकातून त्यांनी लेख आणि अग्रलेखांच्या रूपाने विविध सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली. याचबरोबरीने महाराष्ट्रातील विविध पत्रांतूनही त्यांनी लेखन केले आहे. 'सोमवंशीय मित्र' मासिक चालविताना अस्पृश्यांमधील देवदासीसारख्या अनिष्ट चाली नष्ट व्हाव्यात व त्यांच्या आचारविचारांत सुधारणा घडून यावी, यादृष्टीने त्यांनी केलेले प्रयत्न अतिशय महत्त्वाचे आहेत.

'सोमवंशीय मित्र'मधील शिवराम जानबा कांबळे यांचे लेख आणि अग्रलेख विचारप्रवर्तक आहेत. या लेखांतून ते अस्पृश्यांच्या प्रश्नांसोबत राष्ट्रवाद, जहाल व मवाळांचे राजकारण यांविषयींचेही विचार मांडतात.

शिवराम जानबा कांबळे यांनी अस्पृश्यांना आत्मस्थितीची जाणीव करून दिली. धर्मग्रंथांनी अस्पृश्यांना अमानवी जीवन जगायला भाग पाडले आहे असे त्यांनी सांगितले. अस्पृश्यांच्या दैनावस्थेला या देशातील जातीभेद कारणीभूत असून हे जातीभेद या देशातील जेत्यांनी म्हणजे आर्यांनी निर्माण केले आहेत असे त्यांचे मत होते. अस्पृश्यांच्या मनात आत्मतेजाची जाणीव निर्माण करण्यासाठी ते आर्य-अनार्य यांचा इतिहास कथन करतात. ते इतिहासाकडे प्रबोधनाचे हत्यार म्हणून पाहातात. म्हणून ते प्रबोधनाकरिता पुराणातील देव व दैत्य यांच्या लढायांचा किंवा पेशवाईतील भटशाहीच्या वर्तनधर्माचा आधार घेताना दिसतात.

महात्मा जोतिबा फुले यांच्या समतावादी विचारांतून किसन फागोजी बंदसोडे व पंडित कोंडिरामप्रभृतीही आपआपल्यापरीने या जनजागरणाच्या मोहिमेत सामील झाले होते.

किसन फागुजी बंदसोडे यांनी अस्पृश्यांना तुम्ही या देशाचे आदिवासी आहात अशी स्वत:च्या अस्तित्वाची व अभिमानाची पुन:पुन्हा जाणीव करून दिली. अस्पृश्यांनी आक्रमक आणि स्वाभिमानी बनले पाहिजे असे ते कळकळीने सांगत असत. 'महारासि अंती । नाही लढल्याविण मुक्ती' हे त्यांचे सूत्रवचन होते. आपले विचार त्यांनी सुबोधपत्रिका, ज्ञानप्रकाश, केसरी, देशसेवक, महाराष्ट्र अशा अनेक पत्रांतून मांडले आहेत. ते विविध संस्थांचे व वृत्तपत्रांचे जनक होते. या माध्यमांचा वापर त्यांनी अस्पृश्यांच्या विविध प्रश्नांवर विचारप्रवर्तक लेखन करण्यासाठी केला.

लोकमान्य टिळक, डॉ० बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, न० चिं० केळकर, महर्षी वि० रा० शिंदे, लोकनायक बापूजी अणे इत्यादींशी निकटचा संबंध

असलेल्या किसन फागोजी बंदसोडे यांनी मंदिरप्रवेश, हॉटेलप्रवेश, सहभोजने इत्यादींसाठी संघर्ष केले. अस्पृश्यांप्रमाणेच त्यांनी मजुरांच्या प्रश्नांवरही लढे दिले. १९०७ मध्ये त्यांनी मुलींसाठी 'चोखामेळा कन्याशाळा' स्थापन केली. विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे चालविली, मिल कामगारांचे प्रश्न हाताळले. त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी 'मजदूर पत्रिका' चालविली. १९१९ मध्ये त्यांनी 'अंत्यज समाज' नावाची संस्था स्थापन करून अंतर्गत दुही नष्ट करण्याचे प्रयत्न केले. १९२० साली नागपूर येथे 'अखिल भारतीय बहिष्कृत परिषद' संपन्न झाली. या परिषदेचे अध्यक्ष राजर्षी शाहू महाराज होते, तर संयोजन मंडळातील एक सदस्य किसन फागोजी बंदसोडे होते. या परिषदेनंतर किसन फागोजी बंदसोडे यांनी अस्पृश्यतानिवारणार्थ एक नऊ कलमी योजना जाहीर केली होती. या योजनेमध्ये त्यांनी अंतर्गत सुधारणांवर भर दिला होता. त्यांचे हे कार्य विशेष उल्लेखनीय म्हणावे लागेल. या योजनेमध्ये ते अस्पृश्यांतील पोटजाती मोडणे, रोटी-बेटी व्यवहार करणे, अस्पृश्यांनी स्वावलंबी होण्यासाठी स्वतंत्र उद्योगधंदे करणे, शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे, बलोपासना करणे, वाचनालये उभारणे, अन्यायाविरुद्ध संघटित होणे आणि अस्पृश्यांची एक राजकीय संघटना स्थापणे असे सांगतात. १९२० साली किसन फागोजी बंदसोडे यांना अस्पृश्यांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी राजकीय पक्षाची निकड भासत होती, हे महत्त्वाचे आहे.

किसन फागूजी बंदसोडे यांनी १९०१ मध्ये 'मराठा दीनबंधू' नावाचे साप्ताहिक सुरू केले. त्याचबरोबरीने 'निराश्रित हिंद नागरिक' (१९१०), 'विटाळविध्वंसक' (१९१३), 'मजूरपत्रिका' (१९१८), 'चोखामेळा' (१९३१) इत्यादी पत्रांतून व साप्ताहिकातून त्यांनी लेखन केले आहे. या लेखनाद्वारे ते दुहेरीकार्य करतात. अस्पृश्यतेतर हिंदू समाजाला तुम्ही अस्पृश्यांना समानतेने वागवा अशी विनंती करतात आणि अस्पृश्यांना आत्मजागृत करण्याचाही प्रयत्न करतात. अस्पृश्यांमधील स्वाभिमान जागविण्यासाठी त्यांनी कवनांची रचना केली. उदाहरणादाखल पुढील कवन पाहू.

थू: तुमच्या तोंडावर लेक होऽऽ
कसले वतनदार महार तुम्ही कसले वतनदार
वतनदारांची बघा लेकरे फिरती दारोदार?
...
...
कशी लाज –महार हो, येईना तुमचे चित्ती
हे हिंदू श्वानाहुनी हीन तुम्हा मानती
चुकवाया अपमान धरा अभिमान चित्ती
अपमान साहता, कशी चुके अधोगती ।।

अशा कवनांमधून ते अस्पृश्यांना आपल्या हक्कांसाठी आक्रमक व स्वाभिमानी बना, असे कळकळीने सांगतात.

किसन फागोजी बंदसोडे अल्पशिक्षित होते. त्यांनी समाजपरिवर्तनाचा वसा घेऊन त्याकरिता आपली लेखणी झिजविली. शिक्षण, समाज आणि धर्म या संदर्भात व्याख्याने, प्रवचने, कवने व तमाशा यांच्याद्वारे त्यांनी अस्पृश्यमनात नवा विचार निर्माण केला. अस्पृश्यांमध्ये स्वाभिमान आणि स्वावलंबन निर्माण झाल्याशिवाय त्यांना आत्मोद्धार करता येणार नाही ही त्यांची धारणा त्यांच्या सर्व कार्याच्या मुळाशी होती, असे सांगता येईल.

गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागूजी बंदसोडे यांच्या तुलनेत गणेश आकाजी गवई यांचे लेखन सीमित आहे. गणेश आकाजी गवई यांनी १९१४ साली 'बहिष्कृत भारत' हे पत्र सुरू केले. या पत्रातून त्यांचे काही लेखही प्रकाशित झाले आहेत. कौन्सिलात त्यांनी दलितांचे प्रतिनिधित्व करून अस्पृश्यांच्या हक्कांसाठी विचार मांडले, लढत दिली. १ ऑक्टोबर १९०९ रोजी त्यांनी किसन फागू बंदसोडे यांच्यासह ब्राह्मोधर्माची दीक्षा घेतली. या कार्यक्रमाचे आयोजन व नेतृत्व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले होते. १९१० साली अमरावती येथे 'महार सुधारक मंडळ' ही संस्था स्थापन करण्यात आली. गणेश आक्काजी गवई यांचे या संस्थेशी जवळचे संबंध होते. या संस्थेमार्फत खेड्यापाड्यात सभा भरविणे, पोटजातीत विवाह घडवून आणणे, मुला-मुलींना शिक्षण देणे, सरकारपुढे गाऱ्हाणी मांडणे अशा प्रकारचे भरीव कार्य केले जात होते.

१९१९ ते १९२३ या काळात मध्यप्रांत वऱ्हाड कौन्सिलवर कालिचरण नंदगवळी सोबत गणेश आकाजी गवई यांचीही सरकारचे सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली. परिणामी त्यांना अस्पृश्यांच्या प्रश्नांवर वारंवार विचार मांडण्याची संधी प्राप्त झाली. त्यांच्या विचारांचे सार पुढीलप्रमाणे सांगता येईल. हिंदुधर्माला लागलेला सर्वांत मोठा कलंक म्हणजे अस्पृश्यता होय, अस्पृश्यांना सरकारने शिक्षण दिले पाहिजे. विहिरीवर पाणी भरण्याच्या हक्कापासून अस्पृश्यांना दूर ठेवता कामा नये, अस्पृश्यांसंबंधात ते जातीय तणाव वाढवितात, भांडणे निर्माण करतात, राष्ट्रीय प्रगतीच्या आड येतात हा युक्तिवाद भिक्कारडा आहे आणि दुसऱ्याचे मानवी हक्क हिरावून घेणे हे धर्मकृत्य नाही हे होय.

जातिभेद हा हिंदू समाजाच्या मनात खोलवर मुरलेला असून, अस्पृश्यांनी कितीही जाती बदलण्याचा प्रयत्न केला तरी त्यांची जात लपून राहणार नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते. म्हणून मुस्लिमांच्या जुलमीपणाला घाबरून महारांनी आपली जात बदलू नये असे ते सांगत. तसेच गणेश आ० गवई यांना महारांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारणेही मान्य नव्हते. धर्मांतरामागे जसा अस्पृश्यांच्या अडाणीपणाचा भाग आहे, तसाच ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या चलाखपणाचाही भाग आहे, असे त्यांचे स्पष्ट मत होते.

धर्मांतरासंदर्भातील किसन फागू बंदसोडे यांची व गणेश आ० गवई यांची भूमिका भिन्न आहे. हिंदुधर्मातील शास्त्रीपंडितांशी भांडून व त्यांच्यातच राहून अस्पृश्यांनी आपली श्रेष्ठता सिद्ध करावी, असे किसन फागू बंदसोडे यांना वाटत होते. मात्र गणेश आ० गवई हे हिंदुधर्मात राहाण्यातच अस्पृश्यांचे हित आहे हे प्रतिपादित होते.

गणेश आ० गवई यांनी डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांच्या उदयापूर्वी अस्पृश्यांचा उत्कर्ष करण्यासाठी आंदोलनाच्या आणि विचारांच्या पातळीवर आपली भूमिका मांडली होती. १९२०च्या नागपूरच्या अ० भा० बहिष्कृत परिषदेत त्यांचा सहभाग होता. मात्र डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्व त्यांना मान्य नव्हते, कारण ते महात्मा गांधी यांच्या विचारप्रणालीचे भोक्ते होते.

डॉ० बाबासाहेब आंबेडकरपूर्व दलित वैचारिक लेखन हे प्राधान्याने अस्पृश्यांच्या प्रश्नासंबंधी कर्तव्यभावना व सामाजिक प्रबोधन हा हेतू मनाशी बाळगून केलेले दिसते. अस्पृश्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, हिंदू समाज आणि हिंदुधर्मग्रंथातील गोषवारा व्यक्त करून त्यातील विसंगतीवर बोट ठेवणे, अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी, सवर्णीय आणि सरकार यांनी आत्मीय दृष्टीने पाहावे, त्यासाठी त्यांना अर्ज-विनंती करणे, अनिष्ट रूढी आणि दुष्ट चालीरीतींचा त्याग करण्यासाठी अस्पृश्यांना प्रवृत्त करणे, धर्मांतर न करता हिंदू समाजातच राहून आपली उन्नती करून घेणे इत्यादी या लेखनामागील उद्दिष्टे सांगता येतील. तर प्रांजळपणा, कधी आक्रमकता, कधी आवेशपूर्णता, कधी सामंजस्य व नम्रता, अनलंकृतता, सहज सरळ भाषेचा वापर आणि सामाजिक प्रबोधनाची तळमळ असे या लेखनाचे गुण नोंदविता येतील.

आंबेडकरपूर्व काळातील दलित समाजाच्या प्रबोधनासाठी व समाजजागृतीसाठी जानूजी व संभूजी खंडारे, दशरथ पाटील, नंदागवळी, जैराम गायकवाड, सखाराम सावकार, करणू मालगुजारे इत्यादींनीही आपआपल्या परीने कार्य केलेले दिसते. या सर्वांच्या समाजोद्धाराच्या कार्यातून दलित चळवळीला एक आकार प्राप्त होत गेला. या सर्वांतून डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यासाठी पायाभरणी करण्यात आली. पुढे या पायाभरणीवर डॉ० बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य दृढपणे व खंबीरतेने उभे राहिले. म्हणून डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची पायाभरणी तयार करण्याचे श्रेय वरील सर्व अस्पृश्य दलित समाजातील पुढाऱ्यांकडे जाते असे म्हणता येईल.

अस्पृश्यता निवारण्यासाठी स्पृश्य व अस्पृश्य या दोन्ही गटांनी एकत्र येणे गरजेचे आहे, या जाणिवेतून महर्षी वि० रा० शिंदे व सर नारायणराव चंदावरकर या सुधारकांनी केलेल्या कार्याची नोंद येथे करणे आवश्यक आहे. कारण यांच्याच प्रेरणेने पुढे ठिकठिकाणी अस्पृश्यता निवारण परिषदा भरल्या. पहिल्या महायुद्धानंतर मॉंटेग्यू हिंदुस्थानच्या दौऱ्यावर आले असताना सर नारायणराव चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांचे एक शिष्टमंडळ त्यांना भेटले आणि या मंडळाने अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची मागणी त्यांच्याकडे केली. पुढे मॉंटेग्यू व चेम्सफर्ड यांच्या दौऱ्यानंतर मतदानाच्या अधिकाराचा विचार करण्यासाठी साउथबरो कमिटी हिंदुस्थानच्या दौऱ्यावर आली. या कमिटीपुढे अस्पृश्यांच्या वतीने डॉ० बाबासाहेब आंबेडकर व महर्षी वि० रा० शिंदे यांच्या साक्षी झाल्या होत्या.

## डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ व त्याचे स्वरूप

डॉ० बाबासाहेब आंबेडकर इंग्लंड-अमेरिकेतील विद्यापीठीय अभ्यासक्रम संपवून १९२३ साली भारतात परत आले. या काळातील डॉ० बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका मुख्यतः उदारमतवादी समाजसुधारकाची होती असे म्हणता येते. न्या० रानडे, ना० गोखले, दादाभाई नौरोजी व महात्मा गांधी यांच्याप्रमाणे पाश्चात्त्य देशांतील उदारमतवादाची मूलतत्त्वे डॉ० बाबासाहेब आंबेडकरांनीही स्वीकारली होती. एवढेच नव्हे तर हिंदू तत्त्वज्ञान व भारतीय परंपरा यांच्याशी त्यांची सांगड घालण्याचा प्रयत्नही केला होता. मात्र हिंदू समाजरचनेतील विषमतेची व अन्यायाची त्यांना पूर्ण जाणीव होती. समाजात समता प्रस्थापित करावयाची असेल तर त्यासाठी जातिव्यवस्थेची पाळेमुळे खणून काढली पाहिजेत असे त्यांचे स्पष्ट मत होते. या अनुषंगाने डॉ० आंबेडकर यांनी अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करण्याच्या हेतूनें 'बहिष्कृत हितकारिणी सभा' नावाची संस्था स्थापन केली. व या कार्याच्या प्रचारासाठी 'बहिष्कृत भारत' हे वर्तमानपत्र सुरू केले. डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला तो महाडच्या 'चवदार तळे' प्रकरणापासून. म्हणून महाडच्या 'चवदार तळे' प्रकरणाचा विस्तृत परिचय करून घेणे महत्त्वाचे ठरेल.

## चवदार तळे प्रकरण

महाडचे 'चवदार तळे प्रकरण' हे डॉ. आंबेडकरांच्या चरित्रातील एक महत्त्वाचे ऐतिहासिक वळण आहे.

१९२६ साली सर्व सार्वजनिक ठिकाणे म्हणजे न्यायालये, शाळा, पाणवठे, बाजार इत्यादी ठिकाणी स्पृश्य-अस्पृश्य असा भेदभाव पाळला जाऊ नये, अशा आशयाचा एक ठराव श्री० सी० के० बोले यांनी मुंबई कायदेमंडळात मांडला व तो मंजूरही झाला. या ठरावाला सरकारी आदेशाचे बंधनकारक स्वरूप प्राप्त झाले. या सरकारी ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधीचा ठराव महाडच्या नगरपालिकेतही मंजूर केला. आणि तद्नुसार महाडचे प्रसिद्ध चवदार तळे सार्वजनिक पाणवठा म्हणून अस्पृश्यांना खुले झाले. पण महाडच्या सवर्ण हिंदूंनी दंडेली करून अस्पृश्यांना पाणी भरण्यास मज्जाव केला. वास्तविक अशा वेळी सवर्ण हिंदूंचा अडथळा दूर करणे हे मुंबई सरकारचे आणि महाड नगरपालिकेचे कर्तव्य होते. पण त्या बाबतीत दोघांनीही काही केले नाही. म्हणून सरकारी ठराव अंमलात कसा आणता येईल याचा विचार करण्यासाठी 'बहिष्कृत हितकारिणी' सभेमार्फत महाडला १९ व २० मार्च १९२७ला परिषद घेण्यात आली. या परिषदेला अस्पृश्य समाजातील स्त्री-पुरुष हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. २० मार्च १९२७ रोजी आंबेडकर व हजारो लोकांनी चवदार तळ्याच्या पायऱ्या उतरून त्याचे पाणी प्राशन केले. डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समतेच्या लढ्यातील ही पहिली सामुदायिक कृती मानावी लागेल. डॉ० बाबासाहेब आंबेडकरांनी उचललेले हे पाऊल तत्कालीन सनातनी लोकांना आवडले नाही. परिणामी महाडच्याच हजारो सवर्णांनी परिषदेच्या

मंडपावर हल्ला करून मंडपाची नासधूस केली, जाळपोळ केली, अन्नामध्ये माती टाकली. तळ्यावरून परतणाऱ्या बेसावध अस्पृश्य स्त्री-पुरुषांवर त्यांनी हल्ले केले. महार लोक आता पवित्र मंदिरे, देव बाटवणार अशा अफवाही त्यांनी उठविल्या. एवढेच नव्हे तर सनातन्यांनी अस्पृश्यांनी बाटवलेल्या चवदार तळ्याची धर्मविधीपूर्वक 'शुद्धी' केली. आणि या शुद्ध केलेल्या तळ्यातील पाणी भरावयास अस्पृश्य जर आले तर तळ्यातील शुद्ध पाण्याच्या रक्षणासाठी उच्च वर्णीय हिंदूंना रक्त सांडावे लागेल अशी घोषणाही केली. एवढे करून सवर्ण थांबले नाहीत तर त्यांनी सरकारने या प्रकरणात हस्तक्षेप करावा अशी मागणी केली. आणि याचबरोबर महाडहून आपआपल्या गावी परतलेल्या अस्पृश्यांवर त्या त्या गावच्या सवर्णांनी बहिष्कार टाकला. अशा प्रकारे अस्पृश्यांचे खच्चीकरण करणे व परंपरेने चालत आलेली लाचारी त्यांच्यावर लादणे हा सवर्णांचा यामागे हेतू होता.

वास्तवात सनातन्यांनी तळे शुद्ध करणे हा कायदेभंग होता. तो सरकारी ठरावाचा व महाड नगरपालिकेच्या ठरावाचाही भंग होता. म्हणून सरकारने व महाड नगरपालिकेने आपल्या ठरावाची प्रतिष्ठा राखावी एवढीच आंबेडकरांची मागणी होती. ही मागणी मांडण्यासाठी त्यांनी २५ व २६ डिसेंबर १९२७ रोजी महाडला पुन्हा परिषद बोलविली. डॉ० आंबेडकरांनी परिषद बोलविली आहे हे समजताच महाड नगरपालिकेने काही महिन्यांपूर्वी केलेला आपला ठराव मागे घेतला. आणि नगरपालिका ही केवळ सनातनी सवर्ण हिंदूंचीच आहे, हे सिद्ध केले.

महाडच्या दुसऱ्या परिषदेच्या पार्श्वभूमीवर सनातनी हिंदूंनी दलितवर्गाला काही धमक्या दिल्या, तसेच त्यांच्या संदर्भात अपप्रचारही केला. थोडक्यात धर्मद्रोही-देशद्रोही-समाजद्रोही असे स्वरूप या लढ्याला देण्याचा सवर्णीय हिंदूंनी संघटित आणि योजनाबद्ध प्रयत्न केला. यानुसार महाडची ही दुसरी परिषद म्हणजे एकप्रकारे धर्मयुद्धच आहे, दलित वर्गाविरुद्ध यादवी युद्धच आहे असा भास निर्माण करण्यात आला. एवढेच नव्हे तर सरकार सनातन्यांच्या, सवर्णांच्या बाजूने आणि दलितवर्गाच्या विरुद्ध आहे अशी अफवाही पसरविण्यात आली. यामुळे डॉ० बाबासाहेब आंबेडकरांची व दलित समाजाची सर्व बाजूंनी कोंडी केली गेली. याप्रसंगी प्रचंड बहुसंख्येने सवर्ण हिंदू डॉ० बाबासाहेब आंबेडकरांच्या विरोधात उभे राहिले. जाळपोळ, मारामारी, लूटमार, सामाजिक, आर्थिक बहिष्कार इत्यादी मार्गांनी त्यांनी चवदार तळ्याजवळ जाणाऱ्या वाटा अडवून धरल्या. अशा प्रसंगी सरकारने दलित समाजाच्या न्यायबाजूला उभे राहायला हवे होते, पण वास्तवात मात्र कायदेमंडळाचा ठराव आणि सरकारी आदेश या गोष्टी अस्पृश्यांच्या बाजूच्या असूनही सरकार शांतता भंगाचे निमित्त करून, लाठीधारी पोलीस घेऊन चवदार तळ्याची वाट अडवून उभे राहिले. एकूण परिस्थितीचा अंदाज घेऊन कलेक्टरांनी डॉ० बाबासाहेब आंबेडकरांना सत्याग्रह मागे घेण्याची विनंती केली. यासंदर्भात डॉ० बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे प्रमुख सहकारी यांनी सांगोपांग विचार केला आणि त्यानुसार परिषदेचा पुढील कार्यक्रम आखला. वास्तवात सत्याग्रहाच्या निर्धाराने आलेल्या हजारो प्रतिनिधींच्या

भावनांचा आदर करून, चवदार तळ्यावर मोर्चा काढून धडक मारणे, हा एकच मार्ग त्यांना समोर दिसत होता. पण याचा परिणाम म्हणून लाठ्यामार, पुढाऱ्यांना अटक, पोलीसांवर चढाई आणि या संधीचा फायदा घेऊन पुन्हा बहुसंख्य सवर्ण हिंदू हात धुवून घेणार. या गोष्टींनाही सामोरे जावे लागणार होते. अशा आपत्तीजन्य परिस्थितीत डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांच्यासमोर योग्य तो निर्णय घेण्याची व तो निर्णय अनुयायांना पटवून देण्याची जबाबदारी होती. हा केवळ एका दिवसाचा प्रश्न नव्हता. तसेच डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांच्यापुरताही मर्यादित प्रश्न नव्हता. कारण हा प्रश्न डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांनी जागृत केलेल्या, लाखो दलित समाजाच्या भवितव्याचा, सामाजिक समतेच्या लढ्याच्या भवितव्याचा प्रश्न होता. या सर्व गोष्टीचा सारासार विचार करून सध्यातरी दोन आघाड्यांवर लढण्याचे टाळावे आणि सरकारशी महाडच्या तळ्याभोवती तरी संघर्ष करू नये, असा निर्णय डॉ. आंबेडकर घेतात. महाड येथे परिषदेला आलेल्या, सत्याग्रह करण्याच्या ईर्षेने पेटलेल्या, चवदार तळ्याचे पाणी तरी पिऊ किंवा तुरुंगात तरी जाऊ, नाही तर गावात परत तोंड दाखविणार नाही अशी प्रतिज्ञा करून आलेल्या लाखो तरुणांना हा निर्णय पटणे शक्य नव्हते. पण डॉ. आंबेडकर यांच्यासमोर सद्यस्थितीत दुसरा पर्यायही नव्हता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या प्रसंगी दलित समाजाचा सत्याग्रह आणि गांधीजींचा सत्याग्रह यांची तुलनाही केली आहे, तीही विचारात घेणे महत्त्वाचे ठरेल. डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांचा लढा हा धर्माचे अधिष्ठान लाभलेल्या सामाजिक समतेच्या लढ्याचा एक भाग होता. तर गांधीजींचा सत्याग्रह हा राजकीय स्वातंत्र्यलढ्याचा एक भाग होता. त्यामुळे गांधीजींना बहुसंख्य भारतीय जनतेचा पाठिंबा होता. डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांनी तूर्तास माघार घेण्याचा घेतलेला निर्णय त्यांच्या अनुयायांना पटला नव्हता पण अखेर तो आपल्या नेत्याचा आदेश म्हणून त्यांनी स्वीकारला.

याचवेळी महाड येथील काही सनातन्यांनी वरील संदर्भात कोर्टाचा तातपुरता मनाईहुकूम मिळविण्यात यशस्वी झाले. तेव्हा सत्याग्रह तूर्त स्थगित करताना हे न्यायप्रविष्ट प्रकरण डॉ० बाबासाहेब आंबेडकरांच्याही उपयोगी आले, असे म्हणावे लागेल.

महाडच्या परिषदेचे ऐतिहासिक मूल्यमापन करावयाचे झाले तर या परिषदेचे नियोजन आणि मार्गदर्शन डॉ. आंबेडकरांनी अतिशय विचारपूर्वक व स्फूर्तिदायक पद्धतीने केले होते. महाडमध्ये सनातन्यांनी परिषदेला जागासुद्धा न मिळू देण्याची खटपट केली. पण डॉ० बाबासाहेब आंबेडकरांनी एका मुसलमानाकडून जागा मिळविली. धान्य व किराणा व्यापाऱ्यांनी परिषदेवर बहिष्कार घालून हजारो प्रतिनिधींची उपासमार करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा जिल्हाभर फिरून स्वयंसेवकांनी धान्य, चणेफुटाणे व भाकऱ्या जमा केल्या. प्रतिनिधींनीही परिषदेला येताना दोन दोन दिवसांच्या भाकऱ्या बांधून आणल्या. परिषदेचे कामकाज सुरळीत व्हावे म्हणून हजारो तरुणांचे शिस्तबद्ध स्वयंसेवकदल उभारण्यात आले.

परिषदेला म्हणजेच एकूण आंदोलनाला खंबीर आणि तत्त्वशुद्ध वैचारिक बैठक लाभावी म्हणून डॉ. आंबेडकरांनी परिषदेच्या पहिल्याच दिवशी २५ डिसेंबर १९२७ला 'जन्मसिद्ध मानवी हक्कांचा जाहीरनामा' मांडला व मंजूर करून घेतला. सामाजिक समतेच्या लढ्यामध्ये या जाहीरनाम्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. याच दिवशी डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांनी शूद्र-अतिशूद्र व स्त्रियांना धर्माच्या नावाखाली गुलामगिरी पत्करायला लावणाऱ्या मनुस्मृतीचे जाहीरपणे दहन करण्याची घोषणा केली. यातून त्यांनी वर्णाश्रमधर्मावरच प्रहार केला. मनुस्मृतीचे जाहीर दहन ही कृती शूद्र-अतिशूद्रांच्या दृष्टीने अधिक प्रभावी व स्फूर्तिदायक होती. आणि त्याचबरोबर सवर्ण हिंदू समाजाला खडबडून जागे करणारीही होती. म्हणून महाडची ही दुसरी परिषद चवदार तळ्यापेक्षाही मानवी समतेचा जाहीरनामा आणि मनुस्मृती-दहन या गोष्टीमुळे अधिक गाजली.

तिसरी गोष्ट म्हणजे या सत्याग्रहाच्या निमित्ताने आंदोलनाची गरज म्हणून निर्माण झालेल्या तेजस्वी ध्येयवेड्या तरुणांच्या स्वयंसेवक दलाची स्थापना होय. यातूनच पुढे आंबेडकरांच्या इतिहासप्रसिद्ध समता सैनिक दलाच्या स्थापनेला स्फूर्ती मिळाली आणि पुढे या सैनिकदलाचा महाराष्ट्रभर विस्तार झाला. तसेच चवदार तळे प्रकरणामुळे सवर्ण सुधारकांची कसोटी लागली. काही सुधारक सनातन्यांच्या बाजूला वळले. 'सनातनी सुधारक' हा शब्दप्रयोग साधारणत: तेव्हापासून रूढ झाला. डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांच्या सत्याग्रहाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद 'महार' समाजाने दिला होता. सनातनी सवर्ण हिंदूंनी याचा फायदा उठवित महार व महारेतर अशी दलितांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न केला. शेवटी डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांना चर्मकार समाजाला या व्यापक स्वाभिमानी, स्वावलंबी आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करावे लागले.

महाड परिषदेच्या निमित्ताने आणखी एक महत्त्वाची घडलेली घटना म्हणजे या परिषदेतील अस्पृश्य (विशेषत: महार) स्त्रियांचा सहभाग ही होय. म० गांधी यांच्या १९२०-२१ मधील असहकारिता आंदोलनामध्ये स्त्रियांचा सहभाग होता. पण तो प्रामुख्याने शहरी, पांढरपेशा स्त्रियांपुरता मर्यादित होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या परिषदेचा एक भाग म्हणून येथे स्त्रियांचा वेगळा मेळावा घेतला आणि त्यांना मार्गदर्शन केले आणि 'मी अस्पृश्य जातीत जन्मले असले तरी माझ्या पोटची मुले अस्पृश्य राहाणार नाहीत हे ध्येय उरी बाळगून मुलांच्या मनावर हा संस्कार बिंबवा असा त्यांना उपदेशही केला.'

महाड येथील चवदार तळे प्रकरण ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाची पहिली ठळक घटना होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच दलित समाजाचे एकमेव नेते हे या घटनेने सिद्ध केले. एका स्वतंत्र, स्वावलंबी, स्वाभिमानी शक्तीचा उदय भारतामध्ये झाला याचा प्रत्यय आला. राजकारणाएवढेच समाजकारण–सामाजिक समतेचा लढा परतंत्र देशातसुद्धा एका महान जन-आंदोलनाचा केंद्रबिंदू होऊ शकतो, ही गोष्ट या प्रसंगाने सिद्ध झाली. आणि सामाजिक समतेच्या आंदोलनाची उपेक्षा दलित समाज खपवून घेणार नाही, हा ईषाराही या सत्याग्रहातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला. थोडक्यात

महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या निमित्ताने सामाजिक समतेच्या आंदोलनाचा भरभक्कम पाया घालून आंबेडकरांनी दलितांच्या स्वतंत्र, स्वावलंबी, स्वाभिमानी व राजकीय आंदोलनाची दिशा निश्चित केली. तसेच म. गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये मतभेद असले तरी महाडच्या मुक्तिसंग्रामाचा एक विशेष असा होता की, परिषदेच्या संपूर्ण मंडपात फक्त एकच छायाचित्र होते आणि ते महात्मा गांधी यांचे होते, हे लक्षात घेता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनात गांधीबद्दल आदरभाव होता, असे स्पष्ट होते.

### पर्वती मंदिरप्रवेश

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाला शह देण्यासाठी काँग्रेसमधील हिंदू सुधारकांनी काही महारेतर अस्पृश्यांच्या साहाय्याने आंबेडकरांना प्रतिस्पर्धी अशी अस्पृश्यता निवारणार्थ वेगळी चळवळ सुरू करण्याचे प्रयत्न केले. पुण्याच्या पर्वती सत्याग्रह हा त्यातीलच एक प्रयत्न होय. या सत्याग्रहाचे नेतृत्व बहुजनसमाजाचे नेते श्री. केशवराव जेधे यांनी केले होते. पण या सत्याग्रहात स्पृश्य बहुजनसमाज फारसा सामील झाला नव्हता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यामध्ये सामील नसल्यामुळे अस्पृश्य बहुजनसमाजही सामील झाला नव्हता. या सत्याग्रहान्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीविषयीची व त्यांच्या नेतृत्वासंदर्भातील उच्चवर्णीय हिंदू सुधारकांची उदासीनताच व्यक्त होते. मात्र पर्वती मंदिर प्रवेशाच्या निमित्ताने सर्व उच्चवर्णीय हिंदू सनातन धर्माच्या झेंड्याखाली एकत्र आले. ही पर्वती मंदिरसत्याग्रहाची फलश्रुती सांगता येईल.

### काळाराम मंदिर सत्याग्रह

१९३० सालच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिक येथील 'काळाराम मंदिरा'त सामुदायिक प्रवेश करण्याची घोषणा केली. या संदर्भातील रीतसर पत्रव्यवहारही त्यांनी केला. या सत्याग्रहाचा विशेष म्हणजे या सत्याग्रहासाठी महाराष्ट्रातील सत्याग्रही आले होतेच. पण याखेरीज उत्तर कर्नाटक व गुजराथमधूनही शेकडो सत्याग्रही आले होते. याच काळात महात्मा गांधींची सविनय कायदेभंगाची देशव्यापी चळवळही चालू होती. डॉ. आंबेडकरांचा हा सत्याग्रह गांधीप्रणीत आंदोलनाच्या किंचित आधी सुरू झाला व या आंदोलनाला समांतर असा दीर्घकाळ चालू राहिला. मात्र या सत्याग्रहातील तळागाळातील समाजाचा सहभाग पाहिला तर संख्यात्मक व गुणात्मक दृष्टीने हा सत्याग्रह महत्त्वाचा ठरतो. मात्र गोलमेज परिषद, येरवडा करार इत्यादींमध्ये काळाराम सत्याग्रह हळूहळू मागे पडला आणि नंतर मंदिर प्रवेशाच्या प्रश्नाबाबत कोणताही निर्णय न लागताच, हा सत्याग्रह स्थगित झाला.

### गोलमेज परिषद

लंडनमध्ये ब्रिटीश सरकारने भारताच्या भावी राज्यघटनेची चर्चा करण्यासाठी परिषद बोलाविली होती. ही परिषद म्हणजे 'गोलमेज' परिषद होय. या परिषदेची एकूण तीन अधिवेशने झाली. या तिन्ही अधिवेशनांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय

अस्पृश्य समाजाचे प्रतिनिधी म्हणून हजर राहिले होते. तर दुसऱ्या अधिवेशनाला महात्मा गांधी हजर राहिले होते. या परिषदेमध्ये अस्पृश्यांचे सामाजिक समतेचे हक्क, शिक्षण, नोकऱ्या इत्यादी बाबतच्या सवलती, कायदेमंडळातील प्रतिनिधित्व इत्यादी सर्व गोष्टीसंबंधी अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबरोबर भारतीय राष्ट्रीय पुढाऱ्यांना तसेच इंग्रज सरकारला वाटाघाटी करणे भाग पडले. याचाच अर्थ भारताच्या राजकारणात अस्पृश्य समाजाला महत्त्वाचे स्थान मिळवून देण्याचे बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना यश मिळाले असे म्हणता येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या यशामध्ये त्यांच्या कर्तृत्वाचा जसा भाग होता तसेच त्यांच्या आंदोलनातून प्रेरित झालेल्या दलित समाजातील संघटित शक्तीचाही भाग होता.

### येरवडा करार

१९३० ला लंडन येथे गोलमेज परिषद भरविण्यात आली. या परिषदेत अस्पृश्य चळवळीच्या ध्येयधोरणात एक महत्त्वाचा बदल घडून आला. सन १९३२ मध्ये तत्कालीन ब्रिटीश पंतप्रधान मि. रॅम्से मॅकडोनल्ड यांनी 'कम्युनल अवार्ड' हा जातीय निवाडा जाहीर केला. या निवाड्यामध्ये दलित वर्गासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य केली होती. या निवाड्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यवर्गासाठी राखीव जागा व स्वतंत्र मतदारसंघाचा आग्रह धरला. पण महात्मा गांधी यांनी अस्पृश्य जातींना स्वतंत्र मतदारसंघ देण्यास प्राणपणाने विरोध केला. याकरिता त्यांनी सप्टेंबर १९३२ला येरवडा कारागृहात उपोषणाला सुरुवात केली.

महात्मा गांधी यांच्यामते अस्पृश्य वर्गासाठी राखीव जागा असाव्यात पण त्या स्पृश्य व अस्पृश्य ह्यांच्या संयुक्त मतरादसंघातून निवडल्या गेल्या पाहिजेत. तर अस्पृश्यांसाठी राखीव जागा व स्वतंत्र मतदार संघ असावा असा आग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धरला होता. महात्मा गांधी यांच्या प्राणांतिक उपोषणामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अस्पृश्य वर्गासाठी स्वतंत्र मतदारसंघाचा आग्रह सोडावा लागला. यावेळी कायदेमंडळातील अस्पृश्यांच्या जागांमध्ये वाढ करण्यात आली व संयुक्त मतदारसंघाला मान्यता देण्यात आली. महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सह्यांनिशी झालेला हा ऐतिहासिक करार म्हणजेच 'येरवडा करार' होय.

महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये वैचारिक मतभेद होते. तसेच महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोहोंच्या सामाजिक न्याय्य चळवळींना सवर्णांची स्वार्थबुद्धी व स्थितीशीलता आणि दलितांचे दारिद्र्य व दुबळेपण यांच्या मर्यादाही पडल्या होत्या, हे ही लक्षात घ्यावे लागते. १९३० नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या कार्याच्या केंद्रस्थानी अस्पृश्यांच्या स्वतंत्र राजकीय हक्कांना आणले. यातूनच मंदिरप्रवेशासारख्या चळवळींना त्यांनी काहीसे बाजूला सारलेले दिसते.

## धर्मांतराची चळवळ

महाड व नाशिक सत्याग्रहाच्या काळात त्याचप्रमाणे गोलमेज परिषदेमध्येही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका हिंदू धर्मांतर्गत सुधारकाचीच होती. १९३० नंतर मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांच्या स्वतंत्र राजकीय हक्कांविषयी अधिक आग्रही झाले. जातीय तत्त्वांवर आधारलेल्या राजकारणात निरनिराळ्या पक्षांचे बलाबल त्या त्या जातींच्या किंवा धार्मिक गटांच्या लोकसंख्येवर अवलंबून असते. अशा परिस्थितीत सामुदायिक धर्मांतर हे एक मोठे राजकीय अस्त्र ठरते. हे लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढील पाऊल उचललेले दिसते. २३ ऑक्टोबर १९३५ला येवले येथे अस्पृश्यांची परिषद झाली. या परिषदेमध्ये धर्मांतराच्या प्रश्नांवर विचार झाला. याच परिषदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मी हिंदू म्हणून जन्मलो, त्यास माझा इलाज नव्हता, पण मी हिंदू म्हणून मरणार नाही.' अशी घोषणा केली. याचाच अर्थ हिंदू धर्मात राहून अस्पृश्यता निवारण करण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'हिंदू धर्मांतर्गत लढा' समाप्त झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदूधर्म सोडण्याचा निर्णय जाहीरपणे व्यक्त केल्यानंतर कोणत्या नव्या धर्मात प्रवेश करायचा हा गंभीर प्रश्न त्यांच्या समोर होता. त्यादृष्टीने त्यांनी भारतातील हिंदू धर्माव्यतिरिक्त अन्य धर्मांचा विचार सुरू केला. भारतातील मुस्लिम आणि ख्रिस्ती धर्म हे दोन्ही अभारतीय धर्म आहेत. या धर्मांचा भारतीय संस्कृतीशी कोणताच संबंध नसल्याने या धर्मांचा स्वीकार करण्यास ते अनुकूल नव्हते मात्र शीख धर्म भारतीय असून तो हिंदू संस्कृतीच्या परिसरात निर्माण झालेला, विकास पावलेला धर्म आहे. म्हणून धर्मांतराकरिता एक पर्याय म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर शीख धर्माचा विचार करताना दिसतात. तसेच शीख ही जमात संख्येने लहान असून अत्यंत जागरूक, संघटित, प्रभावी अशी जमात असल्यामुळे अशा जमातीत आपण समाविष्ट व्हावे असा विचार सुरुवातीला त्यांनी केलेला दिसतो. यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शीख धर्म, त्यांचे रीतिरिवाज, समाजव्यवस्था इत्यादींचा अभ्यास करण्यासाठी आपल्या काही प्रमुख कार्यकर्त्यांचा गट पंजाबमध्ये पाठवून दिला होता. या सर्वांवरून असे म्हणता येईल की माणसाला व मानवनिर्मित समाजाला धर्माचे अधिष्ठान पाहिजे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाही वाटत होते. पण भारताला व भारतीय संस्कृतीला घातक ठरणाऱ्या धर्माचा स्वीकार करणे त्यांना मान्य नव्हते. म्हणूनच त्यांनी शीख धर्माचा विचार केला पण मुस्लिम किंवा ख्रिस्ती धर्माचा विचार केलेला दिसत नाही. तसेच बौद्ध धर्माला भारतात स्वतंत्र अस्तित्व नव्हते. त्यामुळे त्याचा स्वीकार केल्याने त्या काळात राजकीय, सामाजिक फायदा होण्याचा संभव त्यांना प्रथमदर्शनी दिसत नव्हता. दुसऱ्या बाजूने शीख धर्म सोयीचा वाटत असला तरी 'पुणे करारा'ने अस्पृश्यांना मिळालेल्या राजकीय हक्कांपासून धर्मांतरित अस्पृश्य समाज वंचित राहाण्याचा मोठा धोका होता. पण महायुद्ध काळात देशाच्या भवितव्याचे व राजकारणाचे प्रश्न एवढ्या गंभीर स्वरूपात पुढे आले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपुढील धर्मांतराचा प्रश्न अनिर्णित राहिला.

भारतीय लोकसत्ताकाची, प्रजासत्ताकाची स्थापना झाल्यानंतर निरनिराळ्या जातींमधील राजकीय स्पर्धा काही प्रमाणात कमी झालेली दिसते. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारण्याचे निश्चित केले. बौद्ध धर्म मुळात भारतीय धर्म आहे. या धर्माचा स्वीकार केल्याने भारतीयांच्या एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेला तडा जाणार नव्हता. बौद्धधर्माची शिकवण स्वातंत्र्य, समता, लोकशाही या मूल्यांना पोषक होती. भारतात बौद्ध समाज मोठ्या प्रमाणात नसल्यामुळे अस्पृश्यांच्या अस्मितेला यामध्ये धोका नव्हता. या सर्व बाबींचा विचार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अनुयायांसह २५ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे धर्मांतर करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला. हिंदूधर्म सोडण्याचा जाहीरपणे उल्लेख केल्यानंतर २१ वर्षानंतर त्यांनी धर्मांतर केले. या एकवीस वर्षांच्या काळात अनेक घडामोडी घडल्या. उदाहरणार्थ, स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्यूल कास्ट्स फेडरेशन, महायुद्धकालीन घडामोडी, सत्तांतर, घटना-परिषद, स्वतंत्र भारताच्या संविधानाची निर्मिती इत्यादी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या असंख्य अनुयायांसह बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यावर दलितांच्या चळवळीला प्रेरक व पोषक होईल अशा पद्धतीने बौद्धमतांवर नव्याने भाष्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते सिद्धार्थाला अभिप्रेत असलेले दु:ख सामाजिक आहे. म्हणून सामाजिक कलहाची कारणे व ते नाहीसे करण्याचे उपाय शोधून काढणे हेच गौतमबुद्धाच्या जीवनाचे ध्येय होते. तसेच बौद्ध धर्म हा विज्ञाननिष्ठेशी व बुद्धिवादाशी सुसंगत असून तो सामाजिक समतेला व लोकशाहीला पोषक ठरतो. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हा धर्म सर्वांत जवळचा वाटला आणि त्यांनी धर्मांतरासाठी या धर्माचा आश्रय घेतला. आधुनिक युगाशी सुसंगत अशी बौद्ध धर्माची फेरमांडणी केली. विज्ञाननिष्ठा, बुद्धिवाद, सामाजिक समता यांच्याशी विसंगत असा जो भाग बौद्ध धर्मग्रंथामध्ये असेल तो प्रक्षिप्त मानावा असे त्यांनी आवर्जून सांगितले आहे. मात्र धर्मांतर हे सामाजिक परिवर्तनाचे साधन बनू शकत नाही हे आज पाच सहा दशकांमधीलजातीविषयक घडामोडींमुळे स्पष्ट झाले आहे. कारण आजही पूर्वसंस्कार, सत्तास्पर्धेतील जातीयता आणि दलित समाजाचे आर्थिक परावलंबन यामुळे आजही अस्पृश्यता प्रत्यक्षात टिकून राहिलेली दिसते.

## स्वतंत्र मजूर पक्ष

श्रमजीविकांना आपला लढा यशस्वीरीतीने लढवायचा असेल तर जातपात, धर्म, देश वगैरे भेद मनात न आणता मजूर तेवढे सारे एक ही वर्गभावना मनात ठसवून घेऊन त्यांनी आपली अभेद्य संघटना केली पाहिजे, अशी व्यापक भूमिका घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजूर पक्षा'ची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना व कार्य हा महाराष्ट्रातील दलितांच्या चळवळीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या नव्या पक्षाचे नाव 'स्वतंत्र मजूर पक्ष' असे ठेवले कारण त्याकाळातील नव्याने होत असलेल्या औद्योगिक प्रक्रियेमध्ये

मुख्य संघर्ष हा वर्गसंघर्ष राहाणार आहे, हे त्यांनी जाणले होते. बहुतांश मजूर वर्ग शूद्र-अतिशूद्रांचा म्हणजेच अस्पृश्यांसारख्या मागास जातीजमातींचा होता. हिंदू समाजातील वरिष्ठ वर्गाकडून आर्थिकदृष्ट्या शेतकरी कामगार हा वर्ग पिळला जात होता. असा सर्व वर्ग एक झाला तर अस्पृश्यांच्या दास्यविमोचनाचाही तो एक मार्ग ठरू शकेल असा त्यांना विश्वास वाटत होता. रूढिभंजनाचे आणि सर्व जातींच्या समान हक्कांच्या पुरस्काराचे अस्पृश्य चळवळीचे धोरण या पक्षाने पुढे चालविले.

स्वतंत्र मजूर पक्षाचे कार्य केवळ निवडणुकीपुरते मर्यादित न राहता या पक्षाने जनआंदोलनाच्या व जनसंघटनांच्या दृष्टीने व्यापक पातळीवर कार्य करावे असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. म्हणून या पक्षधोरणात, लोकशाहीप्रथा नागरिक हक्क, जमिनीचे वाटप, कामगारांना किमान वेतन, इत्यादींनाही महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ही व्यापक दृष्टी निवडणुकीसाठी उमेदवार निवडीमध्येही दिसून येते. निवडणुकीपुरता विचार करायचा तर नव्याने प्रस्थापित झालेल्या स्वतंत्र मजूर पक्षाला भरघोस यश मिळाले. त्या काळातील सत्ताधारी काँग्रेसच्या विरुद्ध नव्या जनआंदोलनाचे नेतृत्व मुख्यत: कम्युनिस्ट आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वतंत्र मजूर पक्ष यांनीच केले. यांतूनच कामगारांवर संपबंदी आणि सक्तीचे लवाद लादणाऱ्या कायद्याविरुद्धचा पहिला यशस्वी सार्वत्रिक संप करण्यात आला. अशा प्रकारे जन-आंदोलनाचे नवे व्यासपीठ कम्युनिस्ट पक्ष व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वतंत्र मजूर पक्ष यांनी कधी एकजुटीने तर कधी समांतरतेने केलेले दिसते. मात्र दुसऱ्या महायुद्धाच्या काळात कोणतीही घोषणा न करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजूर पक्षा'चे कार्य समाप्त केलेले दिसते.

## शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशन

भारताची भावी राज्यघटना तयार होत असताना अस्पृश्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी त्यांच्या स्वतंत्र संघटनेची गरज निर्माण झाली. 'स्वतंत्र मजूर पक्षा'ची भूमिका व्यापक होती. या पक्षाच्या तत्त्वांवर अखिल भारतीय अस्पृश्यांची संघटना उभारणे, हे काम सोपे नव्हते. १९४२ साली अखिल भारतीय अस्पृश्य परिषदेचे नागपूर येथे अधिवेशन भरविण्यात आले व त्यातूनच जुलै १९४२ मध्ये शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशनची (दलित फेडरेशन) स्थापना करण्यात आली आणि पुढे निरनिराळ्या प्रांतात या पक्षाच्या शाखा काढण्यात आल्या.

'स्वतंत्र मजूर पक्ष' हा अस्पृश्यांसह साऱ्या दलित आणि श्रमिक वर्गाचा पक्ष होता. तसाच तो उघड विरोधी पक्षही होता. पण 'शेड्युल कास्ट्स फेडरेशन' हा विरोधी पक्ष नव्हता. तर युद्धकालीन सरकारी धोरणाला आणि युद्धप्रयत्नाला पाठिंबा देणारा तो पक्ष होता. त्याचप्रमाणे 'शेड्युल कास्ट्स फेडरेशन' या नावाप्रमाणेच या पक्षाचे कार्यक्षेत्र भारत सरकारच्या कायद्यात नमूद केलेल्या अनुसूचित जातीपुरतेच मर्यादित होते. म्हणजेच

फेडरेशनच्या रूपाने अस्पृश्य पुढाऱ्यांनी वर्गवादी भूमिका सोडून देऊन पुन्हा जातिवादी भूमिकेचा आश्रय घेतला असेच म्हणावे लागेल.

अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ असावेत, मंत्रिमंडळे, कायदेमंडळ, लोकल बोर्ड, म्युनिसिपालिट्या, सरकारी कचेऱ्या इत्यादी सर्व ठिकाणी लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना राखीव जागा असाव्यात, ठिकठिकाणी पडीक जमिनीवर त्यांच्या स्वतंत्र वसाहती वसविण्यात याव्यात, त्यांच्या शिक्षणासाठी ठरावीक रकमेची दरवर्षी तरतूद करण्यात यावी. इत्यादी मागण्या शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशनने केल्या होत्या. पण आपल्या मागण्यांची दखल सरकारने घेण्यासाठी जेवढी संघटित लोकशक्ती पाठीमागे उभी राहायला हवी होती तेवढी लोकशक्ती त्यांच्यापाशी नव्हती. दुसऱ्या बाजूने याकाळात इंग्रजांनी 'मुस्लिम लीग' हा पक्ष सोडून इतर अल्पसंख्य गटांकडे दुर्लक्ष केले होते. परिणामी यावेळी अस्पृश्य पुढाऱ्यांच्या पदरी निराशाच पडली. मात्र युद्धकाळात ट्रेड युनियन चळवळीची देशभर सर्व धंद्यांत चौफेर वाढ झाली आणि अनेक धंद्यांमध्ये बलिष्ठ ट्रेड युनियन चळवळीचा पाया घातला गेला. आणि मजूरमंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगारवर्गासाठी आठ तासांचा दिवस मंजूर करून घेतला.

स्वातंत्र्यानंतर राष्ट्रसभेने अधिक उदार धोरणाचा स्वीकार केला. हंगामी मंत्रिमंडळात कायदेमंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समावेश करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार झाले. भारतीय संविधानाच्या १७व्या कलमानुसार अस्पृश्यता नष्ट झाल्याचे घोषित करण्यात आले आणि सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविणारा कायदाही १९५५ साली संसदेने मंजूर केला. मात्र या आधाराने शेड्युल कास्ट्स फेडरेशनची चळवळ आंबेडकरांचा राजकीय पक्ष म्हणून वाढू शकली नाही. कारण या पक्षाने विरोधी पक्ष ही भूमिका सोडली आणि केवळ सरकार-दरबारावर विसंबून आपल्या जाति-जमातीचे हित बघणे एवढेच उद्दिष्ट ठेवले. नेहरू मंत्रिमंडळातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान घटनेचा शिल्पकार असे प्रतिष्ठेचे असले तरी एकूण मंत्रिमंडळाचे धोरण ठरविणे आणि राज्यकारभार चालविणे या गोष्टींपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर अलिप्त राहिलेले दिसतात. दुसऱ्या बाजूने शेड्युल कास्ट्स फेडरेशनला प्रतिस्पर्धी अशी काँग्रेस हरिजनांची देशव्यापी संघटना उभारण्याचे कार्य याकाळात चालू झाले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रतिस्पर्धी म्हणून बाबू जगजीवनराम हा नवीन अस्पृश्य नेता पुढे आला. एवढेच नव्हे तर बाबू जगजीवनराम यांना मजूरमंत्रिपद देण्यात आले.

भारतीय संविधान मंजूर झाल्यानंतर कायदेमंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर हिंदू कायद्यात अनेकविध सुधारणा सुचवून त्यांची एक व्यापक संहिता तयार करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. विवाह, घटस्फोट, दत्तक, वारसाहक्क इत्यादी अनेक महत्त्वाच्या विषयासंबंधी अनेक दुरुस्त्या करणारे एक व्यापक विधेयक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केले. पण त्यावेळी हे 'हिंदू कोड बिल' होय. मंजूर

करण्यात आले नाही. कारण या हिंदू कोड बिलास अनेक नेत्यांचा विरोध होता. हिंदू कोड बिल मंजूर होण्याची शक्यता संपल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ११ ऑक्टोबर १९५१ रोजी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्याचप्रमाणे भारताची राज्यघटना तयार झाल्यानंतर केवळ दलितांच्या हितसंबंधांचे संरक्षण करणाऱ्या दलित फेडरेशन किंवा शेड्यूल कास्ट्स फेडरेशनसारख्या पक्षाची उपयुक्तता संपुष्टात आली. प्रौढ मताधिकारावर आधारलेल्या प्रादेशिक मतदारसंघातून केवळ दलितांच्या मतांनी विधानसभेत किंवा लोकसभेत निवडून येणे अशक्य होते. म्हणून एका व्यापक पायावर आधारलेल्या पक्षाची गरज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भासू लागली. यातूनच त्यांनी शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशन बरखास्त करून रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचा आदेश आपल्या अनुयायांना दिला.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरोत्तर चळवळीचे स्वरूप

डॉ. बाबासाहेब आंबेडकरोत्तर दलित चळवळीचे स्वरूप जाणून घेताना प्रामुख्याने ‘भारतीय रिपब्लिकन पक्ष’, दलित पँथर मराठवाडा नामांतर चळवळ इत्यादींच्या कार्यस्वरूपाचा थोडक्यात आढावा घ्यावा लागेल.

### भारतीय रिपब्लिकन पक्ष

डिसेंबर १९५६ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महानिर्वाण झाले. हा काळ संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा काळ होता. कोणत्याही देशामधील अशा चळवळी देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेला धोकादायक असतात. म्हणून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीबद्दल सुरुवातीला त्यांनी विशेष आस्था दाखविली नाही. पण संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये जी प्रचंड काँग्रेसविरोधी जनशक्ती एकत्रित झाली, ती बळकट व्हावी या हेतूने त्यांनी आपल्या अनुयायांना या चळवळीत सामील होण्यास संमती दिली. इ.स. १९५७च्या निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीचा प्रचंड विजय झाला. राखीव व सर्वसाधारण अशा दोन्ही मतदार संघातून शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे अनेक उमेदवार विधानसभेवर व लोकसभेवर निवडून आले.

नागपूर येथे ऑक्टोबर १९५७ला दलितांची परिषद भरली होती. या परिषदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन बरखास्त करून रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी दलितांना मिळणाऱ्या शासकीय सवलती धर्मान्तरीत बौद्धांनाही देण्यात याव्या, महारांच्या पायातली बेडी ठरलेले महारवतन रद्द करण्यात यावे, नागपूरचे दीक्षामैदान आंबेडकरांचे स्मारक उभारण्यासाठी दलितांना मिळावे, अशा पक्षातर्फे मागण्या करण्यात आल्या.

दादासाहेब गायकवाड हे रिपब्लिकन पक्षाचे जेष्ठ नेते होते. भूमिहीनांच्या प्रश्नाबद्दल त्यांना मनापासून आस्था होती. इ.स. १९५९ साली औरंगाबाद येथे रिपब्लिकन पक्षाचे पहिले अधिवेशन भरले. या अधिवेशनात जमिनीचे राष्ट्रीयकरण करण्यात यावे आणि

सामुदायिकरित्या शेती करावी असा ठराव करण्यात आला. यानंतर ऑगस्ट-सप्टेंबर इ.स. १९५९ मध्ये दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली धुळे, जळगाव व नाशिक जिल्ह्यांत रिपब्लिकन पक्षातर्फे सत्याग्रह करण्यात आला. या सत्याग्रहात शासनाच्या मालकीची पडित जमीन भूमिहीनांना वाटण्यात यावी, ही मागणी होती. पण जातिनिरपेक्ष पायावर लहान शेतकरी व भूमिहीन शेतमजूर यांच्या कायम स्वरूपाच्या संघटना बांधण्यासाठी पक्षनेत्यांनी काहीच प्रतिसाद दिला नाही. साहजिकच शासकीय आश्वासनांपलीकडे या सत्याग्रहांतून काहीच हाती लागले नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनामुळे दलितांच्या चळवळीत नेतृत्वाची फार मोठी पोकळी निर्माण झाली. ती भरून काढण्यासाठी सामुदायिक नेतृत्वाची कल्पना पुढे आली. यातून पक्षाच्या नेतेपदी अठरा सभासदांच्या एका प्रेसिडियमची स्थापना करण्यात आली. पण हे ऐक्य फार काळ टिकले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बरोबरी करू शकेल असा दुसरा नेता दलितवर्गाजवळ नव्हता. डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूनंतर दादासाहेब गायकवाड यांच्याकडे पक्षाचे नेतृत्व आले. दादासाहेब गायकवाड अनुभवी कार्यकर्ते व कुशल संघटक होते. पण उच्च शिक्षणाची त्यांना संधी लाभली नव्हती. त्यामुळे सैद्धान्तिक पातळीवरून पक्षाच्या ध्येयधोरणाची मांडणी करणे त्यांना साधण्यासारखे नव्हते. याच वेळी दलितवर्गातील उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या लोकांमध्ये पक्षाची सूत्रे हाती घेण्याची महत्त्वाकांक्षा बळावत होती. रिपब्लिकन पक्षाची घटना तयार करण्याबाबत झालेल्या मतभेदांवरून जुन्या व नव्या पुढाऱ्यांतील अंतर वाढत गेले. ३ ऑक्टोबर १९५८च्या आत पक्षाची घटना तयार करून त्याप्रमाणे पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका घेण्यात याव्या असे प्रेसिडियमच्या पहिल्या बैठकीत ठरविण्यात आले होते. पण ठरलेल्या मुदतीच्या आत घटना तयार न झाल्यामुळे ३ ऑक्टोबर १९५८ नंतर जुना पक्ष बरखास्त झाला अशी विरोधी मंडळींनी भूमिका घेतली. मे १९५९ला नागपूर येथे त्यांनी आपली वेगळी परिषद घेतली. आणि आवळे, बी. सी. कांबळे व द. ता. रूपवते यांच्या नेतृत्वाखाली ‘दुरुस्त’ रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली.

१९५७च्या निवडणुकीनंतर प्रजासमाजवादी पक्ष संयुक्त महाराष्ट्र समितीतून बाहेर पडला. दुरुस्त रिपब्लिकन पक्षाने प्रजासमाजवादी पक्षाशी सहकार्य केले व पहिल्या रिपब्लिकन पक्षाने कम्युनिस्टांशी हातमिळवणी केली आहे, असा त्यांच्यावर आरोप केला. जुन्या रिपब्लिकन पक्षाच्या कार्यक्रमापेक्षा दुसरा वेगळा कार्यक्रम मात्र यांना जनतेसमोर ठेवता आला नाही. मात्र त्यांनी भूमिहीनांच्या सत्याग्रहाला विरोध दर्शविला आणि अर्थव्यवस्थेत बदल घडवून आणण्याच्या कार्यक्रमाला गौण मानून बौद्धांच्या धार्मिक वेगळेपणावर भर दिला. इ.स. १९६२च्या निवडणुकीत दुरुस्त रिपब्लिकन पक्षाने प्रजासमाजवाद्यांशी, तर पहिल्या रिपब्लिकन पक्षाने संयुक्त महाराष्ट्र समितीशी सहकार्य केले. पण आपसांतील भांडणामुळे डाव्या पक्षांची या निवडणुकीत पिछेहाटच झाली. रिपब्लिकन पक्षातील दोन्ही गटांचा या निवडणुकीत बहुतेक ठिकाणी पराभव झाला.

## रिपब्लिकन पक्षाची वाताहात

इ.स. १९६२च्या निवडणुकीतील अपयशानंतर रिपब्लिकन पक्षातील निरनिराळ्या गटांना एकत्र आणण्याचे अनेक प्रयत्न झाले. पण यात यश आले नाही. उलट आपसातील मतभेदांवरून प्रत्येक गटाचे आणखी तुकडे होत गेले. याकाळात समाजवादी व कम्युनिस्ट यांच्यापैकी कोणाच्याही साह्याने निवडणुका जिंकणे रिपब्लिकन उमेदवारांना शक्य नव्हते. तर महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून काँग्रेस पक्षाचे सामर्थ्य वाढत गेले होते. हे लक्षात घेऊन गायकवाड गटाचा कल हळूहळू काँग्रेसकडे झुकू लागला. इ.स. १९६७च्या निवडणुकांपूर्वी जागावाटपाबाबत काँग्रेसशी समझोता करण्याचा या गटाने प्रयत्न केला. पण तो अयशस्वी ठरला. मात्र इ.स. १९६७च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर महाराष्ट्र जिल्हा परिषद व नगरपालिका यांच्या निवडणुका झाल्या. यांमध्ये गायकवाड गटाने काँग्रेसशी युती केली. यावेळी सत्ताधारी पक्षाच्या मदतीने स्थानिक संस्थांतील जागाही त्यांना मिळाल्या. मात्र गावोगाव दलितांना ज्या अन्यायांना सामोरे जावे लागत होते त्यांना पायबंद घालण्यास या युतीचा काहीच उपयोग झाला नाही. उलट विरोधी पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाचे असलेले अस्तित्व मात्र संपुष्टात आले. शहरातील दलित कामगार व मध्यमवर्ग आणि खेड्यातील लहान शेतकरी व शेतमजूर यांची एक बळकट संघटना रिपब्लिकन पक्षामार्फत घडून येईल अशी आशा होती. पण याकाळातील सामाजिक राजकीय घटनांनी ती निष्फळ ठरविली. परिणामी रिपब्लिकन पक्ष हा इतर डाव्या पक्षांना अपवाद ठरू शकला नाही, हेच खरे.

## दलित पँथर

बेकारी, महागाई, दुष्काळ, उपासमार आणि गावोगावी दलितांवर होणारे अत्याचार यांमधून दलित वर्गातील युवकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला होता. तर दुसऱ्या बाजूने सर्व दलितांना संघटित करण्यात रिपब्लिकन पक्ष अपयशी ठरला होता. इ.स. १९७१ मध्ये 'इलाया पेरूमल' समितीचा अहवाल प्रसिद्ध झाला. या अहवालात दलितांवर होणाऱ्या अत्याचारांची नोंद केलेली आहे. अशा अवस्थेतून दलितवर्गाला बाहेर काढण्यासाठी त्यांच्यामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक सुधारणा घडवून आणणे आवश्यक होते. पण याहीपेक्षा संपूर्ण समाजातील संरचनेत परिवर्तन घडविणे आवश्यक होते. यातूनच ९ जुलै १९७२ मध्ये दलित पँथरची स्थापना झाली.

दलित पँथरची धुरा ज्यांनी खांद्यावर घेतली ते नेते एकाबाजूने साहित्यनिर्मितीही करीत होते. उदाहरणार्थ, नामदेव ढसाळ, राजा ढाले, ज. वि. पवार, प्रा. अरुण कांबळे, रामदास आठवले इत्यादी या चळवळीचे नेते आहेत. यांनी मराठी साहित्यातील परंपरावाद, जातीय अहंकार, समाजविन्मुखता इत्यादींना विरोध केला आणि साहित्यात दलित वर्गाच्या वेदना, विद्रोहाचे आणि आशाआकांक्षांचे प्रतिबिंब पडले पाहिजे असा आग्रह धरला. या नेत्यांनी सवलतींच्या व निवडणुकीच्या राजकारणाला विरोध केला. या

नेत्यांचे निर्भय वागणे, यांच्याठायी वसणारी बेदरकार वृत्ती आणि यांच्या तोंडीची सर्वांगीण क्रांतीची जहाल भाषा यामुळे दलितांमधील तरुण वर्ग मोठ्या संख्येने यांच्या चळवळीकडे आकर्षित झाला. तसेच या चळवळीला सुशिक्षित मध्यमवर्ग, औद्योगिक कारखान्यांमधील कामगार आणि झोपडपट्टीतील बेकार तरुण यांचाही पाठिंबा मिळाला. या सर्वांतून दलित पँथर ही एक लढाऊ व प्रतिकारक्षम संघटना ठरेल अशी आशा निर्माण झाली.

दलित पँथर चळवळ सुरुवातीला महाराष्ट्राच्या शहरी भागात सुरू झाली. नंतर ग्रामीण भागातही या चळवळीचा प्रसार झाला. गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश अशा अन्य राज्यांमध्येही दलित पँथर चळवळ पसरली. पँथरने आपल्या कर्तृत्वाच्या माध्यमातून मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीत विशेष भूमिका पार पाडली. तसेच, भूमिहीनांचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. खेड्यातील जातीव्यवस्थेला सरंजामशाही पद्धतीला विरोध केला. शेतमजुरीचे दर वाढले पाहिजेत यासाठी प्रयत्न केले. सर्व उत्पादनाच्या साधनांवर दलितांना हक्क मिळाले पाहिजेत, दलितांना रोजगार मिळाला पाहिजे, दलितांना मोफत शिक्षण, स्वस्त धान्य, निवाऱ्याची सोय असली पाहिजे. दलितांचे आर्थिक शोषण थांबले पाहिजे, जीवनोपयोगी वस्तूंचे भाव कमी झाले पाहिजेत यासाठी दलित पँथरने सर्वसमावेशक भूमिका घेतली.

दलित पँथरने अनुसुचित जाती व जमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, गरीब शेतकरी व शेतमजूर या सर्वांना एकत्र आणून सर्वंकष आर्थिक, राजकीय व सामाजिक क्रांती घडवून आणण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. आर्थिक उन्नतीचा कार्यक्रम डोळ्यांसमोर ठेवून त्यादृष्टीने श्रमिकांच्या वर्गीय संघटना बांधण्याची मनीषा तिने बाळगली. याकरिता समाजातील इतर पुरोगामी पक्ष व संघटना यांच्याशी सहकार्य करण्याची तिने तयारी दर्शविली. पण प्रत्यक्षात अशी भूमिका घेऊन त्यादृष्टीने कामकाज पँथरमध्ये झाले नाही. उलट पँथरचे नेते स्वार्थी राजकारण करू लागले. इ.स. १९७७च्या सार्वत्रिक निवडणुकीत कोणत्या राजकीय पक्षाला पाठिंबा द्यावा यावरून नामदेव ढसाळ आणि राजा ढाले यांच्यात मतभेद निर्माण झाले. या मतभेदाचा परिणाम म्हणून राजा ढाले यांनी स्वतंत्र ‘मासमुव्हमेंट’ नावाची नवी संघटना स्थापन केली. त्यामुळे दलित पँथरमध्ये फूट पडली. पँथरच्या फुटीमुळे दलित कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण झाली. दलित पँथर चालविण्याच्या उद्देशाने यांनी ‘भारतीय दलित पँथर’ ही संघटना निर्माण केली व अध्यक्ष म्हणून प्रा. अरुण कांबळे यांची निवड करण्यात आली. दलित पँथरच्या नेतृत्वामुळे तर कधी वैचारिक मतभेदामुळे फूट निर्माण होऊन ही चळवळ विविध गट व उपगटांमध्ये विभागली गेली.

दलित पँथर चळवळीचे मूल्यमापन करायचे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर दलित पँथरने दलित चळवळीचे नेतृत्व अतिशय आक्रमक व

खंबीरतेने केले. दलित पँथरने मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या लढ्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली व नामांतराचा लढा यशस्वी केला. दलितांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी व त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. दलितांवर होणाऱ्या अत्याचारांना आक्रमकतेने तोंड दिले. दलितांमध्ये जाणीव जागृती निर्माण करून त्यांच्यात संघटन घडवून आणले. दलित पँथरच्या विघटनामुळे मात्र गतिमान झालेल्या दलित चळवळीला खीळ बसली. तरीही दलित पँथरने दलितांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. त्यांना निर्भिडपणे संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. म्हणून दलित चळवळीमध्ये दलित पँथरची भूमिका महत्त्वाची ठरते.

### मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ

भारतीय दलित चळवळीच्या इतिहासात 'मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ' विशेष महत्त्वाची ठरते. या चळवळीचा संबंध समाज परिवर्तनाशी व पुरोगामी विचाराशी होता. मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ म्हणजे मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याकरिता करण्यात आलेली चळवळ होय.

मराठवाड्याचे महाराष्ट्रात विलीनीकरण होण्यापूर्वी या भागात एकही महाविद्यालय नव्हते. ही परिस्थिती लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी औरंगाबाद येथे इ.स. १९५० साली मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. यानंतर मराठवाड्याला स्वतंत्र विद्यापीठ असावे अशी मागणी पुढे आली. मराठवाड्यातील प्रमुख नागरिक, शिक्षणतज्ज्ञ आणि विधीमंडळाच्या सदस्यांनी या मागणीचा पाठपुरावा केला. २७ एप्रिल १९५७ मध्ये मुंबई राज्याच्या विधीमंडळाने न्यायमूर्ती पळणीटकर यांच्या अध्यक्षतेखाली 'मराठवाडा विद्यापीठ समिती' स्थापन करण्यात आली. या समितीच्या अहवालानुसार २३ ऑगस्ट १९५८ रोजी मराठवाडा विद्यापीठ स्थापन करण्यात आले.

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी दलित पँथरचे नेते श्री. गंगाधर गाडे यांनी सर्वप्रथम ७ जुलै १९७७ रोजी केली. विविध विद्यार्थी संघटनेच्या कृती समितीनेही याला पाठिंबा दिला. डॉ. आंबेडकर यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचे उचित स्मारक मराठवाड्यात असावे म्हणून मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव दिले जावे, असे सर्वानुमते ठरले. या ठरावाची अंमलबजावणी सरकारने न केल्यामुळे दलित पँथरचा उठाव, विद्यार्थ्यांच्या चळवळी, प्राध्यापकांचा मोर्चा व जन-आंदोलन पुकारण्यात आले. याचा परिणाम म्हणून मराठवाडा विद्यापीठ कार्यकारिणी समितीने २५ जुलै १९७७ रोजी विद्यापीठ नामांतराचा ठराव पास केला. तसेच २७ जुलै १९७८ रोजी महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी विद्यापीठ नामांतराचा ठराव संमत केला. नामांतराच्या लढ्यात दलितेतर समतावाद्यांचाही सहभाग होता. तसेच नामांतरासाठी दलित पँथरने मुंबई, दिल्ली व औरंगाबाद येथे मोर्चे काढले.

दलित पँथरने नामांतराची चळवळ मजबूत करण्यासाठी तीव्र आंदोलने केली व मोर्चे काढले. मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढा हा स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांचा सर्वात मोठा लढा होता.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराला ज्यांचा विरोध होता त्यांनी 'मराठवाडा ही आमची अस्मिता आहे. त्यामुळे मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करू नये.' अशी भूमिका घेतली. मराठवाडा विद्यापीठ नामांतराची चळवळ सतत १७ वर्षे चालली. मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीच्या बाजूने कार्य करणाऱ्या नेत्यांमध्ये नामदेव ढसाळ, प्रा. जोगेंद्र कवाडे, रामदास आठवले, रा. सु. गवई, बाबासाहेब गोपले, भाई संगारे, हाजी मस्तान, गंगाधर गाडे, गौतम वाघमारे, पोचीराम कांबळे, शंकरराव खरात, प्रा. अरुण कांबळे या नेत्यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. तसेच दलित पँथर, रिपब्लिकन पक्ष, युवक क्रांती दल, भीमसेना, भारिप (गवई), फॉरवर्ड ब्लॉक, छात्र युवा संघर्ष वाहिनी, नामांतर कृती समिती या संघटनांचेही कार्य महत्त्वाचे मानले जाते. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर विरोधामध्ये नामांतर विरोधक विद्यार्थी कृती समिती, मराठवाडा दैनिकाचे संपादक अनंत भालेराव, मराठवाड्यातील स्वातंत्र्यसेनानी व सामाजिक कार्यकर्ते पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ, प्रा. नरहर कुरुंदकर, प्रा. स. दि. महाजन, शिवाजी मुंढे यांसारख्या व्यक्ती आणि संघटनांचा उल्लेख करता येईल. या विद्यापीठाच्या नामांतराला विरोध करण्यासाठी नामांतर विरोधक या निमित्ताने एकत्र आले. तसेच नामांतर समर्थकांनीही या चळवळीचे समर्थन करण्यासाठी लढे उभारले. प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या नेतृत्वाखाली मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्यावतीने नागपूर ते औरंगाबाद असा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून इतर लोकही सहभागी झाले होते. शेवटी महाराष्ट्र विधीमंडळात १४ जानेवारी १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार करण्यात आला.

मराठवाडा विद्यापीठ नामांतराची चळवळ हा दलित चळवळीतील स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मोठा लढा होता. या प्रश्नावरून मराठवाडा व विदर्भात दंगली घडून आल्या. जनार्धन मवाडे, पोचीराम कांबळे, गौतम वाघमारे या लढ्यात शहीद झाले. मात्र दलित पँथरने नामांतराचा ठराव मांडण्यापासून ते नामांतर घडून येईपर्यंत आपली भूमिका कायम ठेवली. मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ ही स्वातंत्र्योत्तर काळातील मोठी चळवळ होती आणि १४ जानेवारी १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा झालेला नामविस्तार हे या चळवळीचे फलित आहे.

### महाराष्ट्रातील दलित चळवळीचा आढावा

महाराष्ट्रातील दलित चळवळीचा विचार करताना या चळवळीचा विकास वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये झालेला दिसतो. यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व दलित चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकरकालीन दलित चळवळ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरोत्तर दलित

चळवळ व सद्यकालीन दलित चळवळ असे टप्पे सांगता येतात. यांपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व दलित चळवळ ही दलितवर्गामध्ये जाणीव जागृती निर्माण करणारी, त्यांच्या मनात आत्मसन्मानाची ज्योत पेटवू पाहाणारी होती. त्याचप्रमाणे ही चळवळ दलितसमाजातील अंतर्गत सुधारणांवर भर देणारी होती. म्हणून या चळवळीमध्ये विद्रोहाची तीव्रता कमी आहे. या कालखंडातील विशेषत: अब्राह्मणी प्रवाहातील समाजसुधारकांची कामगिरी दलित चळवळीच्या संदर्भात महत्त्वाची ठरते.

दलित चळवळीतील दुसरा कालखंड हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरकालीन दलित चळवळीचा कालखंड आहे. या कालखंडात दलित चळवळीने स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय या मानवी मूल्यांना महत्त्व दिले व त्यांच्या प्राप्तीसाठी आग्रह धरीला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या काळातील दलितवर्गाचे सर्वोच्च नेते होते. त्यांच्या नेतृत्वाखाली दलित चळवळीने दलितांमध्ये क्रांतिकारी जाणीव, स्वाभिमान, प्रचंड आत्मविश्वास, स्वतंत्र अस्मिता, विज्ञाननिष्ठा, मूल्य स्वीकारण्याची तयारी व स्व-हक्काविषयी जाणीव जागृती इत्यादी गोष्टी घडवून आणल्या. दलितांची सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक इत्यादी क्षेत्रातील वंचितता दूर करण्यासाठी भगीरथ प्रयत्न केले. आणि दलित वर्गांना मानवी हक्क मिळवून दिला.

दलित चळवळीच्या दुसऱ्या टप्प्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबरोबर अनेक कार्यकर्त्यांनी आपआपल्या शक्तीनुसार योगदान दिले आहे. त्यातील काहींचा नामनिर्देश करणे जरुरीचे आहे. यांमध्ये दादासाहेब गायकवाड, श्री. जी. टी. मेश्राम, श्यामसुंदर, बी. एस. व्यंकटराव, एन. शिवराज, बी. सी. कांबळे, आर. एस. गवई, सोनुले, वराळे, बी. डी. खोब्रागडे इत्यादींचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरोत्तर दलित चळवळ हा या चळवळीचा तिसरा टप्पा होय. या काळात रिपब्लिकन पक्ष, पक्षांतर्गत गटबाजी, दलित साहित्य चळवळ, दलित पँथरची चळवळ, मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ यांच्या माध्यमातून जोरदार विद्रोह पुकारलेला दिसतो.

या काळातील चळवळीमध्ये झालेले संघर्ष, पडलेली फूट इत्यादींमुळे निराश झालेला दलित तरुण वर्ग साहित्यनिर्मितीकडे वळलेला दिसतो. साहित्य हे सांस्कृतिक बदल घडवून आणण्याचे हत्यार आहे, या विचाराने प्रेरित होऊन यावर्गाने साहित्यनिर्मिती केली आहे. यातूनच 'दलित साहित्याची चळवळ' उदयाला आली. इ.स. १९६० नंतर दलित साहित्याचा प्रवाह सुरू झाला. पहिल्या पिढीतील अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात यांच्या साहित्यकृतीतून पददलितांच्या दु:खाचे वस्तुनिष्ठ चित्रण केलेले दिसते. मात्र डॉ. आंबेडकरांनंतरच्या दुसऱ्या पिढीतील लेखकांच्या लिखाणात नकार, विरोध, वेदना,

बंडखोरी, विद्रोह मोठ्या प्रमाणात दिसून येतो. बाबुराव बागूल, केशव मेश्राम, योगिराज वाघमारे, ना. र. शेंडे, अविनाश डोळस, प्रकाश खरात, दया पवार, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, शरणकुमार लिंबाळे व गंगाधर पानतावणे इत्यादींच्या लेखनातून दलितांच्या वास्तव जीवनाचे व चळवळीचे चित्रण रेखाटलेले आहे. थोडक्यात दलित चळवळीमध्ये साहित्य चळवळीचे योगदान महत्त्वाचे ठरते. दलित चळवळीच्या समांतरतेने दलित साहित्य चळवळीचा प्रवाह वाहाताना दिसतो. दलित साहित्याने दलितांवर झालेला अन्याय, वेदना, दु:ख आणि विद्रोह यांना वाचा फोडली. म्हणून या काळातील दलित चळवळीचा मागोवा घेताना दलित चळवळ व या चळवळीला समांतर असणारी दलित साहित्य चळवळ असा दुहेरी पातळीवर घ्यावा लागतो.

वर्तमानकालीन दलित चळवळीचा विचार केला तर सध्या या चळवळीचे स्वरूप एकसंध राहिलेले नाही. याला कारण पक्षांमधील नेत्यांमध्ये एकी नसणे, स्व अहंकार व स्वार्थ यांना महत्त्व असणे आणि आजच्या राजकारणाचा एक भाग म्हणून चळवळीकडे पाहाणे यांसारख्या गोष्टी सांगता येतील. याचा परिणाम म्हणून आज या चळवळीमध्ये एकात्मता राहिलेली नाही, परिणामी लढा देण्याची ताकदच ही चळवळ हरवून बसते की काय अशी भीती निर्माण झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर या चळवळीला त्यांच्या तोडीचे खंबीर नेतृत्व मिळू शकलेले नाही. याचाही परिणाम या चळवळीच्या आजच्या अपयशी वाटचालीमध्ये आहे. दलित नेत्यांमधील सत्ता संघर्षामुळे व स्वार्थी राजकारणामुळे दलित चळवळीची गती कमी झाली आहे. गेल्या दोन दशकापासून 'बहुजन समाज पार्टी' दलितांच्या कल्याण व विकासासाठी कार्य करीत आहे. परंतु कांशीराम व मायावती यांच्या स्वार्थी राजकारणामुळे दलित चळवळीचे विघटन होत आहे.

भारतात आजही जातीयतेचे राजकारण केले जाते. साहजिकच जातियतेचे उच्चाटन होण्याऐवजी जातिव्यवस्था राजकारणाद्वारे आपला पाया भक्कमपणे रोवून उभी आहे. भारत सरकारने दलितांची विभागणी अनुसूचित जाती, जमाती, मागासवर्गीय, दुर्बल घटक, इतर मागासवर्गीय अशा वेगवेगळ्या गट व उपगटात केली आहे. ही एक प्रकारची सरकारी वर्णव्यवस्थाच आहे. यामुळे देखील दलित चळवळीमध्ये अडथळा निर्माण झाला आहे. एकूण जाती-जातीमधील श्रेष्ठ कनिष्ठत्वाची भावना आजही अस्तित्वात आहे. जातीवादावरून आजही संघर्ष घडत आहेत, दलित चळवळीचा वापर स्वार्थी राजकारणासाठी करून घेतला जात आहे, या सर्वांमुळे दलित चळवळीचे अस्तित्व आज धोक्यात आले आहे.

थोडक्यात सद्यकालीन चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपला नेता मानते. त्यांची पूजा करते. मात्र आंबेडकरवादाचा वैचारिक व तात्त्विक वारसा सांभाळीत नाही. वास्तविक पाहाता दलित नेत्यांमध्ये आंबेडकरवाद हा एकमेव आदर्श आहे आणि तरीही

त्यांच्यात मतभेद आहेत. भारतीय दलित चळवळीच्या उदयामागील कारणे आजही अस्तित्वात आहेत. उदाहरणार्थ, सामाजिक विषमता, वंचिततेची भावना, दलितांवर होणारे अन्याय, अत्याचार, म. फुले आणि डॉ. आंबेडकरांची प्रेरणा, दलितांमध्ये निर्माण झालेली जाणीव-जागृती, शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार, दलितांच्या हितसंबंधांची पूर्तता करणे, अनिष्ट रूढी-प्रथांचा नायनाट करणे आणि समाजहितासाठी सरकारवर दडपण आणणे इत्यादी सांगता येतील.

शिक्षणाने आर्थिक विकास साधलेला शहरी दलित समाज सोडला तर आजही शहरातील बकाल झोपडपट्टीत राहाणारा व खेडोपाडी राहाणारा दलित पीडलेला, नाडलेलाच आहे. अशा दलितांच्या विकासासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचारांना प्रमाण मानून कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची गरज आहे. नेत्याची गरज आहे आणि त्याचबरोबरीने दलित चळवळीतील सर्व प्रवाहांनी एकत्र येणेही गरजेचे आहे. तरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेली सामाजिक लोकशाही भारतामध्ये खऱ्या अर्थाने प्रस्थापित होईल. आणि म्हणून दलित चळवळीचे प्रश्न हे निव्वळ दलितांचे प्रश्न नाहीत तर संपूर्ण राष्ट्राचे प्रश्न आहेत. तळागाळातील पददलितांचे जीवन उन्नत होण्यातच राष्ट्राची उन्नती सामावलेली आहे. आणि म्हणून जोपर्यंत भारतीय समाजात सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादी प्रकारची विषमता अस्तित्वात आहे, तोपर्यंत आंबेडकरवादाचा वैचारिक व तात्त्विक वारसा समर्थपणे पेलणाऱ्या दलित चळवळीची नितांत गरज आहे.

व्यापक पायावर उभा असणारा लोकशाही समाजवादी पक्ष स्थापन करणे हे डॉ. आंबेडकरांचे ध्येय होते. म्हणून दलितांची चळवळ केवळ जातीय बनू नये याची खबरदारी डाव्या पक्षांनीही घेतली पाहिजे. अस्पृश्यता हा भारतातील जातिव्यवस्थेचा एक अविभाज्य घटक आहे. म्हणून जातिव्यवस्थेला मूठमाती दिल्याशिवाय अस्पृश्यता समूळ नष्ट होणार नाही. भारतीय व्यक्तीचे अवघे जीवन या जातिव्यवस्थेने नियमित केले आहे. प्रत्येक माणसाच्या दैनंदिन व्यवहारावरही या जातीचा ठसा उमटलेला दिसतो. म्हणून भारतीय समाजाला वर्गहीन होणे एकवेळ शक्य होईल पण जातीच्या संस्कारातून सुटणे ही तेवढीशी सोपी गोष्ट नाही. म्हणून जातीच्या प्रश्नाबाबत उदासीन राहिल्याने जात आपोआप नष्ट होईल, ही समजूत भ्रामक आहे. याकरिता भारतातील दलित चळवळ व डाव्या पक्षांची चळवळ यांनी एकत्र आले पाहिजे. अंतर्मुख झाले पाहिजे. स्वत:मधील उणीवा शोधून काढल्या पाहिजेत. या उणीवा नाहीशा करण्याचा मार्ग शोधला पाहिजे आणि भारतीय पददलितांची, कष्टकरी वर्गाची एक संयुक्त आघाडी उभारली पाहिजे. असा प्रयत्न झाला तरच काँग्रेसला एक तुल्यबळ विरोधी पक्ष निर्माण होईल. असा तुल्यबळ विरोधीपक्ष निर्माण करण्याचे स्वप्न 'रिपब्लिकन पक्षा'च्या रूपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाहिले होते. डॉ. आंबेडकरांचे हे स्वप्न वास्तवात साकार झाले तरच बुद्धाच्या शिकवणुकीशी सुसंगत असलेली संसदीय लोकशाही अस्तित्वात येईल.

महाराष्ट्रातील दलित चळवळीचा विचार करताना जागतिकीकरण व दलित चळवळ असाही विचार करणे आज गरजेचे आहे. कारण जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून सर्वांनाच जाणे भाग आहे. दलित चळवळीलाही हे आव्हान पेलावे लागणार आहे.

विसाव्या शतकाच्या शेवटच्या उत्तरार्धात जागतिकीकरण व खाजगीकरण यांची जागतिक लाट निर्माण झाली आणि २१व्या शतकाचे पहिले दशक संपताच ही प्रक्रिया आता स्थिरावू लागलेली आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया ही सर्वंकष प्रक्रिया आहे. तिचे परिणाम सर्व मानव जातींवर होत असून ते आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा विविध तऱ्हेचे आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे परिणाम दलितवर्ग व दलितांची चळवळ यांवर होणेही क्रमप्राप्तच आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेवर लक्ष टाकले तर सहज लक्षात येते की जागतिकीकरणामध्ये गुणवत्ता व स्पर्धा यांना फार महत्त्व आहे. व ज्याच्याकडे गुणवत्ता आहे त्याच्या बाबतीत विकास होताना धर्म, जात, भाषा या अडचणी येत नाहीत. म्हणून दलित नेत्यांनी, दलित लेखकांनी आपले दलितत्व बाजूला ठेवून या प्रक्रियेला सामोरे गेले पाहिजे. जागतिकीकरणाचे आव्हान पेलण्यासाठी दलित चळवळीने दलितांवरील अन्याय, आर्थिक विषमता यांकडे विधायक दृष्टीने पाहिले पाहिजे. आजच्या परिस्थितीला जागतिकीकरण जबाबदार आहे की शासकीय योजनांचे अपयश, लोकशिक्षणाची कमतरता या गोष्टी जबाबदार आहेत, याकडे डोळसपणे पाहिले पाहिजे. सर्वप्रथम तळागाळातील दलित समाजाच्या मनातील गरीबीसंदर्भातील, अन्यायासंदर्भातील असुरक्षिततेची भावना घालविली पाहिजे.

जातिनिष्ठ समाजाचे रूपांतर आता हळूहळू वर्गीय स्वरूपात होऊ लागले आहे. प्रत्येक जातीमध्ये आत 'तीन' वर्ग निर्माण झालेले पाहावयास मिळतात. असे 'वर्ग' आज दलित समाजातही पाहावयास मिळतात. दुसरे म्हणजे आजच्या काळात अनेक जातींच्या विघटनाची प्रक्रियाही सुरू झालेली दिसते, हे विघटन फक्त आर्थिक स्वरूपाचेच नाही तर राजकीय स्वरूपाचेही आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर यांसारख्या संघटना आज दलितांचे नेतृत्व करण्यात अपयशी ठरत आहेत, असे चित्र दिसते. म्हणून आज फक्त जाती व अस्पृश्यता यांच्याबद्दल बोलून प्रश्न सुटणार नाहीत. तर दलित समाजाने गुणवत्ता वाढविण्यादृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. दलित वर्गापैकी नवबौद्ध समाजाने गुणवत्ता वाढवून बऱ्यापैकी आपला विकास साधला आहे. अशा विकसित दलितांनी आपल्या इतर बांधवांसाठी दलितत्त्व, जात, राखीव जागा इत्यादींच्या कुबड्या टाकून देऊन इतरांबरोबर स्पर्धेत उतरणे गरजेचे आहे.

दलितांच्या प्रश्नासंदर्भात राजकीय नेत्यांची आजची भूमिका पाहाता राजकीय पक्षांचे नेते दलितांच्या विकासाबाबत बोलतात पण या योजनांच्या अंमलबजावणीतील

अप्रामाणिकपणाकडे मात्र कानाडोळा करतात. आजच्या दलित नेत्यांनाही याच नेत्यांशी संबंध ठेवून सत्तेमध्ये वाटा मिळवायचा असतो. त्यामुळे तेही गप्प बसताना दिसतात. असे न करता या नेत्यांनी दलितांमध्ये खरेखुरे गरीब आहेत त्यांच्याकरिता खास योजना राबविल्या पाहिजेत. जसे 'बेकारी' हा प्रश्न जागतिकीकरणाने निर्माण केलेला नाही तर भारतीय शिक्षणव्यवस्थेच्या दोषामुळे निर्माण झालेली आहे. हे लक्षात घेऊन सक्तीच्या शिक्षणाबरोबर सकस व जीवनोपयोगी शिक्षणाची मागणी केली पाहिजे. विकासाची धोरणे राबविण्यावर भर दिला पाहिजे. कारम दलितांच्या प्रश्नांचे स्वरूप जसे सामाजिक आहेच पण या प्रश्नाची तसेच आर्थिकबाजूही लक्षात घेणे गरजेचे आहे.

पददलितांच्या विकासासाठी राखीव जागा हा एक पर्याय आहे, पण तो एकमेव मार्ग ठरता कामा नये. म्हणून केवळ राखीव जागांचा आग्रह धरणे योग्य नाही. कारण राखीव जागांमुळे विकास कुंठीत होतो याचे भान दलित नेत्यांनी व दलित समाजानेही ठेवले पाहिजे. आज रोजगाराची अनेक क्षेत्रे राखीव जागांच्या बाहेर आहेत. विशेषत: सेवा क्षेत्रात रोजगाराच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत. आज जागतिकीकरणात शासकीय कार्यक्षेत्रे लहान होत जाताना दिसतात आणि उदारीकरण व खाजगीकरण यामुळे शासकीय क्षेत्राबाहेर विपुल संधी उपलब्ध होत आहेत. दलित नेत्यांनी या गोष्टीचा फायदा करून घेतला तर आर्थिक समतेच्या दिशेने दलित वर्गाची चांगली प्रगती साधली जाईल.

थोडक्यात सामाजिक-राजकीय पातळीवरील जातीय विघटनाची प्रक्रिया, प्रत्येक जातीत निर्माण झालेले तीन वर्ग, या वर्गांच्या भिन्न प्रवृत्ती, दलित नेतृत्त्वाची राजकीय सत्ताकांक्षा आणि जागतिकीकरणाची प्रक्रिया या सर्वांचा परिणाम म्हणून आज दलित चळवळ कुंठीत झालेली दिसते. आजच्या दलित नेतृत्त्वाने याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. कालप्रमाणे आजही दलितांच्या विकासासाठी इतर समाजातील लोक प्रामाणिकपणे काम करीत आहेत. या दलितेतर लोकांच्या मनात दलित समाजाला विकास व्हावा अशी सक्रिय भावना आहे. दलित नेत्यांनी या गोष्टीचा चांगल्यातऱ्हेने उपयोग करून घेतला पाहिजे. आणि याचबरोबरीने जागतिकीकरणाच्या युगात दलितांच्या विकासाच्या स्वतंत्र चळवळीचा आग्रह न धरता सर्वंकष पातळीवरील सामाजिक व आर्थिक समतेच्या चळवळीचा विचार केला पाहिजे व त्यादृष्टीने पाऊले उचलली पाहिजेत.

❖❖❖❖❖

# ३

# दलित साहित्याची प्रेरणाशक्ती

उद्दिष्ट्ये :

१) दलित चळवळीच्या प्रेरणाशक्तीचा मागोवा घेणे.

२) गौतम भगवान बुद्ध यांचा धर्मविषयक विचार दलित साहित्यकृतीतील आशय समजावून घेण्याकरिता अभ्यासणे.

३) म. जोतिराव फुले यांचे सामाजिक, वाङ्‌मयीन कार्य समजावून घेणे.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्वांगीण कार्यकर्तृत्वाचा परिचय करून घेणे.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय भूमिकेच्या संदर्भात तत्कालीन राजकीय नेते म. गांधी यांचे एकूण भारतीय राजकारणासंदर्भातील भूमिका जाणून घेणे म्हणून म. गांधी यांच्या भूमिकेचा थोडक्यात परिचय करून घेणे.

६) दलित चळवळीचे प्रेरणास्थान निश्चित करणे.

दलित साहित्याचे स्वरूप पाहाण्या अगोदर या साहित्यप्रवाहाच्या मुळाशी असणाऱ्या प्रेरणाशक्तीचा थोडक्यात परिचय करून घेणे महत्त्वाचे ठरेल.

## भगवान बुद्ध

दलित चळवळीचा पहिला प्रणेता महाकारुणिक तथागत बुद्ध हाच आहे. स्त्रीशूद्रातिशूद्रांना समान पातळीवर माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचे संपूर्ण इहवादी, लोकशाहीनिष्ठ, तत्त्वज्ञान प्रथम बुद्धाने दिले. याकरिता त्यांनी प्रज्ञा-मैत्री-प्रेम व करुणा या तत्त्वांना मानवतावादी धर्माचे केंद्र मानले. साहजिकच बुद्धतत्त्वज्ञानामध्ये 'मनुष्य' हेच मध्यवर्ती मूल्य ठरले. गौतम बुद्धाने शोषणाधिष्ठित जातिभेदांचा, अस्पृश्यतेचा किंबहुना सर्व पातळ्यांवरील सामाजिक विषमतेचाच धिक्कार केला. आणि या सर्वांना अधिष्ठान लाभलेल्या 'ईश्वराला' नाकारले.

गौतम बुद्धांनी आपल्या कार्याच्या केंद्रस्थानी मानवहीत मानले. त्यांनी विश्वशांती, स्वातंत्र्य, अहिंसा, नीतिमत्ता या महान जीवनमूल्यांना अनुसरून मानवी कल्याण साधले. मानवाला पतनापासून वाचविणारे त्याचा उत्कर्ष साधू पाहाणारे गौतमबुद्ध मानवतेचे व क्रांतिपरिवर्तनाचे पहिले प्रवर्तक ठरले. म्हणून 'बुद्धदर्शन' ही दलित साहित्याची तात्त्विक पार्श्वभूमी ठरली आहे. रा. ग. जाधव म्हणतात, 'दलित समाजाचे साहित्य-विषय होऊ शकणारे महान नाट्य बौद्धदर्शनाच्या कलोचित आंगवणाच्या प्रक्रियेत दडलेले आहे.'

गौतम बुद्धाचे तत्त्वज्ञान समता, स्वातंत्र्य, न्याय आणि नीतिमत्ता या सामाजिक मूल्यांवर उभे आहे. दलित साहित्यही याच मूल्यांची आवश्यकता प्रतिपादिते. बौद्धधर्म मानवाच्या प्रतिष्ठित व सुखी जीवनासाठी आवश्यक असणारी प्रज्ञा, करुणा व समता ही तत्त्वे शिकवितो. तसेच तो मानवाला जगण्यासाठी आवश्यक असणारे नीतिबळही पुरवितो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धर्मांतरासाठी बौद्धधर्म सर्वात योग्य धर्म वाटला. त्यांनी स्वत: या धर्माचा स्वीकार केला आणि त्यांच्यासोबत असंख्य दलितांनीही बौद्ध धर्म स्वीकारला. बुद्ध प्रेरणेतून दलितांना सामाजिक-सांस्कृतिक तेजस्वीता लाभली. 'बुद्धदर्शन' ही दलित साहित्याची तात्त्विक बैठक वा पार्श्वभूमी ठरते.

### महात्मा जोतिराव फुले

महात्मा जोतिराव फुले यांचा कालखंड हा अव्वल इंग्रजीचा कालखंड आहे. एकोणिसाव्या शतकात आधुनिक शिक्षण हे मानव व मानवी समाजाच्या उन्नतीचे साधन आहे. ही गोष्ट लक्षात आली. अस्पृश्यांची उन्नती साधायची तर त्यांच्या शिक्षणाकडे लक्ष पुरविले पाहिजे हे महात्मा फुलेंसारख्या समाजसुधारकांनी जाणले. त्यांनी ख्रिस्ती धर्मोपदेशकांपासून प्रेरणा घेतली आणि इ.स. १८५१ साली पुण्यात महारमांगांसाठी पहिली शाळा काढली. आपल्या घरचा पाण्याचा हौदही त्यांनी शूद्रातिशूद्रांसाठी खुला केला. जातिव्यवस्था ही ईश्वरनिर्मित नाही. उच्चवर्गाच्या स्वार्थीबुद्धीने तिला जन्माला घातले आहे. असे महात्मा फुले यांचे स्पष्ट मत होते. महात्मा फुले यांनी ब्राह्मणांच्या सांस्कृतिक मक्तेदारीवर जोरदार प्रहार केले आणि शूद्रातिशूद्रांना त्यांच्या हक्कांची सर्वात प्रथम जाणीव करून दिली. याच भावनेतून इ.स. १८७३ साली त्यांनी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. आणि ज्या धर्माच्या नावाने येथील बहुजन समाज अथवा दलित समाज भरडला जात होता त्या धर्मासंदर्भात, रूढीसंदर्भात स्फोटक असे लेखन केले.

महात्मा जोतिराव फुले यांचा लढा केवळ सामाजिक गुलामगिरी विरुद्ध नव्हता. सत्तांतर होवो अगर न होवो, स्वातंत्र्य, समतेवर उभा असणारा समाज त्यांना अभिप्रेत होता. अशा समाजाच्या निर्मितीकरिता त्यांचा लढा होता. त्यांच्या या कार्यामध्ये लोकहितवादी, न्या. रानडे यांसारख्या ब्राह्मण विचारवंतांनीही त्यांना साथ दिलेली दिसते. तर स्वामी दयानंद सरस्वतींसारख्या महात्म्यांबद्दल महात्मा फुले यांच्या मनात आदरभावही आढळतो. मात्र ज्या सनातनी ब्राह्मणवर्गाला विषमाधिष्ठित समाजव्यवस्था बरोबर व योग्य वाटत होती त्यांच्या ब्राह्मणी संस्कृतीवर म. फुले यांनी हल्ला केला. जातिभेद, धर्मभेद, चातुर्वर्ण्य या पिढीजात समाजसंस्थांवर कडाडून हल्ला करणारे महात्मा जोतिराव फुले हे पहिले बंडखोर समाजसुधारक ठरले.

महात्मा जोतिराव फुले यांनी दलित पीडित समाजाचे आर्थिक, सामाजिक, धार्मिक व राजकीय अशा सर्व पातळ्यांवरील उन्नयन चिंतिले. याकरिता त्यांनी अस्पृश्यतेविरोधात

व जातियतेविरोधात विचाराने व कृतीने हल्ले केले. त्यांच्या विचारांना दूरदृष्टी व बुद्धिप्रामाण्यवादाचे अधिष्ठान लाभले होते. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना गौतम बुद्ध व संत कबीर यांच्याबरोबर गुरूस्थानी मानले आहे.

'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले' अविद्येने, अनवस्थेने अगतिक बनविलेल्या दलित जीवनाचा मूलभूत विचार महात्मा फुले यांनी केला. जुन्या धर्मरूढीपरंपरेविरुद्ध त्यांनी बंड पुकारले. दलित, शूद्र व अतिशूद्र माणसांना अस्पृश्यतेच्या दु:खातून मुक्त करण्याचे स्वप्न पाहिले व त्याकरिता प्रयत्न केले. दारिद्र्य, शोषण, अन्याय याविरुद्ध आवाज उठविला. स्वातंत्र्य, समता, न्याय व विश्वकुटुंब ऐक्यभाव या मानवी मूल्यांचा पुरस्कार केला. या मूल्यांवर आधारित समाजव्यवस्था अपेक्षिणारा बुद्धिप्रामाण्यवादी व दूरदृष्टीचा महापुरुष म्हणजे महात्मा जोतिराव फुले होत, असे म्हणता येईल. त्यांच्या चळवळीच्या केंद्रस्थानी माणूस व माणसाचे हीत होते.

म. जोतिराव फुले यांनी शूद्र दलितांच्या उद्धारासाठी प्रतिगामी सनातनी शक्तींशी लढा दिला. म्हणून दलित मुक्तीच्या चळवळीत त्यांचे योगदान मोलाचे ठरते. म्हणूनच महात्मा जोतिराव फुले ही दलित साहित्याची प्रेरणाशक्ती आहे, असे दलित साहित्यिक मानतात.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर

भगवान बुद्ध, महात्मा जोतिराव फुले यांना दलित साहित्याने आपल्या तात्त्विक पार्श्वभूमीच्या संदर्भात प्रेरणास्थान दिले आहे. मात्र काल-परिस्थितीचा विचार करता दलित जीवनाची युगसापेक्ष मूल कल्पना दलित साहित्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाच मानते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा थोडक्यात परिचय करून घेणे उचित ठरेल.

इ.स. १९२३ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमेरिकेतील शिक्षण संपवून भारतात परत आले. भारतात परत आल्यानंतर प्रथम ते बडोदा नरेश सयाजी गायकवाड यांच्याकडे कराराप्रमाणे लेफ्टनंट कर्नल म्हणून नोकरीवर रुजू झाले. नंतर काही काळ त्यांनी सिडनेहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकी केली. याकाळात त्यांना ज्या सामाजिक अनुभवांना सामोरे जावे लागले त्यातून त्यांच्या लक्षात आले की भारतीय समाजात माणसाला जन्मत:च जात प्राप्त होते. आणि ही जात शिक्षण, ज्ञान इत्यादींच्या आधारे बदलता येत नाही. तर ती मरेपर्यंत चिकटून राहाते. प्रस्थापित समाजव्यवस्थेत पिळल्या गेलेल्या, भरडल्या गेलेल्या दलितवर्गाचे उन्नयन करायचे तर या वर्गामध्ये जागृती निर्माण केली पाहिजे. याकरिता या वर्गाला शिक्षणाला प्रवृत्त केले पाहिजे, संघटित केले पाहिजे आणि संघर्षासाठी, स्वहक्कांच्या लढ्यासाठी तयार केले पाहिजे. यादृष्टीने डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांनी अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करण्याकरिता सर्वात प्रथम 'बहिष्कृत हितकारिणी सभा' नावाची संस्था स्थापन केली व या कार्याच्या प्रचारासाठी 'बहिष्कृत भारत' नावाचे वर्तमानपत्र सुरू केले. सभा, संमेलने, परिषदा इत्यादींद्वारे प्रचाराचा धडाका लावला. आणि अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी प्रवेश मिळवून देण्यासाठी महाड, नाशिक, पुणे येथे सत्याग्रहाच्या मार्गाचाही अवलंब केला. यांतून अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीला नवे वळण लागले. मनुस्मृतीच्या जाहीर दहनातून त्यांनी धर्मशास्त्रांचे जोखड टाकून बुद्धिनिष्ठ विचारांचा पुरस्कार केला. याकाळातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका मुख्यत: हिंदूधर्मांतर्गत समाजसुधारकाची होती.

१९३० साली लंडनला गोलमेज परिषद भरली. या परिषदेमध्ये अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहभागी झाले होते. या परिषदेपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कार्याची दिशा थोडी बदललेली दिसते. यावेळी अस्पृश्यांसाठी स्वतंत्रपणे राजकीय हक्क संपादन करणे ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कार्याची दिशा निश्चित केली. या परिषदेच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रथमच जगापुढे भारतीय अस्पृश्यांच्या हक्कांची कैफियत मांडली आणि या हक्कांच्या रक्षणासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. मात्र अस्पृश्य जातींना स्वतंत्र मतदारसंघ देण्यास महात्मा गांधीजींना इ.स. १९३२ साली येरवडा तुरुंगामध्ये प्राणांतिक उपोषण करून विरोध केला. शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघाचा आग्रह सोडला आणि महात्मा गांधी यांनी दलितांसाठी राखीव जागा मान्य केल्या. हाच महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात झालेला 'पुणे करार' होय.

मानवी जीवनास धर्माचे अधिष्ठान असले पाहिजे यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विश्वास होता. पण हिंदूधर्मात राहून सामाजिक समता प्रस्थापित करणे अशक्य वाटत असल्यामुळेच इ.स. १९३५च्या ऑक्टोबर महिन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी येवला येथे धर्मांतराची घोषणा केली. यानंतर इ.स. १९३६ सालच्या ऑगस्ट महिन्यात त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. युद्धकाळात सत्तांतर होण्याची चिन्हे दिसू लागली. या परिस्थितीत अस्पृश्यांच्या हिताचे संरक्षण करण्याच्या हेतूने स्वतंत्र संघटना असावी असा विचार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' किंवा 'दलित फेडरेशन'ची स्थापना केली. स्वातंत्र्याच्या उदयकाळी हंगामी मंत्रिमंडळाची स्थापना करण्यात आली. या मंत्रिमंडळात कायदेमंत्री हे पद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देण्यात आले. या काळात भारतीय राज्यघटनेचे लेखन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राज्यघटना तयार होतानाचे भरीव योगदान लक्षात घेऊन त्यांना भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार मानले जाते. भारतीय राज्यघटनेनुसार अस्पृश्यतेचे भारतातून उच्चाटन झाल्याचे जाहीर करण्यात आले. तसेच सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविणारा कायदा इ.स. १९५५ मध्ये संसदेत मंजूर करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंत्रिमंडळात असताना पंडित

नेहरूंनी 'हिंदू कोड बील' बनविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'हिंदू कोड बील' तयारही केले. पण यावेळी काँग्रेसमधील उजव्या गटाच्या विरोधाला त्यांना तोंड द्यावे लागले. इ.स. १९५१ साली डॉ. आंबेडकर मंत्रिमंडळातून बाहेर पडले. इ.स. १९५२ साली मुंबई प्रांतातील मतदारसंघातून राखीव जागेसाठी लोकसभेच्या निवडणुकीकरिता ते उमेदवार म्हणून उभे राहिले. या निवडणुकीत त्यांना पराभव स्वीकारावा लागला. या पराभवानंतर त्यांचा कल अधिकाधिक बौद्ध धर्माकडे झुकू लागला. 'आपण हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही,' अशी त्यांची प्रतिज्ञा होती. इ.स. १९५६ साली बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन त्यांनी ही प्रतिज्ञा खरी केली. त्यांच्यासोबत त्यांच्या हजारो अनुयायांनीही सामुदायिक धर्मांतर केले व बौद्ध धर्माचा स्वीकार केला. आणि त्यांना अभिप्रेत असलेल्या बौद्धधर्माची पुनर्मांडणी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुयायांसह धर्मांतर केले. पण धर्मांतराने अस्पृश्यांच्या सामाजिक समतेचा व एकात्मतेचा प्रश्न मात्र सुटू शकला नाही.

कोणत्याही देशातील लोकशाही स्थिर व मजबूत बनण्यासाठी प्रबळ अशा पर्यायी विरोधी पक्षाची गरज असते. 'अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' हा पक्ष विरोधी पक्ष नसल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काँग्रेसला पर्यायी असा एक प्रबळ पक्ष असला पाहिजे या विचारातून 'रिपब्लिकन पक्षा'ची स्थापना करण्याचा आपल्या अनुयायांना आदेश दिला. दुर्दैवाने हा पक्ष जन्मास येण्यापूर्वीच डॉ. आंबेडकर यांचे निधन झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा थोडक्यात आढावा घेतला तर सहज लक्षात येते की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या दलितोद्धाराच्या चळवळीत स्वातंत्र्य, मूलभूत हक्क, व्यक्तिविकास यांना महत्त्व होते. आपल्या कार्य-कर्तृत्वातून त्यांनी दलित समाजात आत्मप्रत्यय व महत्त्वाकांक्षा निर्माण केली. माणुसकीच्या सर्व हक्कांवर उच्चवर्णियां इतकाच दलित वर्गाचाही अधिकार आहे आणि त्या हक्कांसाठी झगडणे हे दलितवर्गाचे न्याय व पवित्र कर्तव्य आहे याची जाणीव प्रथम त्यांनीच दलित वर्गामध्ये निर्माण केली. याकरिता त्यांनी स्वतंत्र, संघटना, शिक्षणसंस्था, क्रांतिकारक विचारप्रणाली सत्ता, कायदे-कानून, राजकारण, सामाजिक लोकशाहीचे तत्त्व, धर्मांतर इत्यादी साधनांचा वापर केला.

भगवान गौतम बुद्ध, महात्मा जोतिराव फुले हे दलित साहित्याची प्रेरक शक्ती असले तरी खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच दलित साहित्याचे प्रेरणास्थान आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळींचे एक फलित म्हणजे दलित साहित्याची चळवळ होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'सम्यक् क्रांती'च्या लढ्यातून दलित साहित्याची सुरुवात झाली. म्हणून या साहित्याच्या मुळाशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेची मुख्य प्रेरणा आहे. तसेच, महात्मा जोतिबा फुले, राजर्षि शाहू महाराज, मार्क्सवादी चळवळी इत्यादींचा प्रभावही या साहित्यावर काही प्रमाणात झाला आहे असे म्हणता येईल. डॉ. भालचंद्र फडके, प्रा. अविनाश सहस्रबुद्धे, प्रा. दत्ता भगत

इत्यादींच्या विवेचनानुसार सर्व स्तरांवरील अभावग्रस्त जीवन जगणे नशिबी आलेल्या दलित समाजाला या समाजातील लेखकांना अस्मिता मिळाली ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानामुळे आणि त्यांनी आरंभलेल्या मानव मुक्तिलढ्यामुळे. या आंदोलनांतून स्फूर्ती घेऊन काही दलित विचारवंत व साहित्यिक पुढे आले व त्यांनी आपली भूमिका समाजापुढे मांडण्यास सुरुवात केली. दलितांना घ्यावासा वाटणाऱ्या आत्मशोधाच्या मुळाशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचीच प्रेरणा आहे. आणि यातूनच दलित साहित्याचा जन्म झाला. एकूण साहित्याच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एका भाषणामध्ये मांडलेले विचार पुढीलप्रमाणे आहेत. 'आज समाजजीवन व राष्ट्रजीवन प्रगत होणारे साहित्यशास्त्र निर्माण होत नाही. आपल्या स्वतंत्र देशाला एकात्मतेची व बंधुत्वाची नितांत गरज आहे. एकात्मता आणि बंधुता हा आपल्या राष्ट्राचा गाभा ठरला पाहिजे. त्याशिवाय प्रबळ संघशक्ती निर्माण होणार नाही. म्हणून साहित्य कलेतूनही मानवतावादी शास्त्र निर्माण होणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी साहित्यक्षेत्रात राष्ट्रोपयोगी क्रांतीची लाट उसळली पाहिजे. अलीकडे तर साहित्याच्या कडा काळवंडत चाललेल्या आढळतात. पीक फार आहे पण ते नि:सत्त्व आहे, आज आम्हाला ज्ञानसत्त्वाची भूक आहे. तेव्हा तत्परतेने सावध होऊन जीवन व संस्कृतीविषयक मूल्य साहित्यिकांनी जोपासली पाहिजेत. ती सतेज बनवली पाहिजेत. म्हणून मला साहित्यकारांना सांगायचं आहे की, आपलं उदात्त जीवनमूल्य, सांस्कृतिक मूल्य आपल्या साहित्य प्रकारातून आविष्कृत करा. आपलं लक्ष्य आंकुचित मर्यादित ठेवू नका. ते विशाल बनवा. आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका. खेड्यातील उपेक्षित, दु:खी समाजाचं जीवन साहित्याद्वारे उन्नत करण्यासाठी झटा. त्यातच खरी मानवता आहे.' दलित साहित्याने हीच प्रेरणा घेऊन वाटचाल केली पाहिजे.

आंबेडकरांच्या रूपाने अंध:कारमय दलित वर्गाच्या जीवनात 'क्रांती-सूर्य' प्रकटला. हाच 'सूर्य' ही दलित साहित्यातील विशेषत: काव्यातील एक तेजस्वी प्रतिमा म्हणून येताना दिसते.

आणि माझ्याही कवितेच्या मनगटातून आता
सूर्य उगवू लागला आहे
सर्वहारा क्षितिजांच्या पिंड प्रदेशात
प्रखरता पेरू लागला आहे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व सूर्यासारखे प्रखर होते. दलितांना भोगाव्या लागणाऱ्या अन्याय व अमानुषतेचा त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत प्रतिकार केला. आणि याचवेळी स्वत:चा उद्धार स्वत:च केला पाहिजे असा संदेशही दिला. यातून त्यांनी दलितांना उत्थानाचा लढाऊ मार्ग दाखविला. म्हणूनच,

तू दिलेल्या संघर्षशील शिकवणुकीतनं
    मी देतो मूलभूत श्रद्धांना
वचनांना आव्हान
    नि खोदतो स्वत:ला दु:खदैन्यातून
अंतिम कणापर्यंत
    नि मारतो स्वत:च्याही काळजात
पाजळलेल्या कुदळी.

असे डॉ. आंबेडकर या कवितेत कवी नामदेव ढसाळ म्हणतात. तर

तू झालास परिस्थितीवर स्वार
आणि घडविला नवा इतिहास
तू झालास मूक समाजाचा नायक
आणि जागा केलास बहिष्कृत भारत

असे ज. वि. पवार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तित्वाचे विश्लेषण करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रूढीपरंपरेच्या भयावह, अन्यायकारक चक्रव्यूहामध्ये जखडून ठेवलेल्या दलित वर्गाला यातून बाहेर पडण्याचा लढाऊ मार्ग दाखविला. त्यांनी माणसाच्या प्रतिष्ठेला महत्त्व दिले. 'मनुष्यत्व' हे श्रेष्ठ मूल्य मानले. दलितांच्या मनात 'माणूस' म्हणून अस्मिता जागवली. 'मानवमुक्ती' हेच ध्येय त्यांनी जीवनभर जोपासले व त्याकरिता निष्ठापूर्वक प्रयत्न केले. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे व्यक्तित्व दलितवर्गाची प्रेरणाशक्ती ठरली. दलित समाजाची अस्मिता व मानबिंदू ठरली. थोडक्यात, संपूर्ण 'आंबेडकरवाद' किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संपूर्ण तत्त्वज्ञान हीच दलित साहित्याची एकमेव प्रेरणा आहे, असे म्हणता येईल.

❖❖❖❖❖

# ४

# दलित साहित्याची पूर्वपरंपरा

उद्दिष्ट्ये :

१) १९६० नंतर मराठी साहित्यात वेगवेगळे वाङ्मयीन प्रवाह उदयास आले. या वाङ्मयीन प्रवाहातील दलित साहित्यप्रवाह हा सर्वात संपन्न व सकस असा वाङ्मयीन प्रवाह आहे. याठिकाणी १९६० पूर्वी लिहिल्या गेलेल्या दलित साहित्याचे स्वरूप थोडक्यात समजावून घेणे.

२) महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील संत चोखामेळा, कर्ममेळा यांच्या अभंगातून प्रकटलेली दलित जाणीव अभ्यासणे.

३) संत कबीर यांच्या दोह्यातून व्यक्त झालेली दलित जाणीव अभ्यासणे.

४) दलित साहित्याच्या पूर्वपरंपरेने पुढील दलित साहित्याच्या पाया उभारणीचे काम कसे केले ते जाणून घेणे.

आंबेडकरपूर्व काळापासून दलितांच्या चळवळींना सुरुवात झालेली होती. या चळवळींचे स्वरूप जसे आंदोलने, उठाव, प्रचार-भाषणे, निवेदने, सत्याग्रह इत्यादी प्रकारचे होते, तसेच ते वाङ्मयीनसुद्धा होते. या काळात वाङ्मयाची निर्मिती करणारे बहुतेक साहित्यिक समाजकार्यकर्ते होते. आणि १९६० नंतरच्या दलित साहित्याप्रमाणे यांच्याही साहित्यकृतींच्या मुळाशी ‘विद्रोह’ हाच भाव होता. दलितांची सामाजिक व वाङ्मयीन चळवळ या दोन्ही चळवळी समांतर व पूरक प्रवास करताना दिसतात. दलित साहित्य हे दलित चळवळींशी बांधलेले साहित्य होते आणि दुसऱ्या बाजूने हे साहित्य चळवळीकरिता प्रेरक साहित्य होते. इ.स. १९६० नंतर दलित साहित्याचा प्रवाह जोमाने वाहू लागला. असे असले तरी यापूर्वीही दलित अनुभूतीच्या खुणा साहित्यामध्ये उमटलेल्या आहेत. याठिकाणी दलित साहित्याच्या पूर्वपरंपरेचा थोडक्यात आढावा घ्यावयाचा आहे.

दलित साहित्याच्या पूर्वपरंपरेचा आढावा घेताना संत चोखामेळा यांच्या साहित्यनिर्मितीपासून तो घ्यावा लागेल.

संत चोखामेळा–संत चोखामेळा जन्माने अस्पृश्य असून वारकरी संप्रदायातील एक संतकवी आहेत. इतर वारकरी संतांप्रमाणेच त्यांचीही ईश्वरभक्ती, ईश्वरनिष्ठा यांवर श्रद्धा होती. त्यांच्या अभंगातून ईश्वरभक्ती प्रकट होतेच पण काहीवेळा वर्ण, संस्कृती इत्यादीसंदर्भातील सामाजिक, सांस्कृतिक विषमतेची जाणीवही व्यक्त होते. म्हणूनच संत चोखामेळा यांच्या अभंगांना दलित साहित्याचा पहिला हुंकार मानावा लागेल.

संत चोखामेळा यांची वैचारिक घडण परंपरेनेच बंदिस्त केलेली होती. किंबहुना सर्व संतही मनाने परंपरावादी होते. यातूनच त्यांच्या विचारधारणेत जन्म-मरणाच्या दैवी फेऱ्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते. संत चोखोबा यांतूनच 'मागच्या जन्मी कृष्ण निंदा घडली म्हणून महार यातीत जन्मलेले' असे म्हणतात. पण याचवेळी 'हीन याती माझी देवा । कैसे घडे तुझी सेवा?' असा परमेश्वराला प्रश्नही करतात. आणि 'मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटू कवण्या रीती?' अशी व्याकूळताही प्रकट करतात. पण लगेचच त्यांचे पारंपरिक मन असे हीनदीन जीवन आपल्याला पूर्वसंचितानुसार प्राप्त झालेले आहे, अशी स्वत:ची समजूत घालून घेते.

मनुष्याला जन्म त्याच्या पूर्वसंचितानुसार लाभतो या संस्कारातून चोखोबांची मानसिकता मुक्त झालेली नसली तरी 'मज दूर दूर हो म्हणती' अशी परमेश्वराठायी ते तक्रार करतात. या त्यांच्या तक्रारीमधून सामाजिक विषमतेचे तीव्र दु:ख प्रकट होते आणि या दु:खाचा जेव्हा कडेलोट होतो तेव्हा 'पापांचा घडा भरेल त्यांचा, नरकयातना सहतील ते । ते माणूस नाही दैत्यांची अवलाद । त्यांचे त्यांना भोगू दे ।।' अशी चीड, संताप व्यक्त करतात. चोखामेळ्यांच्या अभंगातून व्यक्त होणारी ही अवहेलनेची चीड म्हणजे एकप्रकारे विद्रोहाचीच भावना आहे. सामाजिक वर्ण, जाती यांच्याविरुद्ध त्यांनी त्यांच्या पातळीवर केलेला हा एक प्रकारचा प्रतिकार आहे. याकाळातील आजूबाजूचे वास्तव धर्मांध रूढी-परंपरांनी ग्रासलेले होते. अशा परिस्थितीत सामाजिक अवहेलनेचे दु:ख प्रकट करण्यापलीकडे चोखोबांना अधिक काही करणे शक्यही नव्हते. म्हणूनच ते, 'जातिभेदे गांजिले त्रासिले विटाळे । एकापुढे एक पडति आघात । सारिता न सरत काय करू? ।।', 'त्या दुष्ट रूढी नित्य करू पाही घात । सोसावे आघात किती तरी? ।।' असे व्याकूळतेने म्हणतात.

संत चोखामेळा आपल्या अभंगांमधून रूढी-परंपरेविरुद्ध, अन्यायाविरुद्ध आवाज उठवितात. पण आपले दु:ख, वेदना ते देवभक्तीमध्ये बुडविण्याचा प्रयत्न करतात. म्हणून 'कोण तो सोवळा कोण तो ओवळा । कोणाशी विटाळ कशाचा जाहला ।।' असा विद्रोहाचा आवाज त्यांच्या अभंगांतून अध्येमध्ये उठत असला तरी 'अहोजी, तुमचे दारीचा मी कुतरा' असे लाचार शब्दही येतात. तरीही काळाच्या परिघात विचार करता चोखोबांनी सामाजिक विषमतेविरुद्ध उठविला आवाज महत्त्वाचाच आहे, असे म्हणावे लागेल.

कर्ममेळा—कर्ममेळा हा संत चोखामेळा यांचा मुलगा. कर्ममेळ्याची पिढी ही चोखामेळ्यांच्या पुढची पिढी आहे. साहजिकच तो चोखोबांपेक्षा अधिक चिडून, संतापून आपल्या मनातील वेदना, दु:ख यांना अभंगांवाटे वाट मोकळी करून देतो. दलितवर्गाला भोगाव्या लागणाऱ्या हीनदीन जीवनासंदर्भात तो सरळ सरळ विठ्ठलालाच प्रश्न करतो. 'आमुची केली हीन याती । तुज का न कळे श्रीपती? । जन्म गेला उष्टे खाता । लाज न ये तुमच्या चित्ता? ।।' कर्ममेळ्याच्या प्रश्नरूपी तक्रारीतून उष्ट्याखरखट्यावर जगणे नशिबी आलेल्या दलित समाजाची वेदना ठाशीवतेने व्यक्त होते.

दलितवर्गाच्या वेदनेला, दु:खाला शब्दरूप देणारे संत चोखामेळा व त्यांचा मुलगा कर्ममेळा हे दलित साहित्याचे पहिले उद्‍गाते ठरतात, असे म्हणता येईल.

संत कबीर—संत चोखामेळा, संत कर्ममेळा यांच्यानंतर दलित साहित्य पूर्वपरंपरेतील संत कवी म्हणून महात्मा संत कबीर यांचे नाव घ्यावे लागते. संत कबीर यांची भगवान बुद्धाप्रमाणे मानवाच्या महानतेवर अढळ श्रद्धा होती. जातिव्यवस्थेने माणसामाणसात पाडलेले भेद त्यांना अमान्य होते. मानवी समाजात विषमता निर्माण करणाऱ्या रूढी-परंपरा, अंधश्रद्धा यांवर त्यांनी आपल्या दोह्यातून कठोर आघात केले. हिंदू धर्मातील देव, परंपरा यांविरुद्ध विद्रोह पुकारला. अस्पृश्यतेचा धिक्कार केला आणि समता, बंधुभाव व एकता या मूल्यांचा पुरस्कार केला. ते आपल्या दोह्यातून प्रश्न करतात. 'एक बुंद एक मलमूतर एक चाम एक गुदा । एक जोती तै सब उपजा कौन ब्राह्मण कौन सूदा?' संत कबीर वरील प्रश्नातून सर्व मानव एक आहेत असा संदेश देतात.

महात्मा फुले—महात्मा फुले यांचे विचार ही दलित साहित्याची प्रथम प्रेरणा मानण्यात येते. म. फुले मानवतावादाचे व समतेचे निस्सीम पुरस्कर्ते होते. त्यांनी सामाजिक अन्यायाविरुद्ध, अंधश्रद्धा, रूढी-परंपरा यांच्याविरुद्ध धर्मासंदर्भात समाजजागृती केली. आपले क्रांतिकारक विचार त्यांनी साहित्यातून मांडले. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. यामध्ये 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा, अखंडादि काव्यरचना, ब्राह्मणांचे कसब, गुलामगिरी, शेतकऱ्याचा असूड, सत्सार अंक १ व २, सार्वजनिक सत्यधर्म इत्यादी पुस्तकांचा निर्देश करता येईल. यांपैकी 'सार्वजनिक सत्यधर्म' व 'गुलामगिरी' या ग्रंथांतून त्यांनी धर्म, रूढी, जात यांच्या अन्यायी, ढोंगी स्वरूपावर आवाज उठविला. म. फुले यांच्या विचारामध्ये माणूस व माणुसकी या मूल्यांना फार महत्त्व होते. यामुळेच त्यांचा ब्राह्मण्यावर किंवा ब्राह्मण्यग्रस्त प्रवृत्तीवर विशेष राग होता. यातूनच ते आपल्या लेखनाद्वारे ब्राह्मणांच्या विचार व वर्तनातील विरोध उपरोधित शैलीत प्रकट करतात.

उदाहरणार्थ, 'नेसुनी सोवळे विटाळसा झाला । शिवेना शूद्राला शुद्ध कसा ।।' असा परखड सवाल ते करतात. हेच सनातनी विचारांचे ब्राह्मण लग्नसमारंभासारख्या प्रसंगी मात्र स्वत:चा स्वार्थ साधताना शूद्रांचा अक्षरश: लुबाडतात. त्यांच्याकडून दक्षिणा उकळतात.

या दक्षिणेचा त्यांना विटाळ होत नाही. धर्माचा नावाखाली दलितांवर जुलूम करणाऱ्या ब्राह्मणांच्या स्वार्थी प्रवृत्तीचे दर्शन म. फुले पुढीलप्रमाणे घडवितात.

'लग्न वर्तविता दुकान मांडले / गणपती केले सुपारीचे ।। खारका खोबरे नैवेद्याचा भार / दक्षिणा रीतसर पैसालूट ।।' शूद्रांना नाडणारा ब्राह्मण आणि ब्राह्मण्याला बळी पडणारे अज्ञानी शूद्र यांवर वरील अभंगातून म. फुले प्रकाश पाडतात.

म. फुले यांनी 'गुलामगिरी', 'सार्वजनिक सत्यधर्म' यांसारख्या ग्रंथांतून हिंदूधर्मग्रंथ, संस्कृती आणि वर्णप्रधान हिंदुसमाजरचना यावर तीव्र आघात केले आहेत. म. फुले यांचा राग ब्राह्मणी प्रवृत्तीवर होता. ब्राह्मणांनी निर्मिलेल्या पुराणकथांची मीमांसा ते विज्ञाननिष्ठा व बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टिकोणातून करतात. यातून त्यांच्याठायीच्या प्रखर मानवतावादाचे दर्शन घडते. 'गुलामगिरी'तून म. फुलेंमधील प्रखर 'सत्यशोधक' भारतातील परंपरागत, ब्राह्मणप्रधान धार्मिक व सामाजिक संस्कृतीच्या विरुद्ध प्रक्षोभ प्रकट करतो. परंपरागत समाजरचना नष्ट करून आधुनिक मानवी स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व यांवर आधारलेली समाजरचना यावी असे म. फुले यांना मनोमन वाटत होते. 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथातून त्यांनी विश्वकुटुंबवादाची कल्पना मांडली आहे. धार्मिक सहिष्णुता, मानवी प्रतिष्ठा आणि मानवी समानता ही मूल्ये या ग्रंथाच्या प्रेरणास्थानी आहेत. मानव हीच सामाजिक मूल्यांची आणि समाजधारणेची मापकाठी असावी, हा विचार या ग्रंथाच्या केंद्रस्थानी आहे. म. फुले यांच्या 'अखंडादि काव्यरचने'तही सत्य व नीती हाच खरा मानवधर्म आहे, असे त्यांनी सांगितले आहे.

निर्मीले बांधव स्त्रीपुरुष प्राणी ।। त्या गोरे कोणी ।। रंगवर्ण ।।
खरी हीच नीती मानवाचा धर्म ।। बाकीचे अधर्म ।। जोती म्हणे ।।
मानवाचा धर्म सत्य नीती खूण ।। करी जीवनदान ।। जोती म्हणे ।।

थोडक्यात म. फुले यांनी आपल्या सर्व ग्रंथातून हिंदूधर्मग्रंथ, संस्कृती आणि ब्राह्मणप्रधान हिंदुसमाजरचना यांवर घणाघाती आघात केले. यामुळे दलित साहित्य म. फुले यांच्या विचारांना व साहित्याला आपली प्रथम प्रेरणा मानते.

मात्र आजच्या दलित साहित्याच्या निर्मितीची प्रथम प्रेरणा महात्मा फुले यांच्या कार्यातून व लेखनातून मिळते. १८७५ ते १८९० हा काळ महात्मा फुल्यांच्या कार्यलेखनाचा काल आहे. म. फुले यांच्यापासून प्रेरणा घेऊन याकाळात दलित कवी, शाहीर, पोवाडेकार यांनी तमाशा, लावण्या, कवणे, दंढारी, पोवाडे यांसारखी वाङ्मयनिर्मिती केली. त्यांच्या वाङ्मयनिर्मितीच्या मुळाशी म. फुले यांची प्रेरणा होतीच पण त्याचबरोबरीने संत चोखोबा, शिदनाक, महार पलटन, खर्ड्याच्या लढाईमधील महारांचा पराक्रम हीसुद्धा स्फूर्तीस्थाने होती.

या काळात महारांच्या कवने–शाहिरांनी चांगलाच जोर धरला होता. त्यांनी आपल्या कवनातून अन्यायाविरुद्ध आवाज उठविला. लोकांना आपल्या कलेने वेड लावणारे, शाहिरीने भारावून टाकणारे अनेक शाहीर या काळात होऊन गेले. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांच्या काळाच्या आगेमागे आपल्या लेखनाने व कार्याने दलित समाजात जागृती निर्माण करू पाहणारे व दलितांचे प्रश्न जगणे इतरांच्या निदर्शनास आणून देणारे कार्यकर्ते, लेखक होऊन गेले. त्यात किसन फागू बंदसोडे, कवी दीनबंधू, बाबू कालीचरणदास, नंदागवळी, गणेश आक्काजी गवई, पतीत पावनदास, ग. म. ठवरे, गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, वामन कर्डक, बंधुमाधव, अण्णाभाऊ साठे इत्यादींची नावे घेता येतील. या सर्व लेखक, कलावंतांनी अस्पृश्यांमध्ये जागृतीची, स्वाभिमानाची जाणीव निर्माण करण्याचे कार्य आपल्या लेखनाद्वारे कलेद्वारे केले. यापैकी किसन फागू बंदसोडे, गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, दीनबंधु, वामन कर्डक, बंधुमाधव इत्यादी लेखकांच्या लेखनाने डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणाऱ्या मानवी मूल्यांची मागणी केली. अन्यायाविरुद्ध आग पाखडली. याकरिता त्यांनी भाषण, प्रचार, वृत्तपत्रीय व नियतकालिकांमधील लेखन या माध्यमांचा वापर केला.

इ.स. १८२५ ते १९५० या काळात वृत्तपत्रे व नियतकालिके यांनी दलितवर्गाच्या प्रश्नांसंदर्भात केलेले कार्य बहुमोलाचे आहे. म. फुले यांनी प्रबोधनाची चळवळ सुरू केली होती. इ.स. १८७७ साली सत्यशोधक समाजातर्फे 'दीनबंधु' हे पहिले बहुजनसमाजाचे नियतकालिक निघाले. त्यानंतर इ.स. १८८८ मध्ये गोपाळबाबा वलंगकर यांचे 'विटाळविध्वंसक' आणि किसन फागू बंदसोडे यांची 'मराठा दीनबंधू', 'चोखामेळा' ही वृत्तपत्रे आली. या वृत्तपत्रांनी, नियतकालिकांनी दलितांच्या व्यथा-वेदनांना वाचा फोडली. यानंतर १९५० पर्यंत अनेक वृत्तपत्रे जन्माला आली. डॉ. आंबेडकर यांनी 'मूकनायक' (१९२०), 'बहिष्कृत भारत' (१९२७), 'समता', 'जनता' (१९३०) ही वृत्तपत्रे सुरू केली. या वृत्तपत्रांतील लेखनातून त्यांनी दलित समाजाचे सर्व पातळ्यांवरील सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक इत्यादी प्रश्न हाताळले. या काळातील विविध वृत्तपत्रे, नियतकालिके यांनी दलित चळवळीच्या इतिहासात लक्षणीय कार्य केले आहे. प्रा. गंगाधर पानतावणे यांच्या इ.स. १९६७ साली निघालेल्या 'अस्मिता' (पुढे याचेच नाव अस्मितादर्श असे ठेवण्यात आले.)चा उल्लेख याठिकाणी करणे महत्त्वाचे ठरेल. अस्मितादर्शने नव्या वाङ्मयीन प्रवृत्ती व नव्या जाणिवा घेऊन लिहू पाहणाऱ्या दलित साहित्याचा विचार वाङ्मयीन व तात्त्विक पातळीवर सर्वप्रथम मांडला. दलित साहित्याची चळवळ भक्कमपणे उभी करण्यात 'अस्मितादर्श'चा वाटा मोलाचा आहे. थोडक्यात, दलितांची सामाजिक, साहित्यिक चळवळ विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून सुरू झाली होती असे म्हणता येईल. या पार्श्वभूमीवर आंबेडकरपूर्व व आंबेडकर बरोबरच्या काळातील दलित साहित्याचा संक्षेपाने आढावा घेता येईल.

कवी पंडित कोंडीराम—महात्मा फुले यांच्या सामाजिक व वाङ्मयीन कर्तृत्वाच्या प्रेरणेतून गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जा. कांबळे, इत्यादी लेखक-कार्यकर्ते सक्रीय झाले. त्यातीलच एक कवी पंडित कोंडीराम होय. पंडित कोंडीराम यांनी ब्रिटिश सरकारला अस्पृश्यांच्या अवस्थेची जाणीव व्हावी, या उद्देशाने एक दीर्घ कविता लिहिली आहे. सामाजिक संघर्षाच्या लढ्यात ही कविता फार महत्त्वाची मानली जाते. पं. कोंडिरामच्या नावावर एवढी एकच कविता दिसते. ही कविता आत्मस्थितीबरोबरच विद्रोहाची भावनाही प्रकट करते. त्यातील काही भाग पुढीलप्रमाणे,

हर हर हे ईश्वरा । ह्या हिंदुस्थानी
संकटात काळ कटला अतिशूद्रांनी ।
पोट खपाटी सदा ते हो क्षुधाकांत
मेलेल्या गुरांची जेथे बाटे होतात ।।
तीन शतक वर्षे त्यांनी ऐशा जे दु:खात
संकटात काळ कंठिला ब्राह्मणी अंमलात ।।
ईशकृपे आता या इंग्लिश राज्यात
स्वतंत्रतेचे आता या इंग्लिश राज्यात
स्वतंत्रतेचे सुख यांना थोडे बहुत ।।
सरत चालली मागे भटशाही ब्राह्मणी ।।

किसन फागू बंदसोडे—दलित वेदनेला जाणीवपूर्वक शब्दरूप देणारा पहिला जागृत कवी म्हणून किसन फागू बंदसोडे यांचे नाव घ्यावे लागते. किसन फागूंनी दलित व्यथेला, वेदनेला आपल्या कवितेतून व प्रहसनातून प्रत्ययकारी शब्दरूप दिले. माणसाला पशू, पक्ष्यांपेक्षाही हीन जीवन जगायला भाग पाडणाऱ्या समाजव्यवस्थेचे वास्तवरूप त्यांनी काव्याद्वारे उघडे केले आहे. 'पशुहूनि केले हीन । नच उर दिला कुठे मान ।।' असे सांगतानाच 'साहू नका कुणाचा जुलूम । होऊ नका कुणाचे गुलाम । सोडून या रे सारे बदकाम' असा स्वाभिमान जागविणारा संदेशही ते देतात. आणि या सर्वांतून बाहेर पडण्याकरिता 'महाराशी अंती । नही लढल्याविण मुक्ती ।।' असा लढा, संघर्षाचा मार्ग ते सुचवितात. माणसामाणसात भेदाभेद मानणारा धर्म त्यांना मान्य नव्हता. म्हणून माणसामाणसात समानता मानणारा धर्म हाच खरा धर्म आहे आणि तोच स्वधर्म असला पाहिजे असे ते निक्षून सांगतात. किसन फागूंची कविता आत्मजागृतीसाठी तडफडते. रूढीदास्यातून, आंधळ्या श्रद्धातून ती माणसाला मुक्त करू इच्छिते. म्हणूनच ती परंपरेला नाकारते. किसन फागूंनी इतरही लेखन केले आहे. यांमध्ये 'संत चोखामेळा' या विषयावर त्यांनी एक नाटक व संशोधनपर निबंधही लिहिला आहे. तसेच त्यांनी 'एका साधूची फजिती', 'पारतंत्र विमोचन अथवा अंत्यज सुधारण्याचा मार्ग' हे तमाशेही लिहिले आहेत. त्यांनी लिहिलेला 'सनातन धर्माचा पंचरंगी तमाशा' हा तमाशा फार गाजला. तर 'हा हिंद देश माझा'मध्ये त्यांनी रेखाटलेले देशाचे उपहासात्मक वास्तव सामाजिक चित्रण पाहिले

म्हणजे त्यांची समाजसुधारणाविषयीची दृष्टी स्पष्ट होते. त्यांच्या कवितेत वेदना, दु:ख यांबरोबरीने विद्रोहही पाहावयास मिळतो. म्हणूनच प्रा. गंगाधर पानतावणे, किसन फागू यांना या शतकातील पहिला दलित विद्रोही कवी मानतात. आणि आजची दलित कविता आपले नाते चोखामेळ्याशी सांगत नाही, तर ती विद्रोही कवी किसन फागू बंदसोडे यांच्याशी सांगते, असेही सांगतात.

किसन फागूंनी आपल्या विचारांच्या, कार्याच्या प्रसारासाठी 'निराश्रित हिंद नागरिक', 'मजूर पत्रिका', 'चोखामेळा' इत्यादी वृत्तपत्रे काढली. या वृत्तपत्रांतून त्यांनी भाषण, लेखन, अग्रलेख इत्यादीद्वारे समाजजागृतीचे कार्य केले. त्याचप्रमाणे त्यांनी त्याकाळातील केसरी, ज्ञानप्रकाश, मुंबई वैभव यांसारख्या वृत्तपत्रांतूनही लेखन केले आहे. यावरून त्यांच्या लेखनाचे महत्त्व लक्षात येते. पहिला जागृत दलित कवी असा त्यांचा केला जाणारा गौरव यथायोग्यच म्हणावा लागेल.

शाहीर घेगडे – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वातून प्रेरणा घेऊन अनेक कलावंत-शाहिर-कवी जन्माला आले. त्यातीलच शाहीर घेगडे हे एक आहेत. डॉ. आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळ्याच्या हक्कासाठी आणि नाशिकच्या काळाराम मंदिरातील प्रवेशाकरिता सत्याग्रह केले. या सत्याग्रहातून प्रेरणा घेऊनच शाहीर घेगडे यांनी काव्यलेखन केले आहे. देशाला राजकीय स्वातंत्र्याची गरज आहेच पण त्याहीपेक्षा जास्त सामाजिक स्वातंत्र्याची गरज आहे हे डॉ. आंबेडकरांच्या विचारातील सूत्र त्यांच्याही काव्यलेखनात पाहावयास मिळते. यातून त्यांची कविता म. गांधींवर तीव्र टीका करते. 'गांधी महात्मा कसला । ढोंगाला समाज फसला' अशी तीव्र प्रतिक्रियाही ते व्यक्त करतात. शाहीर घेगडे यांना जनतेने उत्स्फूर्तपणे 'कविरत्न' ही पदवी बहाल केली होती. यातच त्यांच्या कवित्वाचा गौरव सामावलेला आहे.

केरूबुवा गायकवाड – केरूबुवा गायकवाड हे अशिक्षित होते. डॉ. आंबेडकरांवर, त्यांच्या एकूण कार्यकर्तृत्वावर त्यांची अपार श्रद्धा होती. म्हणूनच ते 'भीमरायाविन कैवारी सखे दुसरा नाही जगात । अस्पृश्यांमध्ये शोभती भीम, चंद्र जैसा की नभात ।' असे म्हणतात. याच श्रद्धेतून बाबासाहेबांचा संदेश गावोगाव, घरोघर पोचविण्यासाठी ते काव्यगायन करीत सर्वत्र फिरले. 'भीमनाम मुखामध्ये घ्यावे । नित्य रोज शाळेमध्ये जावे ।।' अशा शब्दांत त्यांनी विद्येची महती गायिली आहे. केरुबुवांचे मन सुधारणावादी विचारवंताचे होते. म्हणूनच धर्म, देव या असमानतेवर आधारित कल्पनांना ते नकार देतात. एवढेच नव्हे तर 'सांगा अस्पृश्यांसाठी, कोण देव झाला कष्टी?' असा प्रश्न करीत ते वर्णधर्मव्यवस्थेचे अन्यायकारक स्वरूप उघड करतात. चोखोबाला पायरीवर ठेवणारा विठोबा आपला देव कसा होईल, हा त्यांचा प्रश्न विचार करायला भाग पाडतो व पारंपरिक श्रद्धास्थानातील बदल सुचवितो. म्हणूनच डॉ. बाबासाहेबांच्या रूपाने दलितांना स्वत:चे श्रद्धास्थान लाभले आहे, हे सांगताना,

आता सूर्य निघाला कडकडून । टाकील दुष्टांचे कंठ फोडून ।
ती वेळ आली पहा घडून ।।
...बाबासाहेबांच्या बोलावर । शिर घेतो तळहातावर ।
असे लाभले पुढारी थोर । दलितात भरलं वारं
जागृती केली की चौफेर ।

बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वावरील श्रद्धा त्यांच्या काव्यातून व्यक्त होतेच पण त्याचवेळी बाबासाहेबांच्या प्रेरणेने आत्मजागृतीच्या मार्गाला लागलेल्या दलित समाजाविषयीचा आशावादही त्यांची कविता प्रकट करते.

कवी दीनबंधू – कवी दीनबंधु यांनी प्रारंभी केलेल्या लेखनावर देवधर्माचा पगडा दिसतो. पण नंतर मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन ते आपल्या लेखनातून 'धर्मा'च्या स्वरूपाची वास्तव चिकित्सा करताना दिसतात.

'हा धर्म कसा? हे कर्म कसे? हे समजत नाही मजला रे ।
मांग महार या चांभाराचा, धोबीदादा वाट धरे ।।
पालू फडके धुतो परंतु महारांपासून दूर सारे ।
धोबी म्हणावा मोठा तरी तो, धनगर त्याचा बाट धरे...

भारतीय समाजव्यवस्थेच्या मुळाशी असलेली जातीची उतरंड, विटाळ इत्यादीचे मार्मिक चित्रण त्यांनी वरील काव्यातून केले आहे. ही परंपरागत भ्रष्ट चौकट विस्कटून टाकण्यासाठी क्रांती हाच एकमेव मार्ग आहे असे त्यांनी निक्षून सांगितले आहे. 'क्रांति रे क्रांति रे ।त्याविण ना शांती रे ।।' असा विद्रोहही ते प्रकट करतात. डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने जागृत झालेला तरुण दलितवर्ग जेव्हा संघर्षात उतरतो तेव्हा त्यांना मनोमन आनंद होतो. बाबासाहेबांचा दलितमुक्तीचा वसा त्यांच्या अनुयायांनीही समर्थतेने पेलला पाहिजे असे ते तळमळीने सांगतात. याचबरोबरीने बाबासाहेबांनी केलेल्या धर्मांतराच्या अपूर्व सोहळ्यालाही त्यांना शब्दबद्ध केले आहे. दीनबंधू यांनी गद्यलेखनही केले आहे. 'तथागत' नियतकालिकातून त्यांनी बुद्धाच्या 'मध्यम मार्गा'वर सुबोध भाष्य केले आहे. तसेच त्यांनी आंबेडकरी चळवळीला वाहिलेले 'कलापथक' काढले होते. व या पथकाद्वारे अव्याहतपणे त्यांनी समाजजागृतीचे कार्य केले.

लोककवी वामन कर्डक – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सामान्य जनतेपर्यंत त्यांच्याच भाषेत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम लोककवी वामनदादा कर्डक यांनी केले. यांतून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रेरणादायी विचार सांगत पददलितातील माणूसपण जागवले. डॉ. आंबेडकरांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करताना ते लिहितात, 'जखडबंद पायातील साखळदंड / तटातट तुटले तू ठोकताच बंड / झाले गुलाम मोकळे, भीमा तुझ्या जन्मामुळे' आंबेडकरी विचारांनी, प्रेरणेने आत्मभान आलेल्या दलितवर्गाला वामनदादा कर्डक आपल्या गीतांमधून आव्हान करतात की,

शूद्ध संस्कृतीच्या नावे । गाडलेली सारी गावे
वरती आणा पुन: उफाळून । सारा सागर काढा खणून ।।
व्हारे सारे डोंगरलाटा । कर्मठांचा जिरवा ताठा
व्हा तुफान प्राण पिसाळून । सारा सागर काढा खणून ।।

या आव्हानातून ते भारतीय संस्कृतीवर आघात करतात. दलितांच्या अवस्थेला सामाजिक विषमता कारणीभूत आहेच पण त्याचवेळी आर्थिक विषमताही तेवढीच कारणीभूत आहे. याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे अशी वर्गीय जाणीवही तीव्रतेने त्यांच्या कवितेतून व्यक्त झालेली पहावयास मिळते. उदाहरण म्हणून सोप्या सोप्या पण अर्थपूर्ण भाषेतून त्यांनी केलेली आर्थिक शोषणाची मांडणी पाहाता येईल.

नवे बंगले नवे कारखाने
निर्मियेले जर भारताने
ओझे वाहणारा ओझेच वाही
तीच जागा आम्हा तळाची
किंवा,
घराघरात आता
बंदूकीचा धाक आहे
घराघरात आता
माणसांची राख आहे
लोणी खाणारी खरी
धनिकांची जात आहे
बाकी कष्टकरी
माणसाला ताक आहे.

यांसारख्या कवितांमधून ते सांगतात की जुनी सरंजामशाही आज नव्या रूपात सर्वसामान्यांचे जगणे अवघड करीत आहे. प्रत्यक्षात ‘माणूस व माणुसकी’ हे या तत्त्वावर आधारित समाज व्यवस्था अस्तित्वात यायला हवी होती पण दुर्दैवाने आजही सर्वसामान्यांना पददलितांना पूर्वीच्याच छळाला सामोरे जावे लागत आहे. स्वार्थापोटी संवेदना हरवून बसलेल्या बधीर मनाच्या माणसांना ते कळवळून सांगतात,

माणसाने माणसाला छळू नये
एवढे का माणसाला कळू नये
माणसांचा देश उपाशी असताना
माणसाने तुपात रोटी तळू नये

अशी सबुरीची भाषा ते करीत असले तरी शोषित वर्गाला शोषणाचे भान आणून दिले पाहिजे, त्यांना संघर्षाकडे वळविले पाहिजे, संघर्षासाठी सर्व शोषित, पिडित वर्गाने

संघटित झाले पाहिजे, असे मनापासून त्यांना वाटत होते. याकरिताच ते देशात लढल्या गेलेल्या समतेच्या अनेक लढ्यांचा दाखला देतात.

बुद्धानंतर फुले, फुलेंचा चेले आंबेडकर
क्रांती क्रांती करीत फिरला, अखंड भारतभर
किंवा
कोल्हापूरचा शाहू राजा
मैतर माझ्या भीमाचा
कणखर पाठीराखा होता
तोच माझ्या भीमाचा

या देशात भगवान गौतम बुद्ध, म. फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लढे उभे केले. हे लढे एकाबाजूला वर्णसंघर्षाची तर दुसऱ्या बाजूला वर्गसंघर्षाची आवश्यकता प्रतिपादिणाने होते. वामनदादा कर्डक आपल्या गीतांतून धार्मिकदृष्ट्या वर्ण आणि आर्थिकदृष्ट्या वर्ग या दोन्ही जाणीवांचे वास्तवरूप प्रकट करतात. आणि प्रस्थापित सामर्थ्यशाली व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवितात. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार सामान्य जनतेपर्यंत पोहोचवितात.

इ.स. १९६०च्या आगेमागे अनेक दलित साहित्यिक आपआपल्या प्रातिभधर्मानुसार लेखन करताना दिसतात. यांपैकी अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बंधुमाधव यांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. थोडक्यात दलित साहित्याच्या पूर्वपरंपरेतील सर्वच कवी वा लेखक तडफदार वृत्तीचे, सुधारणावादी मतांचे कार्यकर्ते आहेत. या सर्वांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे श्रद्धास्थान आहे. या सर्वांनीच आपआपल्या स्वभावधर्मानुसार साहित्यातून विद्रोह व्यक्त केला आहे. त्यांचे साहित्य दलित जाणिवेतून निर्माण झाले आहे. आणि समाज जागृतीचे आवाहन प्रबोधन व समाजपरिवर्तन हे त्यांच्या साहित्याचे महत्त्वाचे विशेष आहेत. या काळातील वैचारिक लेखन किंवा शाहिरी, अभंग, कवने, गीते, कविता या सर्व वाङ्मयाच्या मुळाशी समाजजागृती व प्रचार हाच हेतू दिसतो म्हणून हे साहित्य प्रचारकी साहित्य होते असे म्हटले तरी वावगे ठरू नये.

❖❖❖❖❖

# ५

# दलित साहित्याच्या चळवळीचे स्वरूप–राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक चळवळींशी असलेला अनुबंध

उद्दिष्ट्ये :

१) दलित साहित्याच्या चळवळीचे स्वरूप समजावून घेणे.

२) तत्कालीन राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक चळवळींशी दलित साहित्याच्या चळवळींचा असलेला अनुबंध तपासणे.

दलित साहित्याच्या चळवळीचे स्वरूप अभ्यासताना एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात प्रबोधनाच्या ज्या विविध चळवळी सुरू झाल्या त्यांचा आढावा घ्यावा लागतो. या काळातील या चळवळी प्रामुख्याने धर्मांगत वैगुण्ये दूर करणे व स्त्रीप्रश्नांची सोडवणूक करणे या उद्देशाने काम करताना दिसतात. या चळवळींच्या मुळाशी असलेली प्रेरणा अर्थातच ब्रिटीश राजवटीच्या अनुषंगाने परिचित झालेल्या आधुनिक विचारांची होती. यांमध्ये लोकहितवादी ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर असा महाराष्ट्रीय परिवर्तनवादी चळवळींचा विकसित क्रम सांगता येतो. या परिवर्तनवादी चळवळींमध्ये लोकहितवादी, न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर यांचा एक प्रवाह, महात्मा फुले, महर्षी वि. रा. शिंदे, राजर्षी शाहू महाराज इत्यादींनी उभारलेल्या कृतिशील चळवळींचा प्रवाह, आंबेडकरपूर्व दलित मुक्तीची चळवळ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेली चळवळ असे प्रवाह सांगता येतील. या सर्व प्रवाहांच्या मुळाशी असणारी प्रेरणा एकच होती, ती म्हणजे सामाजिक न्यायाची प्रतिष्ठापना करणे, ही होय.

लोकहितवादी, रानडे, आगरकर इत्यादींचे कार्य उच्चवर्णीय समाजातील धार्मिक, सामाजिक प्रश्नांपुरते मर्यादित होते. ब्राह्मणी परंपरेतील चळवळीची ही मर्यादा असली तरी प्रबोधनाच्या आरंभी या चळवळीने केलेले कार्यही तेवढेच महत्त्वाचे होते. अब्राह्मणी परंपरेतील चळवळ महात्मा जोतिबा फुले यांच्यापासून सुरू झाली. या चळवळीने बहुजन समाजातील प्रश्नांचा विचार केला. एका बाजूला स्त्रीशिक्षण, स्त्रीप्रश्न यांना प्राधान्य देत यांनी शेतकरी वर्ग, अस्पृश्य जाती यांच्यासंदर्भातील अनुक्रमे आर्थिक, सामाजिक व धार्मिक प्रश्नांना वाचा फोडली. समाजप्रबोधन व समाजजागृती ही प्रमुख उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून जोतिबांनी लेखन केले.

सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्यांनी सामाजिक असमानतेविषयी वैचारिक मंथन सुरू केले. यांतून त्यांनी हिंदूधर्मातील पुरोहितशाहीला प्रखर विरोध केला. म. फुले यांनी आपल्या लेखन व कार्याद्वारे सामाजिक समता, सामाजिक न्याय व मानवता या मूल्यांकडे पाहायला समाजाला भाग पाडले. जोतिबांच्या चळवळीमुळे महाराष्ट्रात प्रथमच बहुजनसमाज विचारमंथनाच्या प्रक्रियेत सामील झाला. पुढे यांमध्ये अस्पृश्य वर्गही दाखल झाला. गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बंदसोडे, इत्यादींनी या काळात अस्पृश्यतेच्या विरोधात जनजागरणाची मोहिम चालविली आणि ब्रिटीश सरकारचे व समाजाचे लक्ष अस्पृश्यांच्या प्रश्नांकडे वळविले.

महात्मा फुले यांच्यापासून सुरू झालेल्या अब्राह्मणी परिवर्तनवादी चळवळीमध्ये महर्षी वि. रा. शिंदे यांचे कार्यही नजरेआड करून चालणार नाही. महर्षी शिंदे यांच्या कार्याच्या मुळाशी महाराष्ट्रातील विद्रोही भक्ती चळवळीची प्रेरणा होती. विनाकारण अस्पृश्य मानलेल्या वर्गास राजकारणामध्ये सहभाग मिळाला पाहिजे असे त्यांना मनापासून वाटत होते. म्हणूनच त्यांनी दलितांसाठी राखीव जागांचा आग्रह धरला.

राजर्षि शाहू महाराजांनीही आपल्या संस्थानात शूद्रांच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक व आर्थिक विकासाचे कार्य हाती घेतलेले दिसते. त्याकाळात त्यांनी आपल्या संस्थानात नोकरीमध्ये दलितांसाठी राखीव जागा ठेवल्या होत्या. पुढील काळात डॉ. आंबेडकर यांनी राखीव जागांचा आग्रह धरला त्याचे मूळ राजर्षी शाहू महाराज यांच्यावरील धोरणात आढळते.

इ.स. १९२३ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंग्लंड-अमेरिकेतील विद्यापीठीय अभ्यासक्रम संपवून भारतात परत आले. अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करण्याच्या हेतूने त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' नावाची संस्था स्थापन केली. व या कार्याच्या प्रचारासाठी 'बहिष्कृत भारत' हे वर्तमानपत्र सुरू केले. मात्र डॉ. आंबेडकर यांच्या दलितोद्धाराच्या कार्याचा खरा प्रारंभ झाला तो महाडच्या 'चवदार तळे' प्रकरणापासून इ.स. १९२७च्या मार्च महिन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळ्याच्या आंदोलन कृतीतून धार्मिक व सामाजिक क्रांतीचा आरंभ केला. आणि उत्तरोत्तर सामाजिक व राजकीय पातळीवर अस्पृश्यांच्या मूलभूत हक्कांसाठी विविध लढे दिले. मनुस्मृतीसारख्या ग्रंथांनी जातीव्यवस्था जन्मजात मानल्या होत्या. तसेच स्त्रीलाही अनेक प्रकारच्या बंधनात जखडून टाकले होते. डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृतीचे जाहीर दहन केले. यांतून त्यांनी अस्पृश्यता दास्य मुक्तीबरोबर स्त्रीमुक्तीच्या प्रश्नालाही प्राधान्य दिले. भारतीय घटना लिहितानाही डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांबरोबर स्त्रियांनाही मूलभूत हक्क मिळावेत अशी तजवीज केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीने अस्पृश्यांच्या मुक्तीचा लढा उभारला. या लढ्यात अस्पृश्यवर्ग मोठ्या प्रमाणात सामील झाला होता. या समाजाला आत्मभान आणून देण्यासाठी व सामाजिक न्यायाच्या स्थापनेसाठी त्यांना गुलामीची जाणीव करून देणे गरजेचे आहे हे डॉ. आंबेडकरांनी जाणले. यासाठी शिक्षणासारखे दुसरे कोणतेच प्रभावी हत्यार नाही यांची त्यांना कल्पना होती. म्हणून त्यांनी शिक्षणाचे महत्त्व सांगितले व आग्रह धरीला. 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' हा विचार त्यांनी दलितवर्गाला दिला. डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी आणि कार्याने जागृत झालेल्या दलित लोककवींनी त्यांचे विचार खेडोपाडी नेऊन पोहोचविले. त्याकरिता त्यांनी लोककलेचा आधार घेतला. कवने लिहिली, जलशांचा वापर केला, तमाशे लिहिले. अस्पृश्य समाजातील ही वाङ्मयनिर्मिती हा दलित साहित्याचा प्रारंभ मानता येईल. या वाङ्मयाचा हेतू प्रामुख्याने डॉ. आंबेडकरांचे विचार अस्पृश्य समाजापर्यंत पोहोचविणे हा होता. उदाहरणार्थ, मेलेल्या ढोरांचे मांस खाऊ नका, मेलेली गुरे ओढू नका इत्यादी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आत्मसन्मानी विचारांचे शाहिरांनी आपल्या कवनांतून आवाहन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना राजकीय व सामाजिक हक्क मिळवून देण्यासाठी वेळोवेळी ज्या भूमिका घेतल्या त्या भूमिकांचे पडसाद शाहिरांच्या कवनांतून उमटले. याकाळात डॉ. आंबेडकर हेच दलितसमाजाचे एकमेव नेते म्हणून त्यांना मान्यता प्राप्त झाली होती. म्हणूनच गोलमेज परिषदेमध्ये दलितवर्गाच्या बाजूने त्यांना आमंत्रित करण्यात आले होते. याकाळात नेता म्हणून डॉ. आंबेडकरांनी लोकप्रियता प्राप्त केली होती. परिणामी डॉ. आंबेडकर यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या व्यक्तित्त्वाचा, कार्याचा गौरव करणारी कवनेही याकाळात लिहिलेली दिसतात. या कवनातून या शाहिरांनी आंबेडकरांना नायकपदी बसविले. थोडक्यात, या काळात आंबेडकरी विचार व त्यांचे कार्य यांना विषय बनवून कवने लिहिणारे अनेक शाहीर आढळतात. किसन फागू बंदसोडे, गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, अण्णा भाऊ साठे, शाहीर भीमराव कर्डक, वामनदादा कर्डक इत्यादींचा उल्लेख करता येईल.

२३ ऑक्टोबर १९३५ला येवले येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या परिषदेत डॉ. आंबेडकर यांनी 'मी हिंदू म्हणून जन्मलो, त्यास माझा इलाज नव्हता, पण मी हिंदू म्हणून मरणार नाही' अशी घोषणा केली. आणि २५ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या अनुयायांसह नागपूर येथे धर्मांतर करून त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. या धम्मपरिवर्तनानंतर लगेचच डिसेंबर १९५६ला डॉ. आंबेडकर यांचे महानिर्वाण झाले. याचबरोबरीने याकाळात दलितांची पिढी शिकून सवरून बाहेर पडली होती. यासर्वांचा परिणाम म्हणून याकाळातील दलित कवितेचा चेहरा बदललेला दिसतो. १९६० ते ८० या काळात केशव मेश्राम, वामन निंबाळकर, नामदेव ढसाळ, दया पवार, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, ज. वि. पवार, यशवंत मनोहर, फ. मुं. शिंदे, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार इत्यादींनी काव्यलेखन केलेले आहे. या कवीने आपल्या काव्यातून सामाजिक

स्थितीगती स्पष्ट व दाहक स्वरूपात साकारली. शोषणाधिष्ठित जातिव्यवस्थेत नकार देणारी बंडखोर विद्रोही जाणीव या कवितेच्या मुळाशी आहे. याच जाणिवेतून दलित नाटकही साकारले. दत्ता भगत, प्रेमानंद गज्वी, रामनाथ चव्हाण, टेक्सास गायकवाड, रुस्तम अचलखांब, संजय पवार इत्यादी दलित नाटककारांनी दलित रंगभूमीला आपल्या प्रतिभेने संपन्न केले. याचपद्धतीने दलित कथा, कादंबरी, आत्मकथने हे साहित्यप्रकार मराठी वाङ्मयात आले. या सर्व साहित्यप्रकारांच्या मुळाशी असणाऱ्या प्रेरणा मात्र समान होत्या. त्याम्हणजे प्रस्थापित जातीय व्यवस्थेला विरोध करणे, तिला नकार देणे, तिच्याविषयी विद्रोहाची भावना प्रकट करणे, प्रस्थापित जातिबद्ध समाजव्यवस्थेमुळे दलित वर्गांना कोणकोणत्या यातनांना, दु:खांना सामोरे जावे लागले हे सांगणे, आणि विषमाधिष्ठित समाजरचना नष्ट झाली पाहिजे 'माणूस' म्हणून माणसाला मूल्य प्राप्त झाले पाहिजे याविषयी आग्रह धरणे, अशा समान प्रेरणा या सर्व साहित्यप्रकाराच्या मुळाशी आहेत. या प्रेरणा कोणा एका विशिष्ट व्यक्तीच्या प्रेरणा नसून समाजाच्या प्रेरणा आहेत, म्हणून दलित साहित्यात आत्मनिष्ठेपेक्षा समूहनिष्ठेचे चित्रण मोठ्या प्रमाणात येताना दिसते. दलित साहित्य हे या विशिष्ट आवर्तनात सापडले गेले असले तरी प्रत्येक दलित साहित्यिकाचा अनुभव कमीजास्त प्रमाणात तोच आहे हे लक्षात घ्यावे लागते. दलित साहित्याने आपले अनुभवविश्व माणसामाणसापर्यंत पोहोचवले आणि संवेदनशील वाचकांच्या मनात परिवर्तनशील समाजाची आवश्यकता रुजविण्याचा प्रयत्न केला, करीत आहे, त्यांचे हे वाङ्मयीन कार्य म्हणूनच महत्त्वाचे आहे.

❖❖❖❖❖

# ६

# दलित साहित्याची संकल्पना–विविध भूमिका

उद्दिष्टे :

१) 'दलित' या पदाचा अर्थ समजावून घेणे.

२) 'दलित साहित्य' या पदातील 'दलित' कोण? हे स्पष्ट करणे.

३) दलित जाणिवेचे विशेष पडताळणे.

४) 'दलित साहित्या'च्या विविध व्याख्या तपासणे.

५) या व्याख्यांच्या अनुषंगाने 'दलित साहित्य' व 'दलित' या संकल्पनांकडे पाहाणारे दोन दृष्टिकोन जाणून घेणे.

दलित साहित्याची संकल्पना समजावून घेताना सर्वात प्रथम 'दलित' व 'दलितत्त्व' या संज्ञाचा विचार करता येईल.

## 'दलित' व 'दलितत्त्व'

अत्यंत विषम मूल्यांवर आधारलेल्या नि पिळवणुकीचा पुरस्कार करणाऱ्या भारतीय समाजव्यवस्थेत–तिने आखून दिलेल्या चाकोरीप्रमाणे जीवन कंठणारे कर्मदरिद्री, धनदरिद्री, ज्ञानदरिद्री, असंघटित व म्हणून शक्तिहीन, पैसाहीन, शस्त्र व सत्ताहीन, लाचार-दीन-दुबळे असे जे लोक ते सर्व म्हणजे 'दलित' होत.

दलित म्हणजे दळले गेलेले, पिळले गेलेले, समाजजीवनापासून दूर फेकले गेलेले वंचित व उपेक्षित असे लोक किंवा त्यांचा समूह होय. याठिकाणी 'समूहा'मध्ये अस्पृश्येतर दलित म्हणजेच आदिवासी, तेली, माळी, कुणबी इत्यादी शूद्र जाती-जमाती अपेक्षित आहेत.

## 'दलित' या शब्दामागची पूर्वपीठिका

इ.स. १९४२ साली 'ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' संघटनेची नागपूरला स्थापना झाली. तेव्हापासून 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' या इंग्रजी शब्दाला 'दलित फेडरेशन' असा मराठी शब्दप्रयोग पुढे आला. या शब्दप्रयोगात 'शेड्युल्ड कास्ट' या इंग्रजी शब्दासाठी 'दलित' हा मराठी शब्द वापरण्यात आला. याआधी ४ नोव्हेंबर १९३१ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रा. आर. श्रीनिवासन यांनी राऊंड टेबल कॉन्फरन्सला आदल्या वर्षी सादर केलेल्या खलित्याला जोडून काही पुरवणी मागण्या सादर केल्या. ह्या पुरवणी मागण्यातील तिसरे कलम 'डिप्रेस्ड क्लासेस'ची (वि. रा.

शिंदेकृत) व्याख्या करण्याची आवश्यकता प्रतिपादणारे आहे. यामध्ये निवडणुकीच्या कामकाजासाठी अस्पृश्य जमातीची एक सूची तयार करण्यात यावी, अशी सूचना आहे. अशा तऱ्हेची सूची (म्हणजे शेड्युल्ड) तयार झाल्यानंतर 'शेड्यूल्ड कास्ट' हा शब्द अस्तित्वात आला. यावरून 'शेड्युल्ड कास्टस्' म्हणजे आजच्या अनुसूचित जाती. यामध्ये अनुसूचित जाती म्हणजे मुख्यत्वे अस्पृश्य जाती होय. पुढे इ.स. १९४२ला शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे 'दलित फेडरेशन' असे नामकरण झाले. म्हणून 'दलित' या शब्दामध्ये अस्पृश्य जातीचा संदर्भ अभिप्रेत आहे.

महर्षी वि. रा. शिंदे यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' या ग्रंथात 'डिप्रेस्ड क्लासेस' याकरिता 'दलित' हा शब्द वापरून त्यामध्ये महार, मांग, परिया नामक शूद्र जातींचा उल्लेख केला आहे. डॉ. ॲनी बेझंट आणि बॅनर्जी यांनीही अस्पृश्यांना 'डिप्रेस्ड क्लासेस' म्हणूनच संबोधले आहे. पुढे या शब्दासाठी मराठीत 'बहिष्कृत समाज' हा शब्द वापरात आला. डॉ. आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्राचे ठेवलेले 'बहिष्कृत भारत' (१९२७) हे नाव व आपल्या पहिल्या संघटनेचे 'बहिष्कृती हितकारिणी सभा' (१९२४) हे नाव यादृष्टीने बोलके आहे. म्हणजेच बहिष्कृत वर्ग, शेड्यूल्ड कास्ट, अनुसूचित जाती किंवा 'दलित' हे सर्व शब्द समानअर्थी असून त्यातून 'अस्पृश्य जाती'चाच बोध होतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबईत इ.स. १९४६च्या सुमारास 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली आणि तिच्यामार्फत 'सिद्धार्थ कॉलेज' सुरू केले. सिद्धार्थ कॉलेजमधून बाहेर पडलेल्या पहिल्या पिढीने इ.स. १९५० साली 'सिद्धार्थ साहित्य संघ' ही वाङ्मयीन संस्था स्थापन केली. पुढे यातूनच १९ जुलै १९५३ला 'महाराष्ट्र दलित साहित्य संघ' नावाची संस्था स्थापन करण्यात आली. यानंतर १२ सप्टेंबर १९५३च्या 'जनता' साप्ताहिकात 'दलित साहित्याचे समालोचन' हा आ. श्री. रणपिसे यांचा लेख मिळतो. म्हणजेच इ.स. १९५३ला 'दलित साहित्य' हा शब्दप्रयोग वापरला गेला. यानंतर 'जयभीम' साप्ताहिकात 'दलित साहित्याची अनास्था' हा लेख २८ फेब्रुवारी १९५५ला प्रकाशित झाला. तसेच १ मार्च १९५८च्या 'प्रबुद्ध भारत' या अंकात 'मराठी रंगभूमीवरील दलितवर्गीयांचा वारसा', 'दलित समाज आणि मराठी कादंबरी', 'दलितांचे कथावाङ्मय', 'दलितांची शाहिरी', 'बौद्ध वाङ्मय', 'दलितांची वर्तमानपत्रे' इत्यादी लेख प्रकाशित झालेले आहेत. पुढे धम्मचक्र प्रवर्तनानंतर 'महाराष्ट्र दलित साहित्य संघ' या संस्थेचे १२ मार्च १९६१ पासून 'महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद' असे नामांतर झाले. इ.स. १९५१ साली अण्णाभाऊ साठे यांनी 'वारणेच्या खोऱ्यात' या आपल्या कादंबरीच्या अर्पणपत्रिकेत 'दलित साहित्य' हा शब्द वापरलेला दिसतो. पुढे 'दलित साहित्य' हाच शब्द रूढ झाला. उदाहरणार्थ, 'जनता' व 'प्रबुद्ध भारता'तून इ.स. १९५६ मध्ये मिलिंद यांनी लिहिलेला 'दलित वर्गीयाचे अर्वाचीन वाङ्मय' हा लेख, इ.स. १९५८ मध्ये लखमापुरकर यांनी लिहिलेला 'दलितांचे काव्यवाङ्मय' हा लेख, तसेच शाम सरवदे यांचा 'दलित समाज आणि मराठी कादंबरी' हा लेख, इ.स. १९६५ मधील एम. ए.

आंबेडकर यांचा 'पददलितांचे वाङ्मय' हा लेख, इत्यादी लेखांच्या शीर्षकामध्ये 'दलित' या शब्दाचा वापर केलेला दिसतो. यातील 'दलित' हा शब्द अस्पृश्य वर्गाचा निर्देशक आहे. म्हणजेच पूर्वाश्रमीचा अस्पृश्य म्हणजेच 'दलित' होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही 'रिपब्लिकन पार्टी'च्या स्थापनेची सूचना करताना या पार्टीमध्ये अनुसूचित जाती, जमाती, नवबौद्ध, अन्य मागासवर्गीय, श्रमिक, भूमिहीन शेतमजूर, स्त्रिया इत्यादींचा समावेश करावा असे म्हटलेले आहे. हेही लक्षात घेणे आवश्यक आहे.

अस्पृश्यता हे भारतीय संस्कृतीचे एक रूप आहे. हिंदू परंपरेने काही जातींना कायमचे अस्पृश्य मानले. त्यांच्यासाठी व्यवस्थेने आर्थिक आणि सामाजिक अशा दोन्ही पातळ्यांवरील स्वातंत्र्य नाकारले. माणसाला माणूस म्हणून हवी असणारी प्रतिष्ठाच हिरावून घेतली गेली. म्हणून अस्पृश्य दलितांचे जीवन हा दलित साहित्याचा एक प्रमुख चित्रणविषय ठरला. पण दलित साहित्य एवढ्यापुरते मर्यादित नाही. कारण दलित साहित्यातील 'दलित' हा शब्द विशिष्ट समूहवाचक किंवा जातिवाचक नाही. तर त्यामध्ये अस्पृश्य दलितांप्रमाणेच बहुजनजातींचाही समावेश आहे. अस्पृश्य दलितांप्रमाणेच या बहुजन जातींचीही सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक इत्यादी क्षेत्रांत कमीजास्त प्रमाणात पिळवणूक केली गेली आहे. म्हणून हा बहुजन समाज सामाजिक, सांस्कृतिकदृष्ट्या दलितच ठरतो. दलित साहित्यातून या समाजाचेही जीवनचित्रण पाहावयास मिळते. दलित साहित्य भारतीय समाजरचनेचे अर्थकारण व राजकारण यांवरही भाष्य करते. सांस्कृतिक, सामाजिक समाज व्यवस्थेने ज्या दलितांची पिळवणूक केली आणि ज्यांना 'दलित' बनवायला भाग पाडले त्यामध्ये आर्थिक विषमतेनेही बऱ्यापैकी हातभार लावलेला आहे. म्हणून भारतातील सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात ज्यांच्या वाट्याला वंचित, उपेक्षित, अवमानित आणि अन्याय जुलुमांचे जगणे आले आहे. त्या जाती, वर्ग, गट या सर्वांतील लोकांना 'दलित' म्हणता येईल. आणि त्यांच्या जीवनाचे चित्रण करणाऱ्या साहित्याला दलित साहित्य म्हणता येईल.

### 'दलित' संकल्पना

'दलित' संकल्पनेच्या संदर्भातील वेगवेगळ्या विचारवंतांच्या भूमिकांचा थोडक्यात पुढीलप्रमाणे आढावा घेता येईल.

श्री. शंकरराव खरात यांच्या मते, 'सामाजिक जाणिवेच्या दृष्टीकोनातून 'दलित' या शब्दप्रयोगात हिंदू धर्माने व संस्कृतीने अस्पृश्य या जातीचा समावेश होतोच. पण याशिवाय आदिवासी, विमुक्त जमाती व भटक्या जमाती यांना जन्माने, जातीने, धंद्याने तसेच परंपरागत रूढीने दूर बहिष्कृत, अस्पृश्य म्हणून ठेवले, रानटी, भटके, गुन्हेगार म्हणून ठेवले. त्यांना माणसाप्रमाणे मानले नाही त्यांचा सामाजिक दर्जा खालचा, कमी प्रतीचा ठरवला तसा मानला. या सर्व जाती जमाती दलितांतच येतात.'

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यामते 'दलित हा मानवी प्रगतीत सर्वात मागे पडलेला आणि रेटलेला सामाजिक वर्ग आहे.'

प्रा. जनार्दन वाघमारे लिहितात, 'भारतीय दलिताला अनेक शतकांपासून संस्कृतीच्या, धार्मिक व सामाजिक जीवनाच्या बांधणीत व विकासात बरोबरीचा हिस्सा मिळू शकला नाही. या देशाचा वारसदार असूनही त्याला वारसा प्राप्त झाला नाही. तो या देशाचा, पण हा देश त्याचा कधीच होऊ शकला नाही, असा तो दलित.'

प्रा. केशव मेश्राम यांच्या मते, 'दलित हा शब्दच स्फोटक आहे. महान संस्कृतीचे गोडवे गाणारी समाजव्यवस्था, तिने स्वीकारलेली धर्म व ईश्वर ही भयस्थाने, त्यांना साहाय्याभूत होणारी चातुर्वर्ण्यव्यवस्था, तिच्यातून निर्माण झालेले जन्माधारित वंशश्रेष्ठत्व अशा या काटेरी साखळीत फार मोठा समाज तिरस्कृत ठरला गेला त्यामुळे उद्घोष मानवतेचा असला तरी कृत्य अमानवीपणाचे, चर्चा बंधुत्वाची पण वागणूक शत्रुत्वाची. मूल्यसमानतेचे पण पद्धती विषमतेची, अशा दाहक अनुभवातून पिळवटल्या गेलेल्या माणसांच्या अनंत दु:ख-अपेक्षांना, प्रतिकाराच्या हुंकाराला, मूल्य व अस्मितेच्या शोधाला, दलित शब्द प्रेरक ठरला आहे.'

नामदेव ढसाळ सांगतात, 'दलित म्हणजे अनुसूचित जातिजमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी इत्यादी,' होय.

डॉ. प्रभाकर मांडे यांच्या मते, 'दलित म्हणजे अशा व्यक्तींचा समूह, ज्यांचा माणूस म्हणून जगण्याचा हक्क हिरावला गेला आहे. ज्यांच्या जन्माने ज्यांच्या वाट्याला या समाजरचनेत एकाच प्रकारचे जीवन आले आहे, माणूस म्हणून ज्यांचे मूल्य अव्हेरिले गेले आहे, ज्यांना माणसासारखे मानाने जगणे नाकारले गेले आहे ते दलित,' होय.

बाबुराव बागूल यांच्या मते, 'दलित म्हणजे वर्णव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उद्ध्वस्त करू बघणारा, दलित म्हणजे हे जग आणि जीवन नव्याने मांडू बघणारा, दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत, प्रलयंकारी केलेले आहेत आणि ज्याच्यासाठी आधुनिक शस्त्रे आणि शास्त्रे उपलब्ध करून दिलेली आहेत तो.' तसेच यामध्ये अमेरिकेतील काळा, गोरा, तांबडा, आफ्रोएशियायी देशातील काळा-गोरा-पिवळा येतात' अशी पुस्तीही ते जोडतात.

डॉ. म. वा. वानखेडे, 'दलित म्हणजे केवळ बौद्ध अथवा मागासवर्गच नव्हे, तर जे पिळले गेलेले असे श्रमजीवी आहेत ते सर्व 'दलित' म्हणून सांगतात.'

डॉ. सदा कऱ्हाडे लिहितात, 'आर्थिकदृष्ट्या व सामाजिक दृष्ट्या मिळून एक सर्वसमावेशक दलित वर्ग मानता येईल. त्यात कामगार, शेतमजूर, उपजीविकेसाठी श्रमणारे आणि अस्पृश्यही येतील... ज्यांची पिळवणूक होते ते दलित,' होय.

तर प्रा. यशवंत मनोहर यांच्या मते, 'शोषितांची जात शोषित. शोषणाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इत्यादी सर्वच प्रकारांनी कोंडलेले शोषितांचे सर्वच नातेवाईक घटक हे दलित होत.'

'दलित' या संज्ञेसंदर्भातील वरील व्याख्यांमधून परस्परविरुद्ध विचारधारा व्यक्त होतात. शंकरराव खरात, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. जनार्दन वाघमारे, प्रा. केशव मेश्राम, नामदेव ढसाळ, डॉ. प्रभाकर मांडे इत्यादींनी दलित संज्ञेचा अर्थ भारतीय जाती-वर्गीय परंपरेतील समाजस्थितीशी निगडित लावलेला आहे. हा अर्थ दलित साहित्याच्या मूळ प्रयोजनावर व प्रेरणेवर प्रकाश टाकतो. तर बाबुराव बागूल, डॉ. म. ना. वानखेडे, डॉ. सदा कऱ्हाडे, प्रा. यशवंत मनोहर यांनी 'दलित' संज्ञेला अतिव्याप्त अर्थ दिलेला दिसतो. त्यांनी आर्थिक विषमतेवर जास्त भर दिल्याने मूळ भारतीय समाजरचनेतील दलितांच्या समस्येकडे काहीसे दुर्लक्ष झालेले दिसते.

'दलित' या संकल्पनेत मोडणाऱ्या व्यक्तीचे शोषण सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक या सर्वच पातळ्यांवर झालेले आहे. अशा समाजाचे शंकरराव खरात अस्पृश्य, गुन्हेगार, भटके आणि आदिवासी असे चार गट कल्पितात. महाराष्ट्र शासनाने उपेक्षित जातींचे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त व भटक्या जमाती असे चार गट केले आहेत. यात शंकरराव खरात यांनी कल्पिलेल्या चार गटांचाच अंतर्भाव केलेला आहे व या सर्व जातींना 'दलित' हे संबोधन लावले आहेत. मात्र मंडल आयोगानंतर यामध्ये आर्थिकदृष्ट्या उपेक्षित लोकांचा अंतर्भाव झाला आहे. मात्र यातील आर्थिकदृष्ट्या उपेक्षित लोकांना मंडल आयोगाच्या शिफारशींनुसार सवलती घेणे मान्य आहे. पण आपल्याला 'दलित' संबोधणे त्यांना मान्य नाही. याचा अर्थ भारतीय समाजात 'दलित' या संकल्पनेचा अर्थ जन्माधिष्ठित जातीच्या संदर्भात घेतला जावा असाच आग्रह दिसतो. कारण आपल्या सामाजिक प्रतिक्रिया संकल्पनेत 'जात' हाही घटक महत्त्वाची भूमिका बजावतो. इथे मात्र 'दलित' म्हणजे 'पददलित' हाच अर्थ अभिप्रेत आहे.

### दलित साहित्यातील 'दलित'संज्ञा

दलित साहित्यामध्ये माणसाला त्यांच्या जन्मामुळे वाट्याला येणाऱ्या यातनांचे चित्रण येते. स्थूलमानाने या प्रवृत्तीच्या साहित्यात व्यक्त होणारे दु:ख हे प्रामुख्याने पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांचे दु:ख आहे. या दु:खाच्या मुळाशी शोषणाधिष्ठित समाजरचना आहे. येथील आदिवासी समाज अवर्णीय आहे. पण या समाजाच्याही वाट्याला वरीलप्रमाणेच दु:ख येते. भटक्या-विमुक्त जातींच्याही वाट्याला असेच दु:ख येते. आज 'दलित साहित्य' या नावाने जे साहित्य ओळखले जाते, त्या साहित्यात समतेची व न्यायाची वागणूक समाजाकडून मिळत नाही याचीच वेदना तीव्रतेने व्यक्त होताना दिसते. म्हणून दलित साहित्यातील 'दलित' हा जन्माने दलित आहे, शोषित आहे. उदाहरणार्थ, बाबुराव बागूल, दया पवार, नामदेव ढसाळ, प्र. ई. सोनकांबळे, शंकरराव खरात, यशवंत मनोहर इत्यादी साहित्यिक

जन्माने अस्पृश्य आहेत. तर भुजंग मेश्राम, लक्ष्मण माने, दादासाहेब मोरे, आत्माराम राठोड, लक्ष्मण गायकवाड हे साहित्यिक आदिवासी, भटके-गुन्हेगार जमातीपैकी आहेत. म्हणजेच 'दलित साहित्य' यातील 'दलित' हा शब्द जन्मापासून दलित-शोषित या अर्थाने वापरला जातो.

'दलित साहित्य' या संज्ञेसंदर्भात वेगवेगळ्या विचारवंतांनी मांडलेल्या मतांचा, व्याख्यांचा थोडक्यात आढावा घेता येईल.

पु. ल. देशपांडे यांच्या मते, 'दलित वाङ्मयाने मराठी साहित्यात प्रथम जर काही आणले असेल तर संतापातून चमकणारे अश्रू. अन्यायाविरुद्ध उठताना संतापातून फुटणाऱ्या अश्रूंचे मोल हे सर्वात मोठे असते. सामान्यांच्या भाषेत हा तळतळाट असतो. ह्याच तळतळाटाचे एक उदात्त स्वरूप म्हणजे दलित साहित्य.'

डॉ. म. ना. वानखेडे यांच्या मते, 'दलित साहित्य म्हणजे दलित लेखकांनी दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य.'

प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख, 'दलित जीवनाचे दर्शन देणारे, दलितांच्या विचार-भावना प्रकटवणारे दलितांनीच लिहिलेले साहित्य ते दलित साहित्य.'

बाबुराव बागुल, 'माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश, वर्ण आणि जातिश्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य.'

प्रा. केशव मेश्राम, 'हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृश्यांना दलित म्हटले पाहिजे व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्यास दलित साहित्य म्हणावे.'

पुढे जाऊन ते म्हणतात, 'ज्या साहित्यविश्वाला पूर्वपिढ्यांच्या व स्वानुभवांच्या झळांची झळाळी आहे. नेस्तनाबूत केलेल्या मानवी अस्मितेची उभारी आहे, विपरिततेच्या गर्तेतून व उपलब्ध वाङ्मयविश्वाच्या पोकळ कोलाहलातून स्वतंत्रपणे आकारण्याची आकांक्षा आहे ते दलित साहित्य.'

प्रा. शरद्च्चंद्र मुक्तिबोध, 'दलित असणे व दलित जाणीव असणे हे भिन्न आहे. दलित जाणिवेतून दलित जीवनविषयक जे वाङ्मय निर्माण होते ते दलित वाङ्मय.'

प्र. श्री. नेरुरकर, 'दलित समाजात जन्माला आलेल्या व दलित वर्गाची पिळवणूक त्यांचा विविध स्तरावर पाशवी छळ व त्यांचे माणुसकीला मुकलेले जीवन, यांचा प्रत्यक्ष व जिवंत अनुभव घेणाऱ्या दलित वर्गातील साहित्यिकांनी मराठीत पहिलावहिला केलेला प्रक्षोभक, विद्रोही व सर्जनपुष्ट आविष्कार म्हणजे दलित साहित्य होय.'

प्रा. म. भि. चिटणीस, 'दलित वर्ग हा भारताचा एक पुराण, मूक आणि अदृश्य पुरुष होता आणि त्याचा अनुभव आज वाङ्मयरूप घेत आहे. हा सगळा संदर्भ 'दलित' शब्दाला द्यावा लागेल.'

डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये, 'यंत्रकुशल युगातही मनूप्रणित सनातनी समाजव्यवस्थेचा जाच असह्य होत असून दलित समाजाची अस्मिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जागृत केल्यामुळे दलितांत प्रखर विद्रोही वृत्ती निर्माण होत आहे. चीड, संताप, बंडखोरी ही या प्रवृत्तीची काही लक्षणे. या वृत्तीचा कलात्मक, अकलात्मक आविष्कार म्हणजे आजचे दलित साहित्य,' होय.

सुधीर बेडेकर, 'दलित साहित्य हा अशा लोकांचा संताप, त्यांचा विद्रोह व त्यांच्या मानवतावादी दृष्टीचा उद्रेक आहे, ज्यांना पुन्हा इतिहासात जायचे नाही. कारण या देशाचा इतिहास भयानक आहे, माणूसपणाच्या प्रेतावर रचलेला आहे. त्यांना विशुद्धही व्हायची इच्छा नाही, कारण भोवतालच्या गलिच्छपणापासून दूर पळण्याचा भेकडपणा त्यांच्या अंगी नाही. त्यांना नवा समाज घडवायचा आहे, व नवे साहित्य घडवायचे आहे. भांडवलशाही व सामंतशाही दोहींना नष्ट करून मानवशाही आणायची आहे.'

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, 'दलितांनी निर्माण केलेल्या साहित्याचा गाभा व त्यातून येणारी प्रेरणा कशी आहे, ते तपासले पाहिजे. दलितांची दु:खे, कुचंबणा, गुलामगिरी, कौटुंबिक अध:पात, विपन्नावस्था, विटंबना त्याबरोबरच दारिद्र्यातही तळपणारे सामर्थ्य, शौर्य, माणुसकी इत्यादीचे साहित्य होय.'

पुढे जाऊन ते म्हणतात, 'दलितांची समस्या म्हणजे मानवी स्वातंत्र्याची समस्या होय. दलितांच्या समस्येचा प्रत्यय आल्याशिवाय मानवी स्वातंत्र्याच्या समस्येचा अर्थ समजणार नाही. असा हा व्यापक प्रत्यय ज्या साहित्याच्या मुळाशी असतो ते साहित्य दलित साहित्य जसे असते तसे ते मानवाचेही साहित्य असते.'

प्रा. गंगाधर पानतावणे, 'दलित साहित्याची चळवळ हा एक मुक्तिसंग्राम आहे. स्वत:ला शोधण्याचा तो एक प्रभावी प्रयत्न आहे. मराठी वाङ्मयात माझे असे चित्र कोणीही रेखाटले नाही. हे चित्र रेखाटण्याची धडपड म्हणजे दलित साहित्य. तो कोंडलेल्या मनाचा हुंकार आहे.

त्याचप्रमाणे ते सांगतात, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्वालाग्राही तत्त्वज्ञानातूनच जन्माला आलेले दलित साहित्य केवळ दलितांसाठी लिहिलेले नव्हे. क्रांतिविन्मुखता आणि क्रांतिसन्मुखता यांच्या संघर्षातून निर्माण झालेले दलित साहित्य बंधमुक्त माणसाचा विचार करते, असे म्हणता येईल. हा बंधमुक्त माणूस भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भातील आहे.'

श्री. दि. के. बेडेकर, 'माझा समाज आजवर दलित होता, त्याला आता प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. ही प्रवृत्ती या साहित्यात दिसते. दलित जीवनाचे वास्तव लढाऊ समाजपरिवर्तनाची व माणुसकीची जिद्द, तिचा उद्‌गार व आविष्कार म्हणजे दलित साहित्य.' होय.

श्री. राजा ढाले, 'जो जो या समाज-रचनेविरुद्ध आणि सांस्कृतिक व्यूहाविरुद्ध लढणारा दृष्टिकोन घेऊन साहित्यनिर्मिती करील आणि वाट चुकलेल्या समाजाला वाटेवर आणील तो तो दलित साहित्यिक असेल आणि त्याचे साहित्य हे दलितांच्या दृष्टिकोनातून लिहिलेले असेल.'

प्रा. दत्ता भगत म्हणतात, आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवनविषयक दृष्टिकोनाधारे स्वत:ला आणि स्वत:भोवतीच्या वास्तवाला जाणून घेण्याच्या उत्कट इच्छाशक्तीचा शब्दरूप आविष्कार म्हणजे दलित साहित्य.

वरील व्याख्यांचा विचार करता या व्याख्या 'दलित' या माणसाला केंद्रवर्ती ठेवून केलेल्या व्याख्या आहेत. दलित लेखकांनी दलित जीवनाविषयी दलित अनुभूती, दृष्टी व दलित जाणिवेतून निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य ते दलित साहित्य होय. 'दलित' लेखकाला कोण्या एका जातीचा संदर्भ नाही, तर 'दलित अवस्थे'ची प्रामाणिक जाणीव जगणारा व ती उरीपोटी बाळगणारा लेखक तो दलित लेखक. दलित लेखकांनी लिहिलेले दलित साहित्य हे दलितांसाठीच केवळ नसून ते सर्वांसाठी, सर्वांसर्वांचे साहित्य आहे असे समजले पाहिजे. दलित साहित्याच्या नावापासून त्याच्या व्याख्येपर्यंत परस्परविरुद्ध असलेली मते आढळतात. यांतील काही मते एकाच व्यक्तीची मागाहून बदललेलीही दिसतात. उदाहरणार्थ, डॉ. म. ना. वानखेडे यांच्या मूळ भूमिकेनुसार ते 'दलित' व दलित साहित्याकडे प्रखर सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातूनच पाहात होते. पण नंतर ते 'आर्थिक' दृष्टिकोनातून वर्गवादाकडे झुकलेले दिसतात. नागपूर येथील दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून ते म्हणतात, 'दलित' या शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीयच नव्हे, तर जे जे पिळले गेलेले श्रमजीवी आहेत ते सर्व 'दलित,' होय.

दलित साहित्यासंदर्भात अजून काही विचारांचा मागोवा घेता येईल.

डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात, 'आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या मिळून एक सर्वसमावेशक दलितवर्ग मानता येईल. त्यात कामगार, शेतमजूर, उपजीविकेसाठी श्रमणारे आणि अस्पृश्यही येतील. ज्यांची पिळवणूक होते ते दलित.'

पुढे ते म्हणतात, 'दलित साहित्याला पुरोगामी म्हणायला काहीच हरकत नाही. कारण मार्क्सवादी तेवढेच पुरोगामी साहित्य नव्हे. अर्थातच पुरोगामी साहित्य मार्क्सवादी असू शकते यात शंका नाही. मार्क्सवाद व आंबेडकरवाद यांचा आपण समन्वय करू शकलो तर नक्कीच समाजाला काही तरी देऊ शकू.'

गो. पु. देशपांडे यांच्या मते, 'दलित साहित्य म्हणजे दलितांनी किंवा दलितांसाठी लिहिलेले साहित्य नव्हे, तर दलित संवेदनशीलतेतून जन्मलेले साहित्य,' होय.

कवी अनिल ऊर्फ आ. रा. देशपांडे म्हणतात, 'दलितांच्या जीवनाची संवेदनापूर्ण जाणीव ठेवून लिहिलेले साहित्य ते दलित साहित्य,' होय.

प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या मते, 'प्रत्येक मानवाला स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि भीतीशून्य सुरक्षितता मिळाली पाहिजे अशा भूमिकेवरून निर्माण झालेली एक जीवनदृष्टी वाङ्मयात अभिव्यक्त होत आहे त्याला मी दलित साहित्य मानतो.'

तर यशवंत मनोहर म्हणतात, 'दलित साहित्य हे वर्णबळींचे आणि वर्गबळीचे साहित्य. बाबासाहेबांच्या वाणीचा हा वाङ्मयीन वणवा आहे. संस्कृतीने ज्यांची पोटे आणि मनेही उपाशी ठेवली त्या उपेक्षितांच्या हृदयांचे, मेंदूचे हे जिवंत ललिताकार आहेत. या साहित्याच्या पोटी एका मानवकेंद्री सुसभ्य युगाचा गर्भ वादळी निकराने वाढतो आहे.'

'दलित साहित्य' संकल्पनेबद्दलचे दलित-अदलित विचारवंताचे अभिप्राय पाहिले तर असे स्पष्ट होते की या साहित्यप्रवाहाजवळ दोन वेगवेगळ्या दृष्टींनी पाहिले जाते. १) आंबेडकरवादी प्रेरणेचा प्रखर सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोन आणि २) मार्क्सवादी आर्थिक पाया मानणारा वर्गीय दृष्टिकोन. यांपैकी पहिला दृष्टिकोन भारतीय 'दलित' जीवनाशी निगडित आहे तर दुसरा दृष्टिकोन साऱ्या जगातील दलित प्रश्न एकच आहे असे सांगतो. मात्र भारतेतर दलित समस्या भारतीय दलितांची समस्या होऊ शकत नाही. याचेकारण भारतीय आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती जगातील या प्रकारच्या परिस्थितीहून भिन्न आहे. म्हणून भारतीय 'दलित' संकल्पना वर्गीयपेक्षाही सामाजिक, सांस्कृतिक संकल्पना आहे.

वामन निंबाळकर यांनी दलित साहित्याच्या संदर्भात दिलेले निष्कर्ष दलित साहित्य संकल्पनेवर पुरेसा प्रकाश टाकणारे आहेत. हे निष्कर्ष पुढीलप्रमाणे,

१) दलित साहित्य हे दलित जाणिवेतून निर्माण झालेले एका नकाराचे व एका स्वीकाराचे जीवनविषयक साहित्य आहे.

२) दलित साहित्य हे वर्ण आणि वर्गवादाच्या विरोधी वाङ्मयीन आवाज उठविते.

३) हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्याचा ते कडाडून विरोध करते व माणसाच्या नीतिमान प्रवृत्तीचा ते स्वीकार करते.

४) प्रत्येक माणसाच्या प्रगतीचा ते आलेख मांडते. म्हणूनच त्यांच्यासाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय आणि प्रज्ञा, शील, करुणा या मानवी मूल्यांचा भरभक्कमपणे पुरस्कार करते.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभ्या केलेल्या अस्पृश्यता निवारण चळवळीतील हा वाङ्मयीन पवित्रा आहे.

६) अ) या देशातील सामाजिक, आर्थिक विषमता, दलितांवरील अन्याय-अत्याचार, दास्य, दैन्य, लाचारी, रूढीवाद, परंपरा, देव, धर्म, चमत्कार, अंधश्रद्धा आदी माणसाचे व माणुसकीचे एक नंबरचे शत्रू आहेत म्हणून.

ब) त्यांच्यापासून माणसाला मुक्त करण्यासाठी 'दलित साहित्य' त्यांचा हुंकार झालेले आहे. प्रक्षोभ झालेले, विद्रोह झालेले आहे.

७) दलित साहित्य हे समाजवादी, जीवनवादी, नीतिवादी, जडवादी भूमिका घेऊनच प्रकटते.

८) मराठी वाङ्मयाच्या सातशे वर्षांच्या इतिहासात ज्यांना प्रवेशच देण्यात आला नव्हता तो आज ज्या साहित्यातील नायक झाला ते दलित साहित्य

इतर साहित्याहून दलित साहित्य निराळे ठरते. कारण या साहित्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची आहे. या साहित्यातील आत्मशोध आंबेडकरी विचार आत्मसात केलेल्या लेखकांचा आहे. आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे धर्म, रूढी, परंपरा, वर्णव्यवस्था इत्यादींमुळे माणसाचे शोषण केले जाते याचे भान या दलित लेखकांपाशी आहे. म्हणून या साहित्याचा संदर्भ धर्माधिष्ठित सामाजिक विषमता व अन्याय यांच्याशी आहे. यांतून घेतला गेलेला दलित लेखकांचा आत्मशोध प्रस्थापित समाजव्यवस्थेत, हिंदू धर्माला, संस्कृतीला नकार देतो व विद्रोहाची भूमिका स्वीकारतो.

### दलित जाणिवेचे विशेष

मराठी साहित्याचे विश्व मध्यमवर्गीय जाणिवांपुरते मर्यादित होते. इ.स. १९६० नंतर दलित साहित्य हा वाङ्मयप्रवाह सुरू झाला. मराठी साहित्यातून नवेजीवन व नवीन जीवनविषयक दृष्टिकोन आविष्कृत झाला. डॉ. भालचंद्र फडके ह्यांनी 'वेदना आणि विद्रोह' ह्या दोन बिंदूंनी आखलेल्या परिघात 'दलित साहित्या'ची सीमारेषा आणि सामर्थ्य विशद केले आहे.

दलित साहित्य ही एक सामाजिक, सांस्कृतिक घटना आहे, केवळ वाङ्मयीन चळवळ नसून जीवनदृष्टी, प्रत्येक मानवाला स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि निर्भय सुरक्षितता याची भूमिका असणारी जीवनदृष्टी आहे, असे दलित साहित्याच्या संदर्भात विचारवंतांनी मांडले आहे. विचारवंतांच्या विवेचनाच्या आधारे दलित जाणिवेचे ठळकविशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

❖❖❖❖❖

# ७

# दलित साहित्याचे स्वरूप व विशेष

उद्दिष्ट्ये :

१) दलित साहित्याचे स्वरूप स्पष्ट करणे.

२) दलित साहित्य इतर मराठी साहित्यापेक्षा कोणत्या गुण-विशेषांमुळे वेगळे ठरते त्याची विस्तारपूर्वक चर्चा करणे.

## १) आत्मसन्मानातून आत्मशोध

दलित साहित्य ते चळवळीचे साहित्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलितोद्धाराच्या चळवळीतून दलित साहित्याची चळवळ उभी राहिली आहे. दलित चळवळीचा मुख्य उद्देश माणसाला 'माणूस' म्हणून प्रतिष्ठा प्राप्त करून देणे हा होता. धर्माचे अधिष्ठान लाभलेल्या रूढींनी आणि या गोष्टींना प्रमाण मानून वर्तनधर्म आचारणाऱ्या परंपरागत विचारसरणीने वर्षानुवर्षे शूद्रातिशूद्रांना माणूसपणच नाकारले. सर्व पातळ्यांवरील विषमाधिष्ठित समाजव्यवस्थेने दलित जातीजमातींना आत्मसन्मानाने जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वाटा बंद केल्या. अशा समाजाला आत्मसन्मानाने जगण्याची दिशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या चळवळीने दाखविली. शिक्षणाच्या संस्काराने त्यांच्या विचाराला दिशा मिळाली. आपल्या अस्तित्वासंदर्भात त्यांना प्रश्न पडू लागले. आपला आत्मशोध घ्यावासा वाटू लागला. परंपरेशी आपले नाते काय आहे, हे जाणून घेण्याची निकड भासू लागली. आर्थिक सवलतेपेक्षाही आत्मसन्मानाची जाणीव दलितांना महत्त्वाची वाटली. दारिद्र्य संपले आर्थिक सुबत्ता आली म्हणजे आत्मसन्मान मिळेलच असे नाही. पण आत्मसन्मान कशात आहे हे कळले तर आपोआप दारिद्र्य संपवण्याचे मार्गही खुले होतील, याचे भान आले. म्हणूनच ही आत्मसन्मानाची जाण आणि भान दलित साहित्यातून प्रकर्षाने व्यक्त होते. कारण दलित मुक्तीच्या लढ्यातील मुख्य उद्देश माणसाचा आत्मसन्मान म्हणजेच माणसाला 'माणूस' म्हणून प्रतिष्ठा देणे हाच आहे.

## २) नकार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, अस्पृश्यता हा दलितवर्गाच्या देहावरील कलंक आहे आणि तो वेळ पडली तर दलितवर्गाने आपल्या रक्ताने आपणच पुसून काढला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या विचाराच्या मुळाशी दलितवर्गामध्ये आत्मभान निर्माण झाले पाहिजे आणि आत्मसन्मानाच्या मार्गात ज्या ज्या गोष्टी अडसर

ठरतात त्या सर्वांना नकार दिला पाहिजे हा भाव आहे. म्हणजेच दलित साहित्याने या देशातील धर्माधिष्ठित रूढी, परंपरा आणि यांचा प्रभावाखाली असलेल्या सामाजिक व्यवस्थेला नकार दिला पाहिजे. यातूनच दलित साहित्य मानवनिर्मित परंपरेने लादलेली गुलामगिरी, शोषण इत्यादींना नाकारण्याच्या आड जे जे येते त्या सर्वांना नकार देण्याची भूमिका घेते. समाजात खोलवर रुजलेली विषमाधिष्ठित, अन्यायकारक प्रस्थापित व्यवस्था नाकारणे, हे कोणत्याही विद्रोही चळवळीचे सूत्र असते.

३) विद्रोह

दलित साहित्यात प्रकट होणारे नकार व विद्रोह हे दोन्ही विशेष 'आत्मशोधा'चीच दोन प्रकट रूपे आहेत. भारतीय चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्थेविरुद्ध दलित साहित्याने विद्रोही भूमिका स्वीकारलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथील 'चवदार तळ्या'चा केलेला सत्याग्रह काय किंवा नाशिक येथील 'काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह' काय, हे सत्याग्रह स्वकीयांविरुद्ध केलेले सत्याग्रह होते. एवढे सत्याग्रह करूनही दलितबांधवांना समानतेचा हक्क मिळाला नाहीच. अशा वेळी आक्रमक धोरणे स्वीकारण्याशिवाय पर्याय राहात नाही. डॉ. भालचंद्र फडके यांनी 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह'मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नमूद केलेले विचार येथे पाहाता येतील.

आमचे धोरण चढाईचे आहे. आम्ही विनम्र भावाने व अधोवदनाने जे काही मागावयाचे ते मागत नाही. यामुळे अस्पृश्यता निवारणाला अनुकूल असलेले लोकसुद्धा प्रतिकूल बनतात असा आक्षेप आमच्याविरुद्ध आहे. पण असा आक्षेप घेणाऱ्यांना जनाची नसली तरी निदान मनाची लाज वाटली पाहिजे, असे मला वाटते. अस्पृश्यांइतका नम्र व लाचार अलम दुनियेत कोण आहे? आज शतकानुशतके आम्ही नम्र राहिलो नाही का? पाषाणाची पाझर फोडणाऱ्या दीनावस्थेत व नम्र अवस्थेत आम्ही दिवस काढले ना? आता तरी कृपा करून नम्रतेचे व विनयाचे पाठ आम्हाला देऊ नका. ते आता उच्चवर्णियांना शिकवा. विनंत्या, अर्ज, शिष्टमंडळे यांच्या साहाय्याने गमावलेली स्वातंत्र्ये व दडपलेले हक्क मिळणे शक्य असते, तर नेमस्त पक्षाचे लोक आतापर्यंत हिंदुस्थानचे राजे बनले असते व हिंदूची धर्मसत्ता अस्पृश्यांच्या घरी पाणी भरू लागली असती! उद्दामपणाची आम्हाला सवय आहे, अगर चढेलपणाचे चाळे करण्याची हौस आहे, असे थोडेच आहे? दिवसभर काबाडकष्ट करून पोटासाठी दोन घास कसे मिळवता येतील ही विवंचना आमची रोजची सोबतीण. पण भाकरीपेक्षा माणुसकी श्रेष्ठ म्हणून आम्ही या यातायातीत पडलो. कारण ठोठावल्याशिवाय दरवाजे उघडत नाहीत आणि हिसकावून घेतल्याशिवाय माणुसकीचे साधे हक्कही तुमच्या हातून सुटत नाहीत.

दलितांचे आत्मभान आणि आत्मशोध या दोन्ही वैशिष्ट्यांची साहित्यातून प्रकट होणारी रूपे, प्रस्थापित व्यवस्थेला त्यांनी दिलेला नकार व त्यासाठी घेतलेली विद्रोही भूमिका इत्यादीं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वरील विचारांचे फलित आहे, असे

दिसते. दलित साहित्यातील विद्रोह मानवनिर्मित व्यवस्थेने मला गावकुसाबाहेर का ठेवले? स्वातंत्र्यानंतरही या देशाने मला काय दिले? अशा असंख्य प्रश्नांविरुद्ध व्यक्त होतो. धर्म, संस्कृती आणि ढोंगीवृत्ती यांना नकार आणि याविरुद्ध विद्रोह प्रा. अरुण कांबळे यांच्या कवितेतून पुढीलप्रमाणे व्यक्त होतो.

आज आम्ही गद्दार झालोय
तुमच्या संस्कृतीशी, ढोंगी मानवतेशी
आणि वांझ धर्माशी सुद्धा
समुद्र खवळलाय
आमच्या मुक्तीच्या घोषणांचे हिल्लोळ
देतील धडकी तुमच्या ढोंगी संस्कृतीवर
आणि करतील प्रक्रिया सर्वांवर
समुद्राच्या समानतेची
आज आम्हाला प्रकाशाची शीड उभारलेलं
स्वातंत्र्याचं गाव दिसतंय

किंवा यशवंत मनोहर यांच्या कवितेतील जळजळत्या तीव्र शब्दातून प्रकट होणारा निषेध आणि विद्रोह,

'भारतीय परमात्म्याने' डिक्लेअर केलेल्या गुलामीसारखी
जीवनाची सर्व षंढ तत्त्वज्ञाने पुसावी लागतील
सर्वच बेरजा कशा होऊ शकतात
कटू भागाकारही करावे लागतील
उगीच दीर्घायू ठरलेले सन्मानीत आशय
आजच्या उजेडात चाळावे लागतील
मेंदू लुबाडणाऱ्यांवर मन:पूर्वक थुंकताना
संतापाच्या इतरही जागा मांडाव्या लागतील.

भारतीय रूढी-परंपरांनी, संस्कृतीने दलितवर्गाला कायमचे काळोखात डांबून ठेवले आहे पण आता मात्र आम्ही 'उत्थानाच्या गुंफा' झालो आहोत, असे कवी म्हणतो.

पाखंड्यांनो आता । नका मारू थापा
आम्ही झालो गुंफा । उत्थानाच्या ।।

दलित साहित्यातील नकार आणि विद्रोहाचा आविष्कार काही वेळा आजच्या शिक्षित दलित तरुणांना कराव्या लागणाऱ्या दोन पातळीवरील संघर्षातूनही प्रकट होतो. परंपरानिष्ठ भारतीय व्यवस्थेने जशी उच्च वर्णीयांची मानसिकता कुंठीत केली आहे तशीच दलितवर्गाची मानसिकताही बांधून टाकली आहे. अशा दलितवर्गाला आजही परंपरागत जीवन जगणे मान्य असलेले दिसते. अशा परिस्थितीत दलित तरुण वर्गाला दोन पातळ्यांवर संघर्षाला सामोरे जावे लागते.

एका बाजूने त्यांना स्वजनांशी, आप्तांशी संघर्ष करावा लागतो तर दुसऱ्या बाजूने प्रस्थापित समाजाशी संघर्ष करावा लागतो. म्हणून येथील विद्रोहाचे स्वरूप वेगळे ठरते. उदाहरणार्थ, शंकरराव खरात यांची 'एक संघर्ष' ही गोपाळ खंडू नंदीवाला यांच्या जीवनावर आधारलेल्या कथेत येणारा संघर्ष. असाच संघर्ष शरणकुमार लिंबाळे यांच्या 'अक्करमाशी' या आत्मकथेतही पाहावयास मिळतो. माधव कोंडविलकर यांच्या 'चिंध्या' या कथेतील राघो चांभाराच्या मुलाला दाजीला राघोच्या आपण बुद्धापेक्षा श्रेष्ठ आहोत या अहंतेशी संघर्ष करावा लागतो तर दुसऱ्या बाजूने हिंदू संस्कृतीने चांभारांवर लादलेल्या अन्यायी अस्पृश्यतेविरुद्धही संघर्ष करावा लागतो. दत्ता भगत यांच्या 'एकटी' या एकांकिकेतील पारूला गुंड प्रवृत्तीच्या सवर्ण विद्यार्थ्यांशी जसा संघर्ष करावा लागतो तसाच तो अस्पृश्य वर्तुळातील जातिभेदांविरुद्धही करावा लागतो. ज्या जातियतेविरुद्ध दलितवर्गाचा लढा आहे तो दलितवर्गही जातियतेच्या संस्कारातून, जोखडातून पूर्णतः मुक्त होऊ शकलेला नाही या विदारक सत्याला ही एकांकिका अधोरेखित करते.

दलितवर्गातील जाति-समूहांचा विचार केला तर शहरीकरणाच्या प्रक्रियेतील बहुतांश दलितवर्ग शिक्षित दिसतो. पण आजही खेडोपाडी बहुतांश दलितवर्ग शिक्षणापासून वंचित आहे. आजचा शिकलेला दलितवर्ग कळतनकळत मध्यमवर्गीय जाणिवांचा अंगीकार करताना दिसतो. ब्राह्मणी संस्कारांना स्वीकारताना आपल्याच बांधवांपासून फटकून वागतो. सुशिक्षित, उच्चपदस्थ दलित वर्गाचे आपल्या समाजापासून फटकून राहाणे दलित चळवळीला मारक आहे. गंगाधर पानतावणे यांच्या 'मुखवटे' या एकांकिकेमध्ये दलितांमधील ही पांढरपेशी वृत्ती उघड केली गेली आहे. योगिराज वाघमारे यांच्या 'बेगड' या कथेतील विद्रोहही दलितांनी आत्मसात केलेल्या ब्राह्मणी वृत्तीविरुद्धचा व स्वजनांपासून फटकून राहणाऱ्या पलायनवादी प्रवृत्तीशी आहे.

भुजंग मेश्राम आदिवासी समाजातील लेखक आहेत. त्यांच्या कवितेतून व्यक्त होणारा नकार व विद्रोह आदिवासी संस्कृतीला स्वीकारावे या आग्रहातून येताना दिसतो. त्यांच्या 'उलगुलान' या काव्यसंग्रहाचा याठिकाणी उल्लेख करता येईल.

थोडक्यात दलित साहित्यातून व्यक्त होणारा विद्रोह हा मुख्यतः धर्म, रूढी, परंपरा, संस्कृती इत्यादींना पवित्र व श्रेष्ठ मानून त्याआधारे दलितांना वर्षानुवर्षे गुलाम ठेवू पाहाणाऱ्या व्यवस्थेविषयी येतो. हा विद्रोह या व्यवस्थेवर आघात करतो, त्याचबरोबर ही व्यवस्था बिनतक्रार स्वीकारणाऱ्या व अप्रत्यक्ष ती टिकविण्यासाठी मदत करणाऱ्या स्वकीयांविरुद्ध संघर्षाच्या स्वरूपात प्रकट होतो आणि नवशिक्षित दलित वर्गातील पांढरपेशा मध्यमवर्गीय प्रवृत्तीवर आघात करण्याच्या गरजेतून येतो. कारण नवशिक्षित दलितसमाजामध्ये पांढरपेशी मध्यमवर्गीय वृत्ती रुजत गेली तर दलितांच्या चळवळीचा कणाच मोडून पडेल. येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की दलित साहित्यातील विद्रोह

विशिष्ट व्यक्तीविरुद्ध, विशिष्ट जमातीविरुद्ध नाही तर तो व्यवस्थेविरुद्ध आहे. हा विद्रोह म्हणजे प्रस्थापित व्यवस्थेचा प्रतिशोध नसून एका समान पातळीवरील व्यवस्थेची गरज प्रतिपादण्याच्या हेतूने आलेला आहे.

### ४) वेदना–माणूसपण नाकारण्याची–

भारतीय समाजव्यवस्थेने दलित समाजातील माणसाला 'माणूस' म्हणून वागविले नाही. उलट पशूपेक्षाही हीन वागणूक दिली. जीवनाच्या वेगवेगळ्या पातळ्यांवरील उदाहरणार्थ, सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक इत्यादी शोषणाधिष्ठित चातुर्वर्ण्य व्यवस्था माणसांनीच निर्माण केली आणि या व्यवस्थेने चौथ्यावर्णाला शूद्र ठरविले. त्यांना गावकुसाबाहेरील बहिष्कृत जिणे जगणे भाग पाडले. या दलितवर्गाला प्रस्थापित व्यवस्थेने, ज्ञान, प्रतिष्ठा, अस्मिता इत्यादी सारेच नाकारले. त्यामुळे दलित साहित्याने समाजपरिवर्तनासाठी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध लढा दिला. आणि 'मनुष्यत्व' हेच सर्वश्रेष्ठ मूल्य आहे असे सांगितले. धर्माधिष्ठित परंपरागत व्यवस्थेने आपले माणूसपणच नाकारले याची वेदना आपल्या साहित्यातून व्यक्त केली. उदाहरणादाखल दया पवार यांच्या कवितेत व्यक्त झालेला दु:खाचा, वेदनेचा स्वर पाहता येईल.

दु:खाने गदगदताना हे झाड मीं पाहिलेले
तशी याची मुळे खोलवर बोधिवृक्षासारखी
बोधिवृक्षाला फुले तरी आली
हे झाड साऱ्या ऋतूत कोळपून गेलेले
धमनीधमनीत फुटू पाहणाऱ्या यातना
दु:खाने गदगदताना हे झाड मी पाहिले.

आपल्याला माणूस म्हणून वागणूक मिळत नाही ही दलितांची व्यथा शंकरराव खरातांच्या 'दौंडी' या कथेतही पाहावयास मिळते. 'दौंडी'मधला रामा तराळ म्हणतो, 'हितं माजं कोण न्हाय दादा! कोणाच्या आतड्याला कळवळा इयाचा नाही मला या गावात वागायचं हाय! मला या गावात जगायचं हाय! माझ्या बायको पोरांना... त्यापाय मी हे सगळं करतो. भोगतो. तोंडाला मुसक्या, हातापायात बेड्या आणि पुढं कामाचा डोंगर!' रामा तराळाची ही माणूसपण नाकारण्याची वेदना त्याच्या शब्दातून ठिबकत राहाते.

### ५) बुद्ध-फुले-आंबेडकर यांच्या प्रती आदर

दलित चळवळ आणि दलित साहित्य चळवळ गौतमबुद्ध, महात्मा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती आदरभाव व्यक्त करते. कारण शोषणाधिष्ठित व्यवस्थेविरुद्ध विद्रोह पुकारण्याचे व माणसाला 'माणूस' म्हणून प्रतिष्ठेचे जीवन देण्यासाठी द्यावे लागणारे लढे यांनीच केले आहेत. शोषण व्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या मानसिकतेवर प्रहार करण्याचे कार्यही यांच्याच चळवळीने केले आहे. सम्यक् क्रांतीचा विचार यांनीच समाजासमोर मांडला. गौतमबुद्धाने 'मनुष्य' हेच मध्यवर्ती मूल्य

मानून जातिभेद व अस्पृश्यता या सामाजिक विषमतेचा धिक्कार केला. बुद्धाचे तत्त्वज्ञान, समता, स्वातंत्र्य, न्याय आणि नीतिमत्ता या सामाजिक मूल्यांवर उभे आहे. दलित साहित्यही हीच मूल्ये मानते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुन: प्रवर्तन केलेल्या बौद्धधर्माचा दलित समाजाने स्वीकार केला आहे. म्हणून बुद्ध व बुद्धाचे तत्त्वज्ञान ही दलित साहित्याची पार्श्वभूमी ठरते. आज दलित साहित्यातून व्यक्त होणारी बंडखोरी, विद्रोह, नकार आणि पुराणकथांची अर्थमीमांसा महात्मा जोतिबा फुले यांच्या लेखनकार्यापासून सुरू झालेली दिसते. डॉ. आंबेडकरकालीन समाज व आंबेडकरपूर्व समाजाने महात्मा फुलेंपासून प्रेरणा घेतलेली दिसते. या प्रेरणेतून कवी-कलावंत मंडळी नाटक, तमाशे, पोवाडे, शाहिरी, काव्य-गीते इत्यादी लिहिताना दिसतात. यामध्ये बाबा वलंगकर, शिवराम जा. कांबळे, कवी पंडित कोंडिराम, किसन फागू बंदसोडे इत्यादींची नावे घेता येतील.

भगवान बुद्ध, महात्मा जोतिराव फुले यांच्या कार्यातून दलित जीवनाला व साहित्याला प्रेरणा मिळालेली असली तरी दलित साहित्याच्या प्रेरणेचे प्रत्यक्ष रूप म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने अंध:कारमय दलित जीवनात ‘क्रांतीसूर्य’ प्रकट झाला. म्हणूनच दलित काव्यामध्ये ‘सूर्य’ ही तेजस्वी प्रतिमा विविध रूपांत व्यक्त होते. उदाहरणार्थ, ‘कोटी सूर्य’, ‘हिरवा सूर्य’, ‘विद्रोही सूर्य’, ‘क्रांतिसूर्य’ इत्यादी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवाचे माणूसपण नाकारणाऱ्या हिंदूधर्म, रूढीपरंपरा, चातुर्वर्ण्य समाजरचना, जातिभेद, अस्पृश्यता अशा विषमतावादी, जातिवादी समाजव्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले. त्यांनी दिलेल्या दलित मुक्तीच्या लढ्यातून प्रेरणा घेऊन दलित साहित्य जन्माला आले. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे जनक ठरले. तर दुसऱ्या बाजूने ते पहिले विद्रोही लेखक ठरले आणि दलित साहित्याचे महत्त्वाचे प्रेरणास्रोत बनले. म्हणूनच ‘डॉ. आंबेडकर’ या आपल्या कवितेत नामदेव ढसाळ म्हणतात,

तू दिलेल्या संघर्षशील शिकवणुकीतनं
मी देतो मूलभूत श्रद्धांना
वचनांना आव्हान
नि खोदतो स्वत:ला दु:खदैन्यातून
अंतिम कणापर्यंत
नि मारतो स्वत:च्याही काळजात
पाजळलेल्या कुदळी.

थोडक्यात, व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार, अस्पृश्यतेविरोधी व जातियतेविरोधी विचार व कृतीनिष्ठ हल्ले यातून दलित साहित्याला प्रेरणा देणारे महात्मा जोतिराव फुले आणि जीवनविषयक नवी दृष्टी, आत्मसन्मानाचे व आत्मशोधाचे भान, ‘माणूस’ म्हणून असणारे

माणसाचे मूल्य, विषमाधिष्ठित समाजव्यवस्थेला नकार इत्यादींद्वारे उक्ती व प्रत्यक्ष कृतीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित साहित्याला प्रेरणा दिली. किंबहुना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास हाच मुळी दलित साहित्याचा प्रेरणास्त्रोत आहे. म्हणूनच दलित साहित्यात भगवान गौतमबुद्ध, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आदरभाव व्यक्त होतो.

### ६) समूहमनाचे आविष्करण

कोणतीही कलाकृती ही एका व्यक्तीची निर्मिती असते. साहजिकच कलाकृतीतून व्यक्त होणारा अनुभव हा व्यक्तिनिष्ठ अनुभव असतो. दलित साहित्यात मात्र निर्मितीच्या पातळीवर एका व्यक्तीची असणारी अनुभूती एकाचवेळी व्यक्तिनिष्ठही असते व समाजनिष्ठही असते. कारण सर्वच दलितसमाज विषमाधिष्ठित, अन्यायी समाजव्यवस्थेने पीडला गेला आहे. साहजिकच धर्म, रूढी, परंपरा इत्यादींनी माथी मारलेले बहिष्कृत जगणे हा सर्व समाजाच्या अनुभवाचा भाग आहे. म्हणून दलित साहित्यिक जेव्हा आपले अनुभव व्यक्त करतो तेव्हा ते अनुभव त्या साहित्यिकाप्रमाणेच त्याच्या समूहाचेही अनुभव असतात. त्यामुळे कोणत्याही दलित साहित्यकृतीमध्ये व्यक्त होणारी अनुभूती ही समूहाची अनुभूती असते, उदाहरणार्थ, दलित आत्मचरित्रांचा आत्मकथनांचा विचार केला तरी यांतील 'मी'चा अनुभव केवळ 'मी'चाच राहात नाही तर तो 'आम्ही'चा बनतो.

### ७) बांधिलकी

'बांधिलकी' या शब्दाचा शब्दश: अर्थ कोणत्या तरी एका भूमिकेशी बांधील राहाणे असा घेतला जातो. पण दलित साहित्याच्या संदर्भात बांधिलकीचा अर्थ दोन पातळ्यांवर घ्यावा लागतो. बांधिलकीचा एक अर्थ म्हणजे स्वअनुभूती प्रामाणिकपणे धाडसाने व्यक्त करणे. या बांधिलकीचा संबंध लेखकाच्या आविष्कार स्वातंत्र्याशी आहे. स्वअनुभूतीच्या आविष्कार स्वातंत्र्याची बांधिलकी दलित आत्मकथनांमध्ये पाहावयास मिळते.

दलित साहित्यातील बांधिलकी त्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनमूल्यांच्या संदर्भातही आहे. धर्माधिष्ठित सामाजिक विषमता, या विषमतेतून वाट्याला आलेले पशूपेक्षाही हीनदीन भयावह जीवन, डॉ. बाबासाहेबांच्या रूपाने दिसलेला प्रकाशाचा मार्ग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून घडतो. दलित साहित्यिकाचा जीवनदृष्टिकोन, इत्यादी संदर्भात 'बांधिलकी' या शब्दाचा दुसरा अर्थ घ्यावा लागतो. म्हणूनच डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, 'आज दलित साहित्य काही नाकारत आहे कारण त्याने काही अमोल असे स्वीकारले आहे. माणूस हा सर्वश्रेष्ठ आहे, त्याची प्रतिष्ठा हे सर्वोच्च मूल्य आहे हे दलित साहित्याने स्वीकारले आहे. म्हणून माणूस तेवढा महान असे म्हणण्याऐवजी जी समाजव्यवस्था माणसांमाणसांतील उच्च-नीचभाव, वांशिक अभिमान धार्मिक श्रेष्ठत्व मान्य करीत राहील तिच्या विरुद्ध उभे राहणे ही दलित साहित्याची प्रकृती आहे.'

दलित साहित्याने मानलेली वरील प्रकारची बांधिलकी प्रा. अविनाश डोळस यांच्या ‘बळी’ या कथेत किंवा वामन होवाळांच्या ‘मजल्याचे घर’ या कथेत पाहावयास मिळते.

दलित साहित्यातून प्रकट होणारा आत्मशोध नकार व विद्रोहाचे रूप घेऊन प्रकट होतो. दलित साहित्यात प्रकट होणारा नकार कुठल्या तरी मूल्यांच्या आग्रहातून जन्माला आलेला आहे. या आग्रहाचे नाते आहे आशावादाशी. या आशावादातून दलित साहित्य मानवी जीवनाचे व्यापक विश्वमूल्य साकारते. नामदेव ढसाळांच्या एका कवितेतील पुढील पंक्ती पाहाता येतील.

माणसाने पहिल्या प्रथम स्वत:ला
पूर्ण अंशाने उद्ध्वस्त करून घ्यावे…
नंतर उरल्या सुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये लुटू नये
आभाळाला आजोबा आणि जमिनीला आजी मानून
त्यांच्या कुशीत गुण्यागोविंदाने आनंदाने राहावे…
एक तीळ सर्वांनी करंडून खावा…
माणसावरच सुक्त रचावे
माणसाचेच गाणे गावे माणसाने.

दलित साहित्य माणसामाणसात समता असणे गरजेचे मानते. याकरिता जन्म, वंश इत्यादींमुळे निर्माण होणाऱ्या भेदभावांना नकार देते. माणसाचे माणसाशी न्यायीपणाचे वर्तन असावे अशी अपेक्षा व्यक्त करते. धर्म, वर्ण, जात इत्यादी कारणास्तव कुणी कुणाशी अन्यायकारक वर्तन करता कामा नये असे मानते. म्हणजेच गुलामीला नकार देते आणि स्वातंत्र्य या मूल्याचा पुरस्कार करते. दलित साहित्याचा उद्देश मानवी जीवनात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय यावा हा आहे. याकरिता पारंपरिक व्यवस्था उद्ध्वस्त केली पाहिजे. तरच व्यक्तीव्यक्तीमध्ये सौहार्द जपले जाईल. म्हणूनच दलित साहित्यात दलित समाजाच्या दु:खभोगाचे आणि वेदनेचे चित्रण येते आणि याचवेळी सर्व माणसांमध्ये मैत्रपूर्ण नात्यांची अपेक्षा व्यक्त करते.

### ८) विज्ञाननिष्ठा

दलित साहित्य चळवळ ‘धर्म’ या संकल्पनेकडे बुद्धिनिष्ठ दृष्टीने पाहाते. ईश्वरकल्पनेला नकार देते. व्यक्तिनिरपेक्ष वस्तुनिष्ठ वैज्ञानिक दृष्टीचा अवलंब करते. आंबेडकरवाद हा मानवी मूल्यांवर आधारलेला मानवतावाद आहे. तो भक्कम अशा बुद्धीवादावर उभा आहे. आणि बुद्ध तत्त्वज्ञानाची त्याची मूळ बैठक असल्याने विज्ञान हे त्याचे एक अंग आहे. भगवान बुद्धाप्रमाणे आंबेडकरवादानेही ईश्वर, आत्मा इत्यादी संकल्पनांना नाकारले. त्यांनी देवधर्माला, धर्मशास्त्राला आणि त्याच्या कर्मविपाकी सिद्धान्ताला नाकारले आहे. प्रा. रावसाहेब कसबेंच्या शब्दात सांगायचे तर,

प्रज्ञा, शील, करुणा व मैत्रीची सांगड म्हणजे आंबेडकरवाद
अनित्य, अनात्म, अनीश्वरवाद आणि
विज्ञानवाद म्हणजे आंबेडकरवाद
बुद्धिप्रामाण्य, विवेक, गती, तर्क आणि
बुद्धिवादाचा स्वीकार म्हणजे आंबेडकरवाद.

यामुळे आंबेडकरी प्रेरणेतून स्फुरलेल्या दलित साहित्याचा विज्ञाननिष्ठा हा एक गुणधर्म आहे.

**९) चळवळीचे साहित्य**

दलित साहित्याच्या प्रेरणास्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अस्पृश्यमुक्ततेची चळवळ आहे. म्हणून दलित साहित्य हे दलित चळवळीचे साहित्य मानले जाते. या संदर्भात प्रा. दत्ता भगत यांचे विचार पाहाता येतील.

‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या आत्मसन्मानाची चळवळ सुरू केली. समता, न्याय, बंधुत्वाचा पुरस्कार केला. त्याआड येणाऱ्या रूढी धर्मग्रंथांना नकार दिला. हे सुखासुखी घडले नाही. त्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागला. ह्या संघर्षाचे चित्रण दलित साहित्यात अवतरले. म्हणून या साहित्यात वर्णव्यवस्थेविरुद्ध संघर्ष येतो. रूढींना नकार येतो आणि समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्वाचा पुरस्कार येतो. दलितांच्या चळवळीची ही मागणी पूर्ण झालेली नाही. सांसदीय पद्धतीच्या लोकशाहीची एक मर्यादा असते. ह्या पद्धतीत परिवर्तन मंद स्वरूपात होते, पण परिवर्तन होणे अटळही असते. म्हणूनच सांसदीय लोकशाही मजबूत होऊ शकेल अशीच ही मागणी असल्यामुळे दलितांची चळवळ गतिशील राहणे आवश्यक असते. दलित साहित्य गतिशील चळवळीचे प्रतिबिंब असणारे साहित्य आहे. म्हणूनच काही साहित्यिकांना दलित साहित्य हे परिवर्तनाचे साधन वाटते. चळवळ आणि चळवळीचे प्रतिबिं असणारे दलित साहित्य ह्यांचा सांधा ह्या कारणामुळे अतूट आहे.’

वरील विवेचनावरून दलित साहित्य ही एक चळवळ आहे, हे स्पष्ट होते.

मराठी साहित्याच्या इतिहासात दलित साहित्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. मराठी दलित साहित्याने महाराष्ट्राच्या बाहेरही आपली परंपरा निर्माण केली आहे. दलित साहित्याच्या कामगिरीचा उल्लेख प्रा. भालचंद्र नेमाडे पुढीलप्रमाणे करतात, ‘गांधी युगापासून महाराष्ट्रातून विचारांची दौलत बाहेरच्या राज्यात जाण्याची परंपरा खंडित झाली होती. ती दलित साहित्याने पुन्हा सुरू केली असे आपल्याला म्हणता येईल. मराठी साहित्याच्या इतिहासातली दलित साहित्य ही महत्त्वाची घटना आहे. आपल्या मराठी दलितांना आदर्श मानून गुजराथी, कन्नड आणि उत्तरेतील दलित आत्मविश्वासाने आपापल्या भाषेत लेखन

करू लागले आहेत. ही महाराष्ट्राने सुरू केलेली आणि इथून देशभर पसरलेली दलित चळवळ खरोखरच उल्लेखनीय आहे. महाराष्ट्रातल्या दुसऱ्या कोणत्याही जातीची विसाव्या शतकात एवढी देशव्यापी गौरवशाली कामगिरी नाही.'

प्रा. भालचंद्र नेमाडे यांनी नेमक्या शब्दात दलित चळवळ व साहित्य यांचे केलेले विवेचन साहित्याच्या इतिहासातील दलित साहित्याचे योगदान स्पष्ट करते.

❖❖❖❖❖

# ८

# दलित साहित्य प्रवाह आणि इतर साहित्यप्रवाह यांचा परस्परांशी असलेला अनुबंध

उद्दिष्टे :

१) १९६० नंतर मराठी साहित्यप्रवाहात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य व आदिवासी साहित्य हे साहित्यप्रवाह प्रामुख्याने उदयास आले. या साहित्यप्रवाहांच्या उदयामागील कारणे समजावून घेणे.

२) साहित्यबाह्य चळवळी व साहित्यप्रवाह यांतील अनुबंध तपासणे.

३) वरील साहित्यप्रवाहांचे स्वरूप थोडक्यात अभ्यासणे.

४) दलित साहित्यप्रवाह आणि इतर साहित्यप्रवाह यांची परस्परांशी असलेला अनुबंध तपासणे.

५) दलित साहित्य प्रवाहाचे विशेष नोंदविणे.

इ.स. १९६० नंतर मराठी साहित्यामध्ये विविध वाङ्मयीन प्रवाह उदयास आले. या वाङ्मयीन प्रवाहांच्या मुळाशी एकोणिसाव्या शतकातील सामाजिक, सांस्कृतिक चळवळींचा अनुबंध आहे. चळवळ म्हणजे काय? याचे थोडक्यात विवेचन करायचे तर असे म्हणता येईल की, चळवळ म्हणजे विशिष्ट तत्त्वज्ञान, विचार अथवा भूमिका कृतीमध्ये उतरविण्यासाठी केलेली कृती होय. कोणतीही चळवळ मूल्याधिष्ठित असते आणि चळवळीच्या प्रचाराचे एक साधन म्हणून कलेचा किंवा साहित्याचा उपयोग केला जातो. मराठीमध्ये चळवळ आणि साहित्य यांचे अनुबंध मान्य करणारे या काळातील प्रमुख चार साहित्यप्रकार सांगता येतात. यांमध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य आणि आदिवासी साहित्य यांच्याबरोबरीने मागच्या कालखंडाशी अनुबंध राखून राहिलेला मार्क्सवादी साहित्यप्रवाहाचाही उल्लेख करावा लागेल. तसेच याच काळाच्या आगेमागे मराठी लघुअनियतकालिकांची चळवळही कार्यरत होती. ही चळवळ इंग्रजीमध्ये झालेल्या लिट्ल मॅगझीनच्या चळवळीशी साधर्म्य असणारी चळवळ होती. या चळवळीने साहित्यकृतीच्या रूपापुरते (फॉर्मपुरते) बंड केले होते. या चळवळीतील लेखकांनी मार्क्सवाद, अस्तित्ववाद, वास्तववाद, अतिवास्तववाद या संकल्पना आपल्या लेखनाने मराठी साहित्यात रुजविल्या. तरीही या चळवळीसमोरील उद्दिष्टांमध्ये तिच्या समोर मार्क्सवाद नव्हता. किंवा समाजसुधारणेचा कोणताही हेतू नव्हता. म्हणूनच नामदेव ढसाळांसारख्या कवी सोडला तर पुढे उभ्या राहिलेल्या दलित साहित्याच्या चळवळीशी तिचा संबंध आला नाही.

इ.स. १९६० नंतरच्या काळात वरील साहित्यप्रवाह जन्माला आले. या साहित्यप्रवाहांच्या मुळाशी असलेल्या प्रेरणा या गेल्या शंभर वर्षातील विविध सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय घडामोडींच्या आहेत. उदाहरणार्थ, सत्यशोधक समाज, ब्राह्मणेतर पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, शेतकरी संघटना, हा जो बहुजन समाजाच्या राजकीय अस्मितेचा आलेख दिसतो, त्यातून ग्रामीण माणसांची अस्मिता जागृत झालेली दिसते. तर महात्मा फुले, शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, सयाजीराव महाराज गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींच्या प्रयत्नातून व कार्यातून दलितोद्धाराची चळवळ उभी राहिली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून तिला निश्चित अशी दिशाही प्राप्त झाली. तसेच महात्मा जोतीराव फुले, विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधी, महर्षी धोंडो केशव कर्वे इत्यादींच्या कार्यातून स्त्रियांची अस्मिता जागृत झाली. तर आदिवासी चळवळीची मूळ प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर असून ही चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतीबा फुले व कार्ल मार्क्स यांना प्रेरणास्थानी मानते.

इ.स. १८६० ते १९६० या कालखंडात घडलेल्या विविध सामाजिक-राजकीय घटना आणि साहित्यनिर्मिती यांच्यामध्ये संबंध दाखविता येतो. उदाहरणार्थ, जोतीबा फुले यांचे सामाजिक कार्य, सत्यशोधक समाजाची स्थापना आणि वाङ्मय यांच्यात घट्ट नाते दिसते. महात्मा फुले यांचे वाङ्मय म्हणजे शोषितवर्गाची वेदना प्रकट करणारे पहिले लिखित रूप आहे. या वाङ्मयातून महात्मा फुले शोषितांची व्यथा प्रकट करतात आणि शोषणाधिष्ठित व्यवस्थेचा शोधही घेतात. उदाहरणार्थ, 'तृतीय रत्न', 'शिवाजी राजांचा पोवाडा', 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा आसूड' इत्यादींचा येथे उल्लेख करता येईल.

पुढे महात्मा फुले यांच्या लेखनापासून प्रेरणा घेऊन ग्रामीण समाजाच्या, अस्पृश्यवर्गाच्या स्थितीगतीचे लेखन मराठीमध्ये लिहिले गेले. महात्मा फुले यांना समकालीन व त्यांचे अनुयायी असणाऱ्या कृष्णराव भालेराव यांच्या लेखनाचाही याठिकाणी उल्लेख करता येईल. कृष्णराव भालेराव यांनी सुरू केलेले 'दीनबंधू' हे वृत्तपत्र, त्यांची 'बळीबा पाटील' ही कादंबरी, 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' हा त्यांचा निबंध इत्यादी त्यांच्या लेखनकार्याची नोंद करणे महत्त्वाचे ठरेल.

महात्मा जोतिबा फुले यांच्या परंपरेतील कर्ते सुधारक म्हणून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे नाव घ्यावे लागते. महर्षी वि. रा. शिंदे यांनी अस्पृश्यवर्ग व शेतकरीवर्ग यांच्या दु:स्थितीसंबंधी सर्वांत प्रथम शास्त्रीय दृष्टिकोन स्वीकारून लेखन केलेले आहे. थोडक्यात, याकाळात अस्पृश्यता, दलितत्त्व, ग्रामीण व शेतकरी वर्ग यांचे प्रश्न यासंदर्भात अनेकांनी लेखन केलेले दिसते. महात्मा फुले, महर्षी शिंदे यांचा वर उल्लेख केला आहेच, यांच्याबरोबरीनेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जेधे जवळकर, यशवंतराव चव्हाण, शरद जोशी इत्यादींचाही उल्लेख करता येईल. याचपद्धतीने स्त्री प्रश्नांसंदर्भात झालेल्या लेखनाचा

आढावा घेतला तर गोपाळ गणेश आगरकर, महात्मा जोतिबा फुले, ताराबाई शिंदे इत्यादींच्या लेखनाचा उल्लेख करावा लागेल.

याचाच अर्थ गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रातील सामाजिक व वाङ्मयीन क्षेत्रात ज्या चळवळी निर्माण झाल्या त्या चळवळींच्या अनुषंगाने जे लेखन झाले त्या लेखनातून सामान्य माणसाच्या शोषणाचा आणि शोषणाविरुद्धचा आवाज प्रकट झाला आहे असे म्हणता येते. म्हणूनच इ.स. १९६० नंतरचे ग्रामीण, दलित, आदिवासी व स्त्रीवादी साहित्यप्रवाह मानवी जीवनाशी, माणसाच्या सुखदु:खांशी, त्यांच्या संघर्षाशी निगडित आहेत. तसेच ते वास्तवातील विषमाधिष्ठित समाजव्यवस्थेत परिवर्तनाची मागणी करणारे आहेत. उदाहरणार्थ, दलित साहित्यप्रवाह उतरंडीवर आधारलेली शोषित समाजव्यवस्था नष्ट झाली पाहिजे असा विचार ठाशीवतेने प्रकट करते. तर ग्रामीण साहित्यप्रवाह सर्व प्रकारच्या शोषणातून ग्रामीण समाज मुक्त झाला पाहिजे ही आकांक्षा बाळगतो. स्त्रीवादी साहित्यप्रवाह युगानुयुगाच्या पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या जोखडातून स्त्रीची मुक्ती झाली पाहिजे म्हणून सांगतो. तसेच आदिवासी साहित्यप्रवाह संस्कृतीच्या नावाखाली आणि संस्कृतीच्या अहंकारातून निसर्गाच्या सान्निध्यात राहाणाऱ्यांना समजून न घेता त्यांचे शोषण करणारे जे कोणी आहेत, त्यांच्या जोखडातून मुक्तीची अपेक्षा व्यक्त करतो. म्हणजेच दलित, ग्रामीण, स्त्रीवादी व आदिवासी या साहित्यप्रवाहांच्या मुळाशी शोषणाधिष्ठित समाजरचना नष्ट झाली पाहिजे, हे समान सूत्र आहे. म्हणूनच सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्धचा आवाज व्यक्त करणारे साहित्य या प्रवाहांतून निर्माण झालेले आहे असे म्हणता येईल. उदाहरणार्थ, दलितांना आविष्कार स्वातंत्र्य देण्याच्या गरजेतून दलित साहित्याचा जन्म झाला. तो दलितांचा जसा आत्मशोध आहे तसा जीवनशोधही आहे. त्यात भोगाव्या लागणाऱ्या जीवनाचे जसे दर्शन आहे तसेच ते बदलण्याच्या प्रेरणाही आहेत. त्याची मूल्यसरणी आणि प्रत्यक्ष जीवनाशी जोडलेली नाळ यामुळे दलित साहित्याने आपले स्वतंत्र अस्तित्व सिद्ध केले. तर स्त्रीदास्यमुक्तीच्या लढ्याचा साहित्यिक आविष्कार म्हणून स्त्रीवादी साहित्याकडे पाहाता येते. लिंगविशिष्ट अनुभव आणि लिंगभेदामुळे जीवनानुभवांना लाभणारे आपले असे रूपरंग ही स्त्रीवादी साहित्याच्या स्वतंत्र अस्तित्वाची आधारशीला ठरली. तसेच आजवर मराठी साहित्यात अस्पर्शित राहिलेल्या अनुभवांचे दर्शन घडविण्याच्या प्रेरणेतून ग्रामीण साहित्याचा जन्म झाला. साहित्यातून ग्रामीण वास्तवाचे आविष्करण व्हावे, लोकांच्या बोलीत साहित्याने बोलावे, परिवर्तनाला पाठबळ मिळावे आणि ग्रामीण भागात नव्याने अंकुरणाऱ्या प्रतिमेचे संगोपन–संवर्धन व्हावे या उद्दिष्टांनी ग्रामीण साहित्याची चळवळ क्रियाशील झालेली दिसते.

दलित साहित्य भगवान बुद्ध, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रेरणास्थानी मानते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व काळातील गोपाळबाबा वलंगकर, शिवबा जानबा कांबळे, किसन फागुजी बंदसोडे, गणेश आकाजी गवई इत्यादींच्या कार्य व

लेखनातून दलित साहित्याची पूर्वपीठिका तयार झालेली दिसते. मात्र दलित साहित्याच्या मुळाशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या दलित मुक्ती आंदोलनाची सांस्कृतिक आघाडी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या दलित चळवळीपासून प्रेरणा घेऊन पदे, पोवाडे, वग, लेख, कथा इत्यादी प्रकारांतील साहित्य निर्माण झाले. इ.स. १९६० नंतर मात्र दलित साहित्यात एक नवे पर्व सुरू झाले. दलित लेखकांनी प्रस्थापित समाजरचनेला नकार दर्शविला आणि क्रांतिकारक विद्रोहाचा मार्ग स्वीकारला. दलित लेखकांनी साहित्यनिर्मितीकडे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून पाहिले. पिढ्यानुपिढ्यांचे अत्याचार, दारिद्र्य, भूक, अन्याय इत्यादींचा भोगवटा वाट्याला आलेल्या तरुणांना साहित्यातील केवळ कलावादाची, सौंदर्यवादाची उपपत्ती मानवण्यासारखी नव्हती. म्हणून त्यांचे साहित्य कलावादी न ठरता प्रबोधनवादी किंवा साधनवादी व सर्वंकष परिवर्तनाची आस धरणारे ठरले. यामुळेच मनुष्याचे मनुष्यत्व हिरावून घेणाऱ्या प्रस्थापित धर्माधिष्ठित समाजव्यवस्थेशी संघर्ष हे दलित साहित्याचे ध्येय आहे. मनुष्याच्या मनुष्यत्वाला नकार देणाऱ्या रूढी, परंपरा, संस्कृती याविरुद्धचा विद्रोह हे या साहित्याचे प्रेरक तत्त्व आहे आणि डॉ. आंबेडकर आणि त्यांचे कार्य व विचार हे या साहित्याचे प्रेरणास्थान आहे. एकूण दलित साहित्याचे साहित्यबाह्य अशा दलित चळवळीशी घट्ट नाते आहे. इतक्या दृढपणे जीवनाशी संलग्न अशी दुसरी साहित्यचळवळ या काळात दाखविता येत नाही.

दलित साहित्य प्रवाहाप्रमाणेच ग्रामीण साहित्य प्रवाहाच्या मुळाशीही शोषणव्यवस्था आहे. पण या शोषणाची जात भिन्न स्तरावरील व भिन्न स्वरूपाची आहे. ग्रामीण साहित्याला सुरुवात महात्मा फुले–कृष्णराव भालेराव यांच्या साहित्यलेखनापासून झालेली असली तरी इ.स. १९७०-७२च्या आसपास या साहित्याची चळवळ व प्रवाह जोमाने वाढलेला दिसतो. या साहित्यप्रवाहाच्या मुळाशी महात्मा जोतिबा फुले यांचा विचार असल्याने त्यांनाच ग्रामीण साहित्याचे प्रेरणास्रोत म्हणावयास हरकत नाही.

दलित साहित्यप्रवाहाला एक तात्त्विक बैठक आहे. नकार, निषेध, प्रतिकार, क्रांती हा या साहित्याचा पाया आहे. सामाजिक व सांस्कृतिक गुलामगिरीचा त्याग करून मानवतेच्या अधिष्ठानावर उभ्या असलेल्या समाजव्यवस्थेचा ध्यास व त्यासाठी करावा लागणारा संघर्ष हे या साहित्याचे उद्दिष्ट आहे. तसेच ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातील प्रेरणेने दलित चळवळ व साहित्यप्रवाह झपाट्याने फोफावला आहे.

दलित साहित्याच्या चळवळीप्रमाणे ग्रामीण साहित्य चळवळीला वैचारिक अधिष्ठान नाही, दलित साहित्याला असलेल्या तात्त्विक बैठकीप्रमाणे ग्रामीण साहित्याला तात्त्विक बैठक नाही असे काही विचारवंतांचे मत आहे. पण ग्रामीण साहित्य चळवळीला व साहित्य प्रवाहालाही एक निश्चित अशी वैचारिक बैठक आहे. कृषिनिष्ठ संस्कृतीशी निगडित असा

कोणताही विषय या साहित्याच्या कक्षेत येऊ शकतो. याचबरोबरीने वर्गव्यवस्था, ग्रामरचना, ग्रामीण संस्कृतीचे वेगळेपण वेगवेगळ्या ग्रामपातळ्यांवरील विषमता भूक, दारिद्र्य इत्यादी ग्रामीण जीवनाशी निगडित असणाऱ्या गोष्टी ग्रामीण साहित्याचे विषय असतात. धर्माधिष्ठित रूढी-परंपरांना नकार व त्याविरुद्ध विद्रोह हे दलित साहित्याचे अधिष्ठान आहे तर निसर्ग, अज्ञान, विषमता, शोषण हे ग्रामीण साहित्याचे अधिष्ठान आहे. यांतूनच ग्रामीण साहित्यिक एकत्र आले. ग्रामीण जनतेला व साहित्यिकांना स्वत्वाची जाणीव करून देण्यात श्री. शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली कार्य करणाऱ्या शेतकरी संघटनेचाही वाटा आहे. या शेतकरी संघटनेच्या लढ्याने शेतकऱ्यांच्या खऱ्याखुऱ्या प्रश्नांकडे लक्ष वेधले गेले. शेतकऱ्यांना व शेतमजुरांना हीन-दीन जीवन जगायला भाग पाडण्यात निसर्गाप्रमाणेच इतर शोषित घटकही कारणीभूत आहेत याची जाणीव शेतकरी संघटनेच्या लढ्याने करून दिली. महाराष्ट्रातील शेतकरी हा सर्व स्तरीय शोषणाचा बळी ठरला आहे, हे विदारक सत्य शेतकरी संघटनेने समोर आणले. पण याचवेळी साहित्य हे लढ्याचे माध्यम होऊ शकते, याकडे मात्र या संघटनेने दुर्लक्ष केले. ही या चळवळीची मर्यादा सांगता येईल.

महात्मा फुले यांच्यापासून शेतकऱ्यांच्या व अस्पृश्यांच्या स्थितीगतीचे विवेचन करणारे विपुल लेखन मराठीमध्ये झाले आहे. दलित साहित्य चळवळीने महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांचे विचार चटकन समजावून घेतले. मात्र ग्रामीण साहित्य चळवळीला आपली वैचारिक परंपरा एवढ्या लवकर समजावून घेता आली नाही. ग्रामीण परिसरातील दलितांचे जीवन दलित लेखकांनी त्यांच्या वेदनांसह जळजळीत शब्दांत व्यक्त केले आहे. मात्र ग्राम्य जीवनाचे ग्रामीण लेखकांनी केलेले चित्रण मात्र तेवढेसे प्रखर नाही. याचे कारण आंबेडकरी चळवळीच्या मुळाशी ब्राह्मणेतर चळवळ असली तरी पुढे या दोन्ही चळवळीचे स्वरूप भिन्न राहिले आहे. दलित साहित्य चळवळ आणि ग्रामीण साहित्य चळवळ स्वत:चे वेगळेपण जपण्यासाठी समांतरतेने प्रवास करतात. पण एकमेकांशी हातमिळवणी करीत नाहीत, याचा हा परिणाम म्हणता येईल.

आदिवासी साहित्यप्रवाह मात्र दलित साहित्यप्रवाहाच्या अनुकरणातून जन्माला आलेला आहे. आदिवासी साहित्यप्रवाह, इ.स. १९६० नंतर उदयाला आला आणि इ.स. १९७५ नंतर तो अधिकाधिक संपन्न होत गेला आहे. प्रारंभीच्या काळात आदिवासीएतर साहित्यिकांनी आदिवासी साहित्याची निर्मिती केलेली दिसते. पुढे जन्माने आदिवासी असलेल्या साहित्यिकांचा वर्ग तयार झाला.

दलित साहित्य व आदिवासी साहित्य हे दोन्ही साहित्यप्रवाह नियतकालिके व साप्ताहिके यांच्याशी अन्योन्यसंबंध असणारे साहित्यप्रकार आहेत. दलित साहित्य आणि 'अस्मितादर्श' यांचे दलित साहित्यप्रवाहात विशेष नाते आहे. तसेच 'ढोल', 'हाकारा',

'नाहाकंद', 'तारपा' इत्यादी आदिवासी जीवनाला प्राधान्य देणाऱ्या नियतकालिकांमधून आदिवासी साहित्य प्रकाशित झाले आहे.

दलित साहित्यप्रमाणे आदिवासी साहित्यही महात्मा फुले, डॉ. आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांना प्रेरणास्थानी मानते. आणि धर्म, वर्ण, वर्ग, जात, पंथ यांवर आधारित विषमतेला नकार देते. दलित साहित्याप्रमाणे आदिवासी साहित्यातही विद्रोहाचे चित्रण येते. पण दोन्ही साहित्यप्रवाहातील विद्रोहाच्या स्वरूपात भिन्नता आहे. दलित साहित्यातील विद्रोह प्रस्थापित समाजरचनेने वाट्याला आलेल्या अमानुषतेविरुद्ध आहे. तर आदिवासी साहित्यातील विद्रोह त्यांच्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत यासंदर्भात व्यक्त होतो. तर दुसऱ्या बाजूने नक्षलवादी चळवळींशी त्यांना कराव्या लागणाऱ्या नित्य संघर्षाच्या संदर्भातही तो व्यक्त होतो. उदाहरणार्थ, गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवादी चळवळी मोठ्या प्रमाणात कार्यरत दिसतात. या भागातील आदिवासी समाज नक्षलवादी व पोलीसयंत्रणा अशा दोहोंच्या कैचीत सापडला आहे. याचेच चित्रण कुसुम अत्राम यांच्या कवितेत पाहावयास मिळते. 'स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षात / व्यथा माझी अशी आहे / छातीवरती बंदूक आणि / पाठीवरती दंडूक आहे' दलित साहित्याच्या प्रेरणास्थानी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उक्तीकृती आहेत. तसेच आदिवासी समाजाला व साहित्यिकांना आपल्यावरील अन्यायांची, आपल्या वंचनेची जाणीव महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांच्या विचारांच्या प्रेरणेतूनच झालेली आहे. दलित साहित्यप्रवाह व आदिवासी साहित्यप्रवाह यांच्या मुळाशी असणारी प्रेरणा समान असली तरी दलितवर्ग व आदिवासीवर्ग यांच्या जीवनसंघर्षामध्ये मूलभूत फरक आहे. दलित समाजाचा संघर्ष, लढा हा प्रामुख्याने सामाजिक सन्मान्यतेसाठी आहे. तर आदिवासी वर्गाचा लढा हा केवळ सामाजिक सन्मान्यतेसाठी, प्रतिष्ठेसाठी नाही. तर त्यांचा संघर्ष मूलभूत स्वामित्वासाठी आहे. म्हणूनच आदिवासी साहित्य विश्वातील मानवाच्या सार्वभौमत्वाचा उद्‌गार करणारे आहे. त्यांच्या मूलभूत अस्तित्वाचे दर्शन घडविणारे साहित्य आहे.

एकोणिसाव्या शतकात पाश्चात्त्य देशांत स्त्रीमुक्तीची चळवळ सुरू झाली. सीमाँ द बोव्हा यांचे 'द सेकंड सेक्स'; बेटी फ्रीडन यांचे 'सेकंड स्टेज'; जर्मेन ग्रीअर यांचे 'फिमेल युनुक' व 'द होल वुमन'; ग्लोरिया स्टायमन आणि अँड्रिया जॉनस्टन यांचे 'गर्ल्स स्पीक आऊट' ही या चळवळीच्या अनुषंगाने लिहिलेली पुस्तके म्हणजे स्त्रियांच्या आत्मशोधाची प्रक्रिया आहे. आणि स्त्रीमुक्ती चळवळीतील तात्त्विक संघर्षाची रूपे आहेत.

भारतीय परिप्रेक्ष्यात स्त्रीवादाची मांडणी करताना भारतीय समाजसुधारकांनी केलेले प्रयत्न उदाहरणार्थ, राजा राममोहन रॉय, महात्मा जोतीबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महर्षी वि. रा. शिंदे, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, सरोजिनी नायडू, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे इत्यादींचे कार्य आणि

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांसाठी केल्या गेलेल्या विविध पुरोगामी कायद्यांचा विचार करावा लागतो. उदाहरणार्थ, सतीबंदीचा कायदा (१८२९) ते शिक्षणविषयक मूलभूत हक्क कायदा (२०१०) यांसारख्या पुरोगामी कायद्यांनी स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग खुला केला. इ.स. १९७१ हे वर्ष 'युनो'ने 'आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्ष' म्हणून जाहीर केले होते. तर इ.स. २००१ हे वर्ष 'महिला सक्षमीकरणाचे' म्हणून घोषित केले होते. यांतून स्त्रीप्रश्नांना व स्त्रियांच्या चळवळींना प्रेरणा मिळाली.

भारतीय पातळीवर स्त्रीला समान न्याय दर्जा देण्याचे प्रयत्न केले गेले. त्यांमध्ये गांधीवादी, आंबेडकरवादी व साम्यवादी चळवळींनी केलेले प्रयत्न विशेष मोलाचे आहेत. महात्मा जोतिबा फुले यांनी स्त्री उन्नतीकरिता भरीव शैक्षणिक, सामाजिक कार्य केले. पण त्याकाळी स्त्रियांसाठी वेगळे मासिक असावे ही महात्मा फुले यांनी केलेली मागणी विशेष उल्लेखनीय आहे. प्रत्यक्षात अशी मासिके इ.स. १८५५ साली निघाली. त्यांची नावे 'सुमित्रा', 'स्त्रीभूषण' अशी होती. पुढे स्त्रियांनी संपादित केलेली मासिके आली. त्यांची नावे 'आर्यभगिनी', 'गृहिणी' यांसारखी होती. या मासिकांतून जे लेखन प्रसिद्ध केले जात होते त्या लेखनातून स्त्रीच्या 'बाईपणा'च्या जाणीवा व्यक्त व्हायला सुरुवात झाली होती. इ.स. १८८२ मध्ये ताराबाई शिंदे यांचा 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. हा मराठीतील पहिला स्त्रीवादी दृष्टिकोनातून लिहिलेला ग्रंथ आहे. या ग्रंथात ताराबाई शिंदे समाजव्यवस्थेतील स्त्रीचे दुय्यम स्थान अधोरेखित करतातच, पण जनमाणसात व लोकप्रिय साहित्यात रूढ पावलेल्या स्त्रीप्रतिमेवरही घणाघाती हल्ला चढवितात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या कार्यामध्ये जन्मजात जातीव्यवस्था नाहीशी होऊन सामाजिक समता प्रस्थापित व्हावी या गोष्टीला जसे अत्यंत महत्त्व दिले आहे. त्याचप्रमाणे स्त्री-पुरुष समानता यावी या विचारालाही प्राधान्य दिले आहे. डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा विचार केला तर त्याच्या मुळाशी सामाजिक न्याय व समान संधी हा विचार आहे, असे सांगता येते. म्हणूनच भारतीय राज्यघटनेमध्ये त्यांनी (राज्यघटना लिहिणाऱ्यांपैकी एक प्रमुख या नात्याने) दलित वर्ग, आदिवासी वर्गांबरोबर महिला वर्गाचेही या देशातील दुय्यम नागरिकत्व नष्ट केले आहे. त्यांना समानसंधी, मतदानाचा अधिकार दिला. स्त्रीवर्गाला सामाजिक न्याय हक्क मिळवून देण्यात भारतीय राज्यघटना व डॉ. आंबेडकर यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे.

भारतीय समाज सुधारकांचे कार्य, शिक्षणाच्या सोयी, पुरोगामी कायदे, राज्यघटनेने दिलेले अधिकार इत्यादी माध्यमातून स्त्री स्वातंत्र्याची चळवळ सक्षमतेने वाटचाल करू लागली. तसेच स्त्रीवादी साहित्याच्या माध्यमातूनही या चळवळीला चालना मिळत गेली. उदाहरणार्थ, ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री-पुरुष तुलना', मुक्ताबाईचा 'निबंध', इरावती कर्वे यांचे 'स्त्री जीवनविषयक विचार एक प्रश्नचिन्ह', विद्युत भागवत यांचे 'स्त्री पुरुष विषमता'

तसेच बहिणाबाई चौधरी, माया पंडित, शर्मिला रेगे, उर्मिला पवार, मिनाक्षी मनू, शोभा भागवत, प्रज्ञा लोखंडे, नीरजा, प्रतिमा इंगोले, गौरी देशपांडे, अरुंधती रॉय, महाश्वेतादेवी, छाया दातार, श्रुती तांबे, नीलम गोऱ्हे इत्यादींनी आपल्या लेखनाद्वारे स्त्रियांच्या संदर्भातील विचार व्यक्त केले आहेत. स्त्रीवादी लेखकांनी कथा, कादंबरी, कविता, लेख, अग्रलेख इत्यादींच्या माध्यमातून बलात्कार, शोषण, कौटुंबिक हिंसा, हुंडाबळी, घटस्फोट इत्यादी स्त्रीजीवनाशी निगडीत समस्यांचे चित्रण केले आहे. आणि आपल्या लेखनाद्वारे लिंगभेदरहित समाजनिर्मितीची निकड प्रतिपादिली आहे.

दलित साहित्यप्रवाह, ग्रामीण साहित्यप्रवाह, आदिवासी साहित्यप्रवाह व स्त्रीवादी साहित्यप्रवाह हे सर्व प्रवाह भारतीय संस्कृतीच्या परिप्रेक्ष्यात सर्वस्तरीय लोकशाहीची अपेक्षा बाळगणारे प्रवाह आहेत. कारण या सर्व प्रवाहांच्या मुळाशी बदललेली सामाजिक परिस्थिती होती आणि जीवनाच्या नव्या प्रेरणा होत्या. म्हणूनच असे म्हणता येईल की, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रबोधन परंपरेला मिळालेला व त्यातूनच निर्माण झालेला हा साहित्यिक प्रतिसाद होता. यांतूनच मराठी साहित्यविश्वात दलित, ग्रामीण, आदिवासी व स्त्रिया यांना केंद्रवर्ती ठेवणारी साहित्यपरंपरा जन्मास आली आहे.

या सर्व साहित्यप्रवाहांच्या मुळाशी ‘शोषण’ हा समान घटक आहे. शोषणाला प्रतिकार म्हणून ‘संघर्ष’ हे या प्रवाहांचे मूलभूत वैशिष्ट्य ठरले. दलित साहित्यातून जातिनिहायत विषमाधिष्ठित समाजव्यवस्थे विरुद्धचा संघर्ष पाहावयास मिळतो. ग्रामीण साहित्यातील संघर्षात इतर गोष्टींबरोबरच मानव व निसर्ग यांमधील संघर्षही व्यक्त होतो. आदिवासींच्या संघर्षात मूलभूत स्वामित्व हा प्रधान घटक आहे. तर स्त्रीवादी साहित्य लिंगाधिष्ठित समाजरचने-विरुद्ध संघर्ष करते. म्हणून या सर्व प्रवाहातील साहित्यात संघर्षाचे चित्रण पाहावयास मिळते.

दलित साहित्याने सामाजिक आणि सांस्कृतिक विषमतेविरुद्ध आवाज उठविला. प्रस्थापित व्यवस्थेला नकार दिला. मानवतेच्या अधिष्ठानावर उभ्या असलेल्या समाजव्यवस्थेची मागणी केली. याकरिता त्यांनी वाङ्मयाकडे समाजप्रबोधनाचे साधन म्हणून पाहिले. म्हणूनच आपल्या जगण्या-मरणाचे प्रश्न त्यांनी वाङ्मयाचे विषय बनविले. साहित्यकृतीचा आशय, रूपबंध व मूल्ये या तीनही पातळ्यांवर दलित साहित्याने बंडखोरीची भूमिका स्वीकारली. पुढे यातूनच प्रेरणा घेऊन ग्रामीण साहित्य चळवळ सुरू झाली. आदिवासी, भटके, विमुक्त व स्त्रिया यांनीही आपआपल्या वाङ्मयीन चळवळी उभ्या केल्या. याचबरोबरीने या काळात सत्यशोधक जलसे, तसेच शाहिरी कीर्तन इत्यादींद्वारे बहुजन समाज परंपराही थोड्याफार प्रमाणात कार्यरत दिसतात. म्हणून या वाङ्मयीन चळवळींनी व प्रवाहांनी म. फुले व डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेला असे म्हणावे लागते.

समाजव्यवस्था बदलली तर माणूस सुखी होईल, ही या साहित्यप्रवाहांच्या मुळाशी असलेली समान श्रद्धा आहे. म्हणून हे सर्व साहित्यप्रवाह परिवर्तनसन्मुख प्रवाह आहेत. या सर्व प्रवाहांच्या पाठीमागे असलेल्या चळवळींनी एकत्र येऊन जाती, वर्ग, पुरुषसत्ताक वर्चस्ववादी सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्था उलथवून टाकली पाहिजे. आणि समानतेच्या तत्त्वावर आधारलेली पर्यायी सांस्कृतिक रचना तयार केली पाहिजे. म्हणून दलित, ग्रामीण, आदिवासी व स्त्रीवादी हे सर्व प्रवाह संयुक्तरित्या एकत्र येणे गरजेचे आहे. यातूनच मराठी साहित्यात एक मुख्य प्रवाह आकार घेईल.

आजचा विचार केला तर विसाव्या शतकाच्या शेवटच्या उत्तरार्धात जागतिकीकरण आणि खाजगीकरण यांची जागतिक लाट निर्माण झाली आहे. या जागतिकीकरणाचे बरेवाईट परिणाम दलित, ग्रामीण, आदिवासी व स्त्रिया या सर्वांवरच होत आहेत. उदाहरणार्थ, बहुराष्ट्रीय कंपन्यांचा शेती क्षेत्रांमधील प्रवेश, शेतकऱ्यांच्या जगण्याच्या वाटाच बंद होणे व यांतून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या, तसेच महाराष्ट्रातील इ.स. १९९४, १९९८ व २००१ या वर्षी जाहिर झालेली तीन महिला धोरणे, या महिला धोरणांनी स्त्रीविषयांचे पूर्वग्रह स्वीकारत तिच्या सक्षमीकरणाची भाषा बोलणे, कोणत्याही मूलगामी संरचनात्मक बदलाचा आग्रह न धरणे आणि या धोरणान्वये महाराष्ट्रातील स्त्रीचळवळीचा आवाज क्षीण करण्याचा प्रयत्न करणे, यांसारखी आव्हाने वरील चळवळींना व अनुषंगाने त्या प्रवाहातील साहित्याला पेलता आली पाहिजेत. आज जागतिकीकरणाचे आव्हान हे सर्वात मोठे आव्हान आहे. ते दलितवर्गासमोरही आहे. या प्रक्रियेत टिकून राहून विकास साधता आला पाहिजे. किंबहुना या प्रक्रियेचा फायदा करून घेता आला पाहिजे. यासाठी दलित, ग्रामीण, आदिवासी व स्त्रिया या सर्वच लेखकांनी डोळसपणे या प्रक्रियेकडे पाहिले पाहिजे. जागतिकीकरणाचे सर्व धोके व फायदे ओळखून येथील समाजव्यवस्थेचा, येथील विविध प्रश्नांचा विचार केला पाहिजे. आणि त्यानुसार आपल्या लेखणीचा वापर केला पाहिजे.

–डॉ. भारती तेंडुलकर

❖❖❖❖

# ९

# आंबेडकरवादी चळवळ आणि दलित साहित्य

**प्रा. दामोदर मोरे**

आंबेडकरी चळवळीचा शोध आणि बोध घ्यावयाचा असेल तर आपल्याला ही चळवळ जन्माला घालणाऱ्या समाज व्यवस्थेवर प्रकाशझोत टाकावा लागेल. ऋग्वेदाच्या पुरुष सुक्तामध्ये समाज पुरुषाचे वर्णन आलेले आहे. त्यात ब्राम्हण बांधवाचा जन्म मुखापासून, क्षत्रियबंधूचा बाहूपासून, वैश्य बंधूचा पोटापासून तर शुद्र मानल्या गेलेल्या बंधूचा जन्म पायापासून झाल्याचे म्हटले गेले आहे. मुख ते पाय म्हणजे हा समाज पुरुष होय. विशेष म्हणजे हा समाज पुरुष म्हणजेच परंपरेने चालत आलेला गाव होय. आणि या समाज पुरुषाच्या संकल्पनेतच या देशातील अस्पृश्य, आदिवासी आणि भटक्या-विमुक्तांना स्थान नसल्याने 'गावा' मध्ये त्यांना न ठेवता त्यांना बहिष्कृत करण्यात आले. मुख ते पाय यापैकी कुठूनही अस्पृश्य किंवा दलित जन्माला आले नाहीत म्हणून त्यांना गावात स्थान दिले नाही. त्यांना गावकुसा बाहेरच ठेवले. आदिवासीना जंगलात हाकलले. तर भटक्या-विमुक्तांना भटकत ठेवले.

## बहिष्कृतांना नाकारणारी वर्णव्यवस्था :

वर्णव्यवस्थेचे सर्वात कुरुप वैशिष्ट्य म्हणजे तिने अस्पृश्य, आदिवासी आणि भटक्या विमुक्तांना माणूस म्हणून नाकारले. समाज म्हणून नाकारले. या बहिष्कृताच अस्तित्व आणि अस्मिता नाकारली. त्यांच्या मानवाधिकारांना पायदळी तुडविण्यासाठी धार्मिक मान्यता असलेली आचार संहिता बनविली.

## वर्णव्यवस्था म्हणजे सत्तेचे वाटप :

आम्ही आमच्या भाषणात, लेखणात समाजात वर्णव्यवस्था होती एवढेच सांगत असतो. पण त्या मागच्या सत्ताशास्त्राकडे मात्र दुर्लक्ष करतो. त्यामुळे वर्णव्यवस्थे मागच्या हेतूवर नीट प्रकाश पडत नाही. वास्तविक वर्णव्यवस्था हे अत्यंत चतुर आणि स्वार्थीपणे केलेले पूर्णतः असंतुलीत आणि अन्यायकारक असे सत्ता वाटप होते. आमच्या ब्राम्हण बंधुकडे ज्ञानसत्ता, आमच्या क्षत्रिय बांधवाकडे राजसत्ता, आमच्या वैश्य बांधवाकडे अर्थसत्ता तर शुद्रांकडे फक्त सेवाभाव आणि बहिष्कृतातील तीन घटक तर पुरुष सुक्ताच्या दृष्टीने समाज म्हणून अस्तित्वातच नाहीत. या देशातल्या शुद्रांना आणि अतिशुद्रांना म्हणजे बहिष्कृतांना वर्णव्यवस्थेने ज्ञानसत्ता, राजसत्ता आणि अर्थसत्ते पासून हजारो वर्षे वंचित ठेवले. ज्ञानसत्ता ही अशी किल्ली आहे की जिने उजेडाचे सर्व दरवाजे उघडले जातात तीच हाती नसल्याने या देशातल्या बहिष्कृत वर्ग दैन्य, दुःख, दास्य, दारिद्र्या यांच्या अंधारात भरकटत राहिला. हजारो वर्षे या घटकातील प्रज्ञा आणि प्रतिभेचे अंकुर तसेच कोमेजून गेले.

दलित म्हणजे कोण? पायातून शुद्रचा जन्म झाला तर पायाच्या खाली ज्याला दडपले तो दलित. पद म्हणजे पाय आणि पायाखाली दडपलेला दडलेला तो दलित. तो पायाच्या म्हणजे समाजाचा भाग नाही म्हणून दलित. या दलितामध्ये अन्याया विरुद्ध पेटून उठण्याचे स्फुलिंग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चेतविले. 'अन्यायाची जेथ प्रचिती / तेथे कर माझे सळसळती' अशी अवस्था दलितांची आहे. आज जी दलित चळवळ आहे तिचे प्रेरणा स्थान बुद्ध- फुले आंबेडकर हे आहे. आंबेडकरवाद या चळवळीचे 'पॉवर हाऊस' आहे.

**चळवळीचे 'पॉवर हाऊस' – आंबेडकरवाद :**

आंबेडकरवाद म्हणजे काय? ''नेंभळटपणा म्हणजे आंबेडकरवाद नव्हे. अन्यायावर चित्यासारखी झेप घेऊन तुटून पडणं म्हणजे आंबेडकरवाद. मानवी जीवन सुंदर करणारी मूल्यव्यवस्था म्हणजे आंबेडकरवाद होय. जागृतीचा अग्नी धगधगत ठेवणारी क्रांतीकारी संवेदना म्हणजे आंबेडकरवाद होय. सर्वकष शोषणाविरुद्ध संघटितपणे उठवलेला बुलंद आणि बलदंड आवाज म्हणजे आंबेडकरवाद होय. आंबेडकरवाद हा मानवी स्वातंत्र्याची गाथा गाणारा, समतेची सत्त्व जपणारा, बंधुत्वाच बीजारोपण करणारा, अन्यायाची चीड आणि न्यायाची चाड असणारा परिवर्तनवादी विचार आहे. अनात्मवादी, निरीश्र्वरवादी, विज्ञानवादी, बुद्धि-प्रामाण्यवादी क्रांतिकारी विचार म्हणजे आंबेडकरवाद होय. समताधिष्टीत समाजाच्या निर्मितीसाठी अखंड संघर्ष हेच आंबेडकरवादाचे सौंदर्य आहे''.(आंबेडकरवादी साहित्य विचार प्रा. दामोदर मोरे पृ.६)

**आंबेडकरवादाचे सामर्थ्य-संघटन आणि संघर्ष :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे निर्माते आहेत. संविधानाच्या माध्यमातून त्यांनी या नवभारताच्या निर्मितीची बीजे पेरली आहेत. भारत हा एक समाज पुरुष आहे. या समाज पुरुषाचे काही अवयव जर विकलांग राहिले तर देश कसा प्रगती करणार? त्यामुळे बहिष्कृत भारताला सवर्ण भारताच्या बरोबरीने आणण्यासाठी त्यांनी प्रारंभा पासूनच चळवळी उभ्या केल्या.

संघटन आणि संघर्ष हे परस्परपूरक आणि परस्परावलंबी असते. संघटन आणि संघर्ष हे चळवळीचे दोन पंख असतात. ते सामर्थ्यशाली असतील तरच त्या समाजाला प्रगतीच्या दिशेने झेप घेता येते. संघटन नसेल तर संघर्ष करताच येत नाही आणि संघर्ष नसेल तर संघटन दुबळे व्हायला वेळ लागत नाही. हे भान बाबासाहेबाना होते. म्हणून त्यांनी केवळ संघटना उभ्या केल्या नाहीत तर सामाजिक न्याय आणि समतामूलक समाजाच्या निर्मितीसाठी संघटनेला कार्यक्रम दिला. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलगामी आणि जीवन प्रकाशमान करणारा संदेश दिला.

**आंबेडकरी संघटना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ज्या ज्या वेळी जशी-जशी गरज भासली त्या-त्या वेळी त्यांनी नव-नव्या संघटना उभा केल्या. पण त्यांच्या प्रत्येक संघटनेच्या निर्मिती मागे उपेक्षिताविषयी त्यांच्या मनात असलेली करुणा, समाजाचे कल्याण व्हावे याची त्यांच्या मनात

असलेली तळमळच दिसून येते. त्यांच्या प्रत्येक संघटनेला सामाजिक बांधिलकीचे अधिष्ठान होते. सम्यक समाज परिवर्तन हे त्या संघटनाचे ध्येय होते.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२४ साली काढलेल्या पहिल्याच संघटनेचे नाव 'बहिष्कृत हितकारिणी' असे होते. ते मोठे अर्थपूर्ण आणि बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजहितदक्ष व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवणारे आहे. बहिष्कृत कोण ?




पहिल्याच बहिष्कृत हितकारिणी संघटनेत बाबासाहेब केवळ दलितांचे हित समोर ठेवत नाहीत तर संपूर्ण बहिष्कृतांची उन्नती त्यांच्या डोळ्यांपुढे आहे, हे बाबासाहेब केवळ दलितांसाठी लढले असे म्हणण्यानी लक्षात घ्यायला हवे. ६ मार्च १९२४ रोजी स्थापन झालेल्या या बहिष्कृत हितकारीणीचे १) शिक्षण प्रसार २) उद्योग आणि शेतीद्वारे आर्थिक प्रगती ३) मागासवर्गीयांसाठी वाचनालय, अभ्यास केंद्र यांची स्थापना असे महत्वपूर्ण उद्देश होते. ४ जानेवारी १९२५ साली हितकारिणीने सोलापूर येथे अस्पृश्यांसाठी वसतिगृह सुरु केले.

आंबेडकरी चळवळीत 'स्वतंत्र मजूर पक्षाचे' महत्त्वपूर्ण योगदान आहे. लोकांची योग्यता आणि उत्पादन शक्ती वाढविण्यासाठी त्यांना तांत्रिक शिक्षण देण्याची मागणी पक्षाने केली. १७६ जागा असलेल्या विधानसभेत या पक्षाने १७ ठिकाणी उमेदवार उभे केले त्यापैकी १५ उमेदवार बाबासाहेबानी निवडून आणले. बाबासाहेब स्वतः प्रंचड बहुमताने निवडून आले. 'शेडुल कास्ट फेडरेशन' ही देखील बाबासाहेबांनी स्थापन केलेली एक लढाऊ संघटना होती. आंबेडकरी चळवळीत तिचे कार्य ऐतिहासिक स्वरुपाचे आहे. 'समता सैनिक दल' ही अन्यायावर तुटून पडणारी, समतेसाठी लढणारी आंबेडकरी सैनिकांची शिस्तबद्धक संघटना होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'रिपब्लिकन पक्षाची' संकल्पना मांडली. त्यांच्या हयातीत जरी ते त्या संकल्पनेची पूर्तता करु शकले नसले तरी त्यांच्या प्रेरणेतूनच पुढे

'रिपब्लिकन पक्षाची' स्थापना झाली. बुद्ध विचार तळागाळापर्यंत नेऊन प्रबुद्ध समाजाच्या निर्मितीसाठी 'भारतीय बौद्ध महासभेची' स्थापना बाबासाहेब आंबेडकरांनी केली.

**आंबेडकरी चळवळीची शस्त्रे :**

चळवळीसाठी संघटन आवश्यक असते. संघटनेसाठी सम्यक संघर्ष आवश्यक असतो. संघर्ष हा सम्यक नसेल तर विघातकताच पदरात पडते; म्हणून संघटनेला विचारांची गरज असते. तत्वज्ञान हा संघटनेचा कणा असतो. तत्वज्ञान हे चळवळीचे होकायंत्र असते. चळवळ जगवायची असेल, कार्यकर्ते जागवायचे असतील तर विचारांचा अग्नी नेहमीच धगधगत ठेवावा लागतो. तो धगधगत ठेवण्याचे सामर्थ्य सामाजिक भान असलेल्या वर्तमान पत्रातच असते. आंबेडकरी वर्तमानपत्रे ही चळवळीचे सशक्त पंख होते. ज्याच्या बळावर आंबेडकरी चळवळीने अनेकदा यशाच्या शिखरावर झेप घेतलेली आहे. बाबासाहेब आंबेडकरानी स्वतः काढलेल्या आणि त्यांच्या प्रेरणेने चालणाऱ्या वर्तमान पत्रांचा वापर एखाद्या शस्त्रासारखा सामाजिक व्यंगे छाटण्यासाठी अज्ञान आणि अंधश्रद्धेवर घणाघाती आघात करुन मानवी मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी झाला. आंबेडकरी चळवळ उभी करण्याचे, ती जिवंत आणि सतत गतिमान ठेवण्याचे कार्य आंबेडकरी वर्तमानपत्रांनी केले.




वृत्तपत्रे ही चळवळीची वाहक असतात. समाजरुपी नौकेला योग्य दिशेला नेणारे होकायंत्र म्हणजे तत्वज्ञान. समाजाला 'प्रबुद्ध' करण्यासाठी चळवळीच्या नौकेत आंबेडकरी तत्वज्ञानाचे होकायंत्र सतत दिशेची जाणीव करुन देत होते. हे आंबेडकरी तत्वज्ञानाचे होकायंत्र सतत जनतेसमोर नेण्याचे त्यांच्या अंधारवाटेवर विचारुपी उजेडाचे मशाल नेण्याचे काम आंबेडकरी वर्तमान पत्रांनी केले. आंबेडकरी चळवळ आणि आंबेडकरी वर्तमानपत्रे ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत्या आणि आजही आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२० साली 'मूकनायक' हे पत्र प्रकाशित केले. त्यांच्या प्रज्ञेचा आणि पत्रपांडित्याचा प्रत्यय त्यामधून आला. ज्यांना आजवर तोंड असून मुके ठेवले, ज्यांचा आवाज बंद केला होता त्या मुक्यांचे नायक बाबासाहेब झाले. त्यांच्या बुलंद आवाज बाबासाहेब झाले. 'बहिष्कृत भारत' हे त्यांच्या दुसऱ्या पत्राचे नाव किती अर्थपूर्ण आहे. बहिष्कृत म्हणजे अस्पृश्य आदिवासी आणि भटक्या विमुक्त समाजाविषयी बांधिलकी प्रकट करणारे आणि भारत नावातून संपादक बाबासाहेबाची देशभक्ती आणि राष्ट्रभक्ती प्रकट होते. त्यांच्या प्रेरणेतून निघालेले 'समतापत्र' समताधिष्ठति समाजाचे स्वप्न पहणारे व त्यासाठी लढणारे होते. जनता हे नाव बाबासाहेबांची जनतेच्या विषयी असणारी करुणा प्रकट करणारे तर 'प्रबुद्ध भारत' हे नाव अत्यंत समर्पक होते. लोकशाहीच्या सबलीकरणासाठी या देशातला

प्रत्येक माणूस प्रबुद्ध असला पाहिजे लोकशाही या देशात रुजली पाहिजे, जगली पाहिजे ही भावना त्यांची नाव देण्यामागे होती.

चळवळीला उर्जा देणाऱ्या या आंबेडकरी पत्रकारीतेचे वैशिष्ट्य म्हणजे दलितांमध्ये स्वत्व, स्वाभिमान आणि स्वावलंबनाचे स्फुल्लिंग पेटविण्याचे काम तिने केले. गुलामांना तुम्ही गुलाम नसून मनुष्य आहात. गुलामी विरुद्ध बंड करुन उठण्याची तिने प्रेरणा दिली. अस्पृश्यांचे मनुषत्व नाकारणाऱ्या पोथी, परंपरा आणि परमेश्वरी संकल्पनावर कठोर चिकित्सेच्या हातोड्याने प्रहार केले. दलितांना अंधश्रद्धेच्या आणि अज्ञानाच्या चिखलातून वर काढून वैज्ञानिक दृष्टी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांजवळ शब्दांचेच धन आणि शब्दांचीच रत्ने होती. या शब्दानांच शस्त्र करुन त्यांनी सामाजिक व्यंगे छाटली. चळवळीच्या हाती समतेचा निळा झेंडा दिला.

पत्रपंडित बाबासाहेबही होती, लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधीही होते. पण या सर्वांच्या पत्रकारीतेत फरक होता. पत्रपंडित टिळक आणि गांधीजी यांच्या समोरचा वाचकवर्ग सुशिक्षित तर बाबासाहेब आंबेडकर यांच्या समोरचा वाचक अशिक्षित, अज्ञानी, अडाणी होता. टिळक आणि गांधीजी समोरील वाचकांच्या खिशात वर्तमानपत्र विकत घेण्यासाठी पैसा होता. पण बाबासाहेबाचा जो वाचक वर्ग होता त्यांच्याकडे वृतपत्र विकत घेण्याची अर्थशक्ती नव्हती. या पार्श्वभूमीवर आंबेडकरी वृत्तपत्र चळवळीचे कार्य निश्चितच महान होते. एका गावात एक आंबेडकरी पत्र येई आणि ज्या एखाद्याला वाचता येईल तो वाचत असे आणि बाकीचा समूह शांतपणे ऐकत असे.

**आंबेडकरी चळवळीचे तत्वज्ञान :**

भगवान बुद्ध, संत कबीर आणि जोतीराव फुले यांचे तत्वज्ञान हा आंबेडकरी चळवळीचा कणा आहे. या त्यांच्या गुरुंच्या आणि त्यांच्या स्वयंप्रेरणेतून त्यांनी ज्या चळवळी केल्या जे विचार मांडले ते आंबेडकरी चळवळीला दिशा दर्शक आहेत. समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि धर्मनिरपेक्षता हे आंबेडकरी चळवळीचे पंचशील आहे जे लोणच्यासारखे तोंडी लावण्यासाठी नाही तर आचरणात आणण्यासाठी आहे. आंबेडकरी चळवळीचा संघर्ष त्याचसाठी आहे. प्रज्ञा, शील, करुणा, मैत्री, सामाजिक बांधिलकी ही आंबेडकरी चळवळीची मौलिक पंचरत्ने आहेत. ती आचरणात आणली की त्याच्या उजेडाने चळवळीतील कार्यकर्ते प्रकाशमान होतात आणि समाजाची पातळी उंचावतात.

'एक माणूस – एकमत' ही राजकीय लोकशाही अस्तित्वात आहे पण 'एक माणूस – एकमूल्य' ही सामाजिक लोकशाही अस्तित्वात आणण्यासाठी सतत आणि सजग संघर्ष करीत राहणे हे आंबेडकरी चळवळीचे क्रांतिकारी ध्येय आहे. जातीचे चक्ये फेकून देऊन माणसांकडे आणि महापुरुषांकडे पाहणे आणि त्यांना स्वीकारणे यासाठी ही चळवळ आहे. जेथे जेथे अन्याय-अत्याचार दिसेल त्यावर वीजेसारखे कडकडत तुटून पडणे ही या चळवळीतील कार्यकर्त्यांची बांधिलकी आहे. दलितत्व ही एक अपमानीत अवस्था आहे आणि दलित्वाचा त्याग करुन मनुष्यत्वाचा झेंडा फडकविणे हे या तत्वज्ञानाचे ध्येय आहे. आजही समाजात जातीमूल्ये ही व्यक्तिमूल्यांवर कुरघोडी करताना दिसतात. समता हे मूल्य समाजात रुजलेले

नाही. दि. ३० जानेवारी २०१२ च्या दै. सम्राट या वर्तमान पत्राच्या पहिल्या पानावर बातमी आहे की दलित महिला सरपंचाला तामीळनाडूत २६ जानेवारी रोजी ध्वजारोहन करु दिले नाही. म्हणजे 'एक व्यक्ती – एक मूल्य' पायदळी तुडविले जात आहे. उपेक्षितांचे अस्तित्व आणि अस्मिता यांची जपणूक करुन त्यांच्या मानवाधिकारांच्या रक्षणासाठी रणशिंग फुंकणे आणि प्रत्यक्ष लढा देणे हे या चळवळीचे ध्येय आहे.

**बाबासाहेबांची ग्रंथ संपदा - चळवळीचे स्फूर्तीकेंद्र :**

तत्वज्ञान ही चळवळीची आधारशीला असते. आंबेडकरी तत्वज्ञानाचे माणिक मोती बाबासाहेबांच्या ग्रंथसागरात विखुरलेले आहेत. भीमाचा एक एक बोल त्याला पृथ्वीच मोल असे कवी त्यामुळै तर म्हणतात. शुद्रपूर्वी कोण होते? अस्पृश्य मूळचे कोण? थॉट्स ऑन पाकिस्तान, जातिव्यवस्थेचे उच्चाटन, भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म असे अनेक ग्रंथ असे आहेत जे आंबेडकरी चळवळीला उर्जा देण्याचे, जगातल्या उपेक्षीतांना लढ्याची प्रेरणा देण्याचे काम करीत आहेत.

**रिपब्लिकन पक्ष :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांना संदेश दिला होता की, शासनकर्ती जमात व्हा! सत्तेमध्ये परिवर्तन घडविण्याचे फार मोठे सामर्थ्य असते. याचे सम्यक संविधानाच्या शिल्पकाराला होते म्हणून समाजहितासाठी सत्ता काबीज करण्याचा संदेश त्यांनी दिला. आणि रिपब्लिकन पक्षाचा आराखडाही त्यांनी तयार केला. पण हा पक्ष निर्माण करण्याआधीच त्यांचे आकस्मिक निधन झाले आणि त्यांच्या विद्वान अनुयायांनी बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या रिपब्लिकन पक्षाची ३ ऑक्टोबर १९५७ रोजी स्थापना केली. पण हे त्यांचे ऐक्य फार काळ टिकले नाही. पक्ष मोठा समाज मोठा की मी मोठा? यामध्ये 'मी' च्या अहंकरापोटी त्यांनी समाजहिताचा बळी दिला. रिपब्लिकन पक्षात फूट पाडली. कर्मवीर दादासाहेब गायकवाड, बॅ. राजाभाऊ खोब्रागडे, ॲड. बी.सी. कांबळे, आर. डी. भंडारे, रा. सु. गवई यासारखे विद्वान नेते पक्षाला लाभूनही त्यांच्या विद्वतेला अहंकाराने वेढल्याने आणि स्वार्थाने घेरल्याने ते पक्षाची उभारणी करण्यापेक्षा स्वयंसेवाच करीत राहिले.

**दलित पँथर :**

रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांच्या नाकर्तेपणा, त्यांचा स्वार्थ, त्यांचा अहंकार यामुळे समाज अस्वस्थ होता. विशेषतः तरुणवर्ग अस्वस्थ आणि निराश होता. दलित समाजावर अन्याय-अत्याचार होत होते. पक्ष, संघटना दुर्बल असली की, तुम्हाला कुणीच घाबरत नसते.

'बावडा' या ठिकाणी दलितांवर अत्याचार होताच दलित तरुणांच्या मनातील असंतोषाचा लाव्हा बाहेर पडला. लेखक राजा ढाले यांनी साधनेत जळजळीत शब्दात आपल्या भावना प्रकट केल्या. लढाऊ दलित तरुणांच्या मनात असंतोषाचा वणवा पेटला. त्यातून १९७२ साली दलित पँथरचा जन्म झाला. राजा ढाले आणि नामदेव ढसाळ ही लढाऊ नावे देशाच्याच नव्हे तर जागतिक वर्तमानपत्राच्या मथळ्यावर झळकली. साधनेच्या लेखाने सवर्ण-दलित दंगली पेटल्या.

अन्यायावर चित्यासारख्या तुटून पडणारा तो पँथर. गावोगाव पँथरच्या शाखा निर्माण झाल्या. जेथे-जेथे अत्याचार होत तेथे-तेथे पँथर आक्रमकपणे धाऊन जात असत. पँथर चळवळीने सवर्णांच्या, अन्याय-अत्याचार कर्त्यांच्या मनात एक धाक निर्माण झाला, जरब निर्माण झाली. पँथर एका बाजूला रिपब्लिकन नेत्यांच्या नाकर्तेपणावर कठोर टीका करीत असत तर दुसऱ्या बाजूला दीन दलितांच्या मार्गात गतिरोधक बनलेल्या देव, दैव आणि देऊळ, पोथी आणि परंपरा यांच्यावर तर्कनिष्ठ आणि वैज्ञानिक दृष्टीतून सभा संमेलनातून हल्ले करीत. अस्पृश्यातील अनेक जातीचे तरुण पँथरमध्ये सामील झाले. पण प्रामुख्याने बौद्ध तरुणांचा भरणा त्यामध्ये जास्त होता. 'रिडल्स ईन हिन्दुईझम'च्या संदर्भातील अभूतपूर्व मोर्चा ही आंबेडकरी आंदोलनाची यशोपताकाच म्हणावी लागेल.

**आंदोलनाचा आंबेडकरी संदेश :**

कार्यकर्त्यांना आंबेडकरी विचारांचा करंट लागला की, आंदोलनाची उर्जा त्याच्या रक्तात सळसळायला लागते आणि 'अन्याय घडो कोठेही। चिडून उठू आम्ही' अशी भूमिका मग पँथर कार्यकर्ते घ्यायला लागतात. १४ एप्रिल १९४७ साली बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना, आदिवासींना, भटक्या विमुक्तांना मनुष्यत्वाच्या प्रस्थापनेसाठी संघर्षाचा संदेश दिला. तो अत्यंत मोलाचा आहे. एक शब्दचा ही बदल न करता त्याला मी कवितारुप दिले आहे. बाबासाहेब म्हणतात –

माझा संदेश आहे
संघर्ष आणि अधिक संघर्ष,
बलिदान आणि आणखी बलिदान,
बलिदान आणि कष्ट यांची
मोजदाद न करता केलेला संघर्षच
देऊ शकतो त्यांना मुक्ति

धन्य आहेत ते लोक
जे त्यांच्याप्रती,
ज्यांच्यात त्यांचा जन्म झाला आहे,
आपल्या कर्तव्याविषयी जागृत आहेत.
ते लोक
जे गुलामीचा अंत करण्यासाठी
आपलं तारुण्य, आपलं शरीर व मन
यांची सर्व शक्तीपणाला लावण्याची
प्रतिज्ञा करतात.

धन्य आहेत ते लोक
जे निश्चय करतात की,
चांगले घडो अथवा वाईट,
धगधगते ऊन असो अथवा वादळ,

यश मिळो किंवा अपयश,
आम्ही तोपर्यंत थांबणार नाही
जोपर्यंत
आम्हाला मनावपद प्राप्त होणार नाही.
(नामांतर कविता : संपादक – प्रा. दामोदर मोरे पंचशील प्रकाशन, १९९१)

दलितत्व म्हणजे दुबळेपणा. दलितत्व म्हणजे दु:ख, दैन्य आणि दारिद्र्य. दलितत्व म्हणजे दास्य, दलितत्व म्हणजे दैववादीपणा. दलितत्व म्हणजे लाचारी, आणि लाचार मनोभूमीत स्वाभिमानाची फुले कधी उमलत नसतात. दलितत्व म्हणजे गुलामी आणि गुलामीच्या गटारात स्वातंत्र्याचे फुलपाखरु कधी उडत नसते. म्हणूनच या दलितत्वातून, अस्पृश्यपणातून सुटका करुन घेऊन मानवपद प्राप्तीसाठी बाबासाहेब संघर्ष करण्याचा सम्यक संदेश देतात. तो संदेश आजच्याच नव्हे तर येणाऱ्या पिढ्यांसाठीही दिशादर्शक आहे.

**न्यामांतराचा लढा :**

मराठवाड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फार मोठे शैक्षणिक योगदान आहे. उपेक्षितांच्या अनेक पिढ्यांना ज्ञानाचा उजेड देण्याची कायमची सोय शैक्षणिक संस्थांच्या रुपाने त्यांनी केली पण जेथे हे सर्व केले त्या औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याचा ठराव विधानसभेत २७ जुलै १९७८ रोजी पारीत होताच मराठवाड्यात अभूतपूर्व अशा दंगली पेटल्या. दीन-दलितांची घरे जाळण्यात आली. योजनाबद्ध रीतीने दलितांवर सामूहिक हल्ले करण्यात आले. पोचीराम कांबळे या लढाऊ पँथरला तर दगडाने ठेचून मारले. देशातल्या २६ विद्यापीठांना व्यक्तींची नावे दिलेली असताना भारतीय संविधानाचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव विद्यापीठाला दिल्याने विद्यापीठाला विटाळ होणार होता.

**नामांतर लढ्यातील अनुभवाची दाहकता :**

नामांतर लढ्यात अनेकांनी बलिदान दिले. पोचीराम कांबळेला जिंवत जाळण्यात आले. सुगावच्या जनार्दन मवाडेचा पाय तोडला, शरिर धडावेगळे केले. मराठवाडा दंगलीची झळ १५२५० व्यक्तींना लागली. १७२५ घरे उद्धस्त करण्यात आली.

**नामांतर लढ्यातील लाँगमार्च :**

मराठवाडा विद्यापीठाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ' असे नामांतर करण्यासाठी ६ डिसेंबर १९७९ रोजी औरंगाबाद येथे सत्याग्रह करण्यासाठी निघालेला लाँगमार्च हा जगातील तीसरा लाँगमार्च होय. पहिला लाँगमार्च १९३४ साली माओच्या नेतृत्वाखाली निघाला. १ लाख चिनी क्रांतिकारक वीरांनी सात हजार कि. लांबीचा पल्ला वर्षभरात गाठला आणि चीनमध्ये क्रांती झाली दुसरा लाँगमार्च मार्टीन ल्यूथर किंग यांच्या नेतृत्वाखाली १९७३ साली अमेरिकेतील वाशिंग्टन येथे काढला गेला. हा लाँगमार्च म्हणजे निग्रोंनी समतेसाठी चालविलेला संघर्षच होता. मराठवाड्यात काढलेला लाँगमार्च हा आंबेडकरी प्रेरणेने आणि समतेच्या प्रस्थापनेसाठी काढला गेला. प्रा. जोगेन्द्र कवाडे भीम सैनिकांच्या प्रचंड ताफ्यासह नागपूर ते औरंगाबाद पायीच निघाले. चालून-चालून त्यांचे पाय

रक्तबंबाळ झाले. सर्व घरातील लोक त्यात सहभागी झाले होते. नागपूरच्या सत्याग्रहीवर रात्री झोपेतच लाठीमार करण्यात आला (नामांतर कविता पृ. ११४)

**नामांतर लढ्यातील सत्याग्रही योद्धे :**

१. जेलमधील वास्तव्यात साहेबराव पोटभरे हा माजल गावचा सत्याग्रही म्हणाला की, नामांतर झाल्याशिवाय मी जेल सोडून जाणार नाही. जेल हेच माझे जग राहणार, नाही तरी जेलच्या बाहेरचे जेल हे याहीपेक्षा वाईट आहे.

२. बीड जिल्ह्यातील चंद्रभान इंगळे या सत्याग्रहीच्या मुलाने जेलमध्ये बापास पत्र पाठवले की विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव मिळाल्याशिवाय घरी येऊ नये.

३. बीड जिल्ह्यातील एक सत्याग्रही विष्णु रंगनाथ लोंढे डाव्या पायाने लंगडा आणि उजवा हात वाकडा असलेला, इतर सर्वांबरोबर चालणे झेपणार नाही म्हणून सर्वांच्या अगोदर निघाला आणि चालणे अशक्य झाल्यावर बेडका सारख्या उड्या मारत त्याने सत्याग्रहाचे ठिकाण गाठले.

४. घानोरा येथून समाधान हेलाडे यांस जेलमध्ये पाठवलेल्या पत्रात त्यांची बहीण लिहिते, प्रत्येक खेड्यात ७०/८० लोक अटक झाले आहेत. आपण मुलात अधिक जीव घालू नये व हिंमत कोणत्याही प्रकारे सोडू नये.

५. मोंढाला गावच्या अशोक यादवची आई 'लाँगमार्च' साठी अशोक बाहेर पडतना त्याच्या गळ्यात पडून रडली. नंतर तिने आपल्या 'जित्या पोरावर' फुले टाकली, कुंकु टाकले व त्याला सांगितले आता मेलास तरी चालेल पण बाबाच नाव लावूनच ये. (पाचही संदर्भ - नामांतर – समता संघर्षाचे नवे पर्व लेखक प्रा. नरेन्द्र कुकडे व इतर ५ जण)

**आंबेडकरी चळवळ आणि आंबेडकरवादी साहित्य :**

आंबेडकरवादी चळवळीतील तरुण त्या काळात एकाचवेळी कार्यकर्तेही होते आणि कवीही होते. नामदेव ढसाळ कवी आणि नेते होते. ज. वि. पवार हे देखील एक लढाऊ पँथर आणि मर्मभेदी कविता लिहिणारे कवी होते. राजा ढाले हे पँथरचे एक महत्त्वाचे संस्थापक नेते हेही एक लढाऊ लेखक होते. वामन निबांळकर हे देखील एक लढाऊ पँथर कार्यकर्ते आणि कवी होते. या आंबेडकरी कवी आणि कार्यकर्त्यांच्या कविता संग्रहाना दिलेली नावे मोठी बोलकी होती. नामदेव ढसाळांचा कविता संग्रह 'गोलपिठा' एक वेगळे अनुभवविश्व घेऊन आला. या देशातील एक एक जात म्हणजे जणू 'कोंडवाडाच'. म्हणून दया पवार यांनी कविता संग्रहाला कोंडवाडा असे सूचक नाव दिले. ज. वि. पवार यांच्या कविता संग्रहाचे नाव 'नाकेबंदी' असे सूचक आणि अर्थपूर्ण आहे. कारण सर्वत्र चळवळीची, आंबेडकरी कार्यकर्त्यांची, दलितांची नाकेबंदीच केली गेली आहे. या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठीच मग जय भिम चे लढाऊ शिपाई लढ्याच्या तयारीला लागतात हे भान ठेवून अजुन डांगळे हे कवी आपल्या कविता संग्रहाला अर्थपूर्ण नाव देतात. 'छावणी हलते आहे' गावात स्थान न देता अस्पृश्यांना गावाबाहेर बहिष्कृत केले म्हणून वामन निबांळकर 'गावकुसाबाहेरील कविता' असे शीर्षक कविता संग्रहाला देतात. आंबेडकरी चळवळ ही मानव

मुक्तीसाठी आहे. म्हणूनच दामोदर मोरे आपल्या कविता संग्रहाला 'विमुक्त' तर डब्ल्यु कपूर आपल्या कविता संग्रहाला 'बंधमुक्त' असे नाव देताना दिसतात.

आंबडेकरी चळवळीचे प्रतिबिंब नाटक, एकांकिका, कथा, कविता, स्वकथने, कादंबऱ्या यामध्ये उमटलेले आहे. पण हा विषय अतिव्याप्त असल्याने विस्तारभयास्तव त्याचा आढावा घेणे अशक्य असल्याने येथे फक्त कवितेत आंबेडकरी चळवळीचे प्रतिबिंब कसे उमटले आहे त्याचाच शोध घ्यायचा आहे.

**लढाऊ कवींची – लढाऊ कविता :**

'रायटींग फॉर फायटींग पोएट्री' हे आंबेडकरवादी कवितेचे प्रयोजन आहे. लढ्याची स्पदंने टिपणे हा आंबेडकरी कवितेचा रचनाधर्म आहे. ज. वि. पवार हे लढाऊ पँथर कवी 'जिभेवर वाचताहेत' या कवितेत म्हणतात –

तोडले त्यांनी जनार्दन मवाडेला
अन् जिवंत जाळले पोचीराम कांबळेला
पोचीराम असा
"जयभीम – जयभीम करीत चितेवर थंड झाला.
त्याच्या राखेतला स्फुल्लिंग
आसमंत पेटवित राहिला"

(नामांतर कविता – दामोदर मोरे पृ. ३०)

'क्रांतीगर्भ' या कवितासंग्रहाचे लढाऊ कवी अकोल्याचे अरुण शेगावकर यांनी आंबेडकरी चळवळीची एक वेगळीच क्रांतीकारी छटा आपल्या प्रतिमेने टिपली आहे. कवी 'माझ्या गावची कविता' या कवितेत म्हणतो –

युद्धभूमीवर सैनिकांना सेनापतीने
लढण्याचा आदेश द्यावा
तसा तो बोलत असे। माईक मधून
बौद्धांच्या घरावरुन नांगर फिरवा,
त्यांच्यावर बहिष्कार टाका, हरामखोर धेड
असा प्रत्येक रात्रीला नरक ओकायचा.
दिवसें दिवस गावचा इतिहास स्फोटक व्हायचा.

अस्पृश्यता पाळणाऱ्या मानसिकतेवर कवीने इथे झगझगित प्रकाश टाकला आहे. बौद्धांकडे पाहण्याचा सवर्णांचा दृष्टिकोन कसा नकारात्मक आणि अन्यायकारक आहे त्याचे दर्शन घडवतानाच कवी या कवितेला एक नाट्यात्मक कलाटणी देतो. त्यामुळे ही लढाऊ कविता आपणांस एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जाते. कवी याच कवितेत पुढे लिहितो –

अख्खे गाव कुरुक्षेत्र वाटायचे!
त्याची ही अमानुषता पाहून
एक दिवस माझ्या आजीने शिवी हासडली,
त्याच्या दिशेने दगड भिरकावले
शेंबड्या पोरानेही / हातातील काठी दाखविली,
पकड़ा, ठोका, मारा चा गजर केला
तेव्हा मात्र तो नराक्षम / पळत होता गांडू सारखा
सभेतील लोक पळत होते / मोकाट बैलासारखे.

(क्रांतीगर्भ - अरुण शेगावकर – पृ. १२)

अन्याय करणारा जास्त दोषी असतो, तसा अन्याय सहन करणाराही दोषी असतो. अन्याय सहन केला की परत अन्याय होत राहतो. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, अस्पृश्य हा शब्द पहिल्यांदा ज्याने उच्चारला असेल त्याच वेळी त्याची जिभ जर हासडली असती तर पुढे ही परंपरा सुरु राहिली नसती. हीच प्रतिकाराची आंबेडकरी प्रेरणा कवीने आजीच्या आक्रमकतेतून साकार केली आहे. येथे प्रतिकार करणारा कुणी तरुण नाही तर आंबेडकरी चळवळीतील आजी आहे हे विशेष.

आंबेडकरी चळवळीतील कवींच्या कविता स्फोटक आहेत. विद्रोही आहेत. अन्यायावर तुटून पडणाऱ्या आहेत. लढण्यासाठी आवाहन करणाऱ्या, स्फूर्ती देणाऱ्या आहेत. तर लढ्यात सहभागी न होणाऱ्यांचा उपहास करणाऱ्याही आहेत. शाहीर आत्मराम साळवे म्हणतात –

पँथरच्या तू जवाना।
धाव घे रणी वेड्या।
नाही तर ... भर हाती बांगड्या।

कवी दया हिवराळे म्हणतात, या शब्दांनी नामांतरासाठी भीम सैनिकांना चेतविण्याचे, नामांतरासाठी समूहाच्या समूहांना प्रेरणा देण्याचे कार्य शाहीर आत्माराम साळवे यांनी केले. 'विद्यापीठाला नाव द्या भीमाचे। नसता वाहतील पाट रक्तांचे।' अशा जहाल शब्दांनी इशारा देत आत्माराम साळवेंनी स्वत:स नामांतर लढ्यासाठी वाहून घेतले.

(नामांतर लढ्यातील लढवय्ये – दया हिवराळे पृ. १२०)

'जगण्याची सय' या कवितेत पद्माकर वामगाडगे यांनी समाजात पँथर का निर्माण होतात त्यावर प्रकाश टाकला आहे. 'हे सळसळत्या रक्तातील पोलादी स्नायुच्या तारुण्या। इतिहासाच्या पानांवरची धूळ वाढतच चालली' असे भान करुन देऊन कवी म्हणतो –

मूल्यांची जननी परिवर्तनाच्या आवर्तनात आली की,
अग्नीचा ओहळ मस्तिक स्फोट घडवून
पैदा करतात 'पँथर्स'
जगण्याची 'सम' साधण्यासाठी
सद्या वाटते आहे क्रांतीचा नायक मेला आहे.

ही शेवटची ओळ अस्वस्थ आणि अंतर्मुख करणारी आहे. शेवटी कवी म्हणतो –

तारुण्या वेध घे! सावध हो!
जगण्याची 'सम' साधण्यासाठी
(ग्लासनोस्त – कवी पद्माकर तामगाडगे पृ. १६)

आंबेडकरी कवी हा जागल्या असतो. चळवळी स्पंदने टिपणे हा त्यांच्या कवितेचा रचनाधर्म असतो. नामांतर लढ्यातील प्रवृत्तीचा वेध घेतांना ते लिहितात –

तुझे नाव देताना / घडायचे तेच घडले
ग्रंथांच्या गढूळ पाण्यात / पुरोगामीत्वही सडले
तुझे नाव देताना / घडायचे तेच घडले
टाळा माळांचे विक्राळ रुप / संत भूमीत उघडे पडले
(विमुक्त – दामोदर मोरे)

दीन दलितांच्या व्यथा – वेदनांना वाणी देणारे एक नाव म्हणजे पँथर. 'भाऊ पंचभाई हे गाव कुणाचे आहे ही त्यांची नामांतर लढ्यावरील कविता आपल्या काळजालाच हात घालते. कवि लिहितो –

धगधगता मराठवाडा / रक्ताच्या लिहितो गाथा
हे चित्र बोलक आहे / की आम्ही पोरके आता
काळीज तर त्यांचे होते / ते का कळवडले नाही
हे गाव कुणाचे आहे ? ते अजून कळले नाही.
(नामांतर कविता – दामोदर गोरे पृ. ३६)

विसंगतीवर मार्मिकपणे बोट ठेवणे, प्रहार करणे हे आंबेडकरी कवितेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य उषा सांवत यांच्या कवितेत पहावयास मिळते त्या म्हणतात –

भेदाभेद भ्रम अमंगळ, म्हणून त्यांनी कुटले टाळ
मात्र तुझ्या नावाचाही त्यांना वाटतो विटाळ
घटना देऊन तू त्यांना बनवलेस राजे
त्यांनीच तुला का म्हणावे 'पाय धर माझे'
(अस्मितादर्श - दिवाळी अंक १९८२)




आंबेडकरी चळवळीचे हे विविध घटक आहेत. अत्यंत ज्वलंत समस्या असेल त्यावेळी यातील बरेचसे घटक एकत्र येताना दिसतात. आंदोलनात सहभागी होताना दिसतात. संकट प्रसंगीच हे सर्व संघटीत रुपात दिसतात. एरवी त्यांच्यातील अंतर्गत द्वंद्व चव्हाट्यावर येताना दिसते. त्यांच्यामध्ये टोकदार मतभेद दिसतात.

जगातील सर्वांना चाळिशी नंतर चष्मा लागतो. पण भारतात मुलाला कळायला लागल्यापासूनच दुसरा एक चष्मा लागतो. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे तो असतो पण दिसत नाही. पण प्रसंग येताच त्याचा तीव्र प्रत्यय दुसऱ्याला येतो हा चष्मा म्हणजे जाती / पोटजातीचा चष्मा होय. याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे या चष्म्यातून आपल्या जातीचा माणूस गुणवंत नसला तरी प्लस दिसायला लागतो आणि दुसऱ्या जातीचा माणूस गुणवंत असला तरी मायनस दिसायला लागतो. हा चष्मा भारतात फारच कमी लोकांनी फेकून दिला आहे. आंबेडकरी चळवळीतील पंचाहत्तर टक्के लोकांनी हा चष्मा फेकून दिला आहे. पण चळवळीच्या काही घटकांमध्ये त्याचे प्रमाण सारखे नाही. परिणामी अंतर्गत घटकातील जातीय अहंकाराची टोकदार शिंगे एकमेंकाना रुततात त्यामुळे संघटन दुबळे होते. आम्ही यांच्यापेक्षा श्रेष्ठ, ही आमच्या खालची जात ही भावना आजही काही घटकात आहे. या चष्म्याचा परिणाम असा की या अंतर्गत घटकातील काहींना 'बाबासाहेब' आपले वाटत नाहीत. त्यामुळे ते बाबासाहेबांचे 'शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा' हे तत्वज्ञान स्वीकारत नाहीत. त्यामुळे त्यांच्यात स्वोद्धार आणि स्वावलंबनत्वी प्रेरणाच निर्माण होत नाही. शिक्षणाचे आणि विशेषतः उच्च शिक्षणाचे प्रमाण त्यामुळे कमी राहाते. आणि यातून 'बौद्धांनीच' जास्त सवलती घेतल्याचा आरोप प्रस्थापित करतात आणि या दुर्बल घटकात दूहीचे बी पेरतात आणि इतर घटक वास्तव लक्षात न घेता बौद्धांवर तसा आरोप करतात आणि बौद्धसुद्धा मग 'लढायला आम्ही आणि सवलती घ्यायला तुम्ही' असे म्हणतात. हे सर्व एकमेकांवरचे आरोप म्हणजे चळवळी असतात. दलिततातले अंतर्गत घटक एकत्र येऊ नयेत यासाठी प्रस्थापितांचे जाणीवपूर्वक

प्रयत्न असतात. त्यासाठी त्या-त्या घटकातील प्रमुखांना पदाचा तुकडा फेकला की झाले, पण आपल्या स्वार्थासाठी आपण समाजहिताचा बळी देतो याचे भान ठेवले जात नाही.

दलित चळवळीच्या अंतर्गत द्वंद्वाचे विश्लेषण करतांना डॉ. योगेन्द्र मेश्राम हे 'दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते' या पुस्तकात म्हणतात, दलितांतील ज्या काही गांधीमेड हरिजनांनी आंबेडकरांना अजूनपर्यंत स्वीकारलेले नाही. त्यातून 'आंबेडकर' कळणार कसे? आंबेडकरांचे धर्मांतर रूचणार कसे? हे लोक बुद्धिवादी असण्यापेक्षा देवधर्म रूढिवादीच राहिलेले आहेत. बुद्धीने विचार केल्याशिवाय बुद्ध आणि बुद्धाचा धम्म कळणार नाही. तो पारंपरिक देवादिकांच्या अद्‌भुत चमत्कारावर व अंधश्रद्धेवर पोसलेला ईश्वरी धर्म नाही,तर माणसाचा अखिल मानवजातच्या कल्यासाठी असलेला एक विशुद्ध मानवीय जीवनमार्ग आहे. हे केवळ देवधर्म भावनेच्या भोवऱ्यात अडकून पडणाऱ्यांना कळणार नाही. देवधर्माची झापडं दूर सारून सामाजिक-आर्थिक रूढीच्या 'शोषण चक्रातून' त्यांना बाहेर पडताच आलेले नाही. काही अपवाद वगळता तसा त्यांनी प्रयत्न केला आहे, असेही आढळत नाही. दलित, अस्पृश्यांमधील हे काही लोक (त्यात भंगी, चांभार, मांग जमाती चे लोक) खरे म्हणजे चपलीच्या खिळ्याप्रमाणे प्रस्थापित धर्मरूढीशी पक्के गाठले गेले आहेत. त्यांना ही रूढी परंपरा तोडण्याची गरजच भासलेली नाही, इतके ते पारंपरिक धर्मकर्मकांडाचे गुलाम होऊन बसले आहेत. वरून खालून दाब पडला की ते आता म्हणतात – बौद्ध समाजाने आम्हाला जवळ केले नाही. स्वत:पुढे गेले. आम्हाला दूरचे दूरचे ठेवले. वरील स्वत:पुढे गेले. आम्हाला दूरचे दूरच ठेवले वरील संदर्भ घेता या म्हणण्यात अर्थ उरत नाही. जुनी चाकोरी सोडून आणि नव्या विज्ञाननिष्ठा विचारांचा, नव्या जीवनमूल्यांचा बुद्धिवादाचा स्वीकार करून दलित, बौद्ध समाजाच्या जवळ येण्याचा आपण कधी प्रयत्न केला आहे काय? याचा अंतर्मुख होऊन त्यांनी विचार करायला पाहिजेत.

खर तर पूर्वाश्रमीच्या महार जातीचा, चर्मकार, मातंग जातीचा इतिहास लिहिण्याची गरज आहे. त्या-त्या जातींचा आजपर्यंत आंबेडकरी चळवळीत सहभाग कसा होता आणि आहे यावर प्रकाश पडला की समज-गैरसमज दूर होतात. या संदर्भात काही प्रयत्न होतांना दिसतात. कवी दया हिबराळे यांच्या नामांतर लढ्यातील लढवय्ये या ग्रंथाचा या संदर्भात उल्लेख केला पाहिजे. हिवराळे आपल्या मनोगतामध्ये म्हणतात, बौद्ध समाजाने नामांतर, लढ्याचे नेतृत्व केले आणि सातत्याने प्रचंड संख्येने लढाही दिला. त्यांच्या सोबत मराठी, कुणबी, ब्राह्मण, चांभार, मांग, भटके-विमुक्त व बहुजन समाजातील अनेक कार्यकर्ते सहभागी झाले. मोर्चे आंदोलने करीत पोलिसांच्या काठ्या खात तुरुंगवासही भोगला. नामांतराच्या चळवळीने महाराष्ट्रातील सर्वच जनतेला न्यायासाठी लढण्याची प्रेरणा मिळून सर्वच जाती समुहातील न्याय हक्काच्या चळवळी उभ्या राहिल्या. त्या आजही प्रखरपणे सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यासाठी कार्य करीत आहेत हे नामांतर लढ्याचे विशेष फलित होय.''

या पुस्तकात हिवराळे यांनी आंबेडकरी चळवळीतील मातंग बंधूच्या सहभागाचे त्याग आणि बलिदानाचे जे मुख्य दर्शन घडवले आहे. ते महत्त्वपूर्ण आहे. मुळातच हे पुस्तक चळवळीचा अभ्यास करणाऱ्यांनी जवळ ठेवण्यासारखे आहे.

प्रा. विठ्ठल शिंदे यांनी 'आंदोलनाची दिशा' या पुस्तकात मोची समाज मुक्तिपथाकडे असा एक अभ्यासपूर्ण लेख लिहिला आहे. त्यामध्ये त्यांनी मोची समाज सुधार संघटनेची माहिती दिली आहे. आंबेडकरी चळवळीतील त्यांच्या सहभागाचे दर्शनही घडवले आहे. देवरूखकर हे बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचे पहिलेच चर्मकार नगरसेवक मुंबई नगरपलिकेत होते. दलितांच्या संरक्षणासाठी (Black Best) एक लाख आंबेडकर सैन्य उभे करण्याची त्यांची कल्पना होती. मोची समाज सुधार संघटनेने १९८३ साली केलेल्या ठरावात म्हणते की (१) बाबासाहेब आंबेडकर आणि संत रोहिदास हे आमचे आदर्श आहेत, (२) मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे. (३) दलितां-दलितात बेटी व्यवहार होऊन अंतर्गत जातीयता तोडून टाकण्याचा निर्णय परिषद घेत आहे. आंबेडकरी चळवळीवर लिहितांनी सर्वच घटकांच्या प्रयत्नांची दखल घेणे आवश्यक आहे.

मराठी कवितेतील एक समर्थ आवाज म्हणजे सुरेश भट. आयुष्याच्या शेवटी शेवटी त्यांनी बौद्धधम्म स्वीकारला होता. नामांतर चळवळीत ते होते. नामांतर लख्याची स्पंदनं त्यांनी आपल्या कवितेतून टिपली आहेत. नामांतर या कवितेत ते म्हणतात-

राख सांभाळून ठेवा राख झालेल्या घरांची...
संपली नाही लढाई यार हो नामांतराची!

तर मराठवाड्यातील महाराष्ट्राचे नामवंत कवी फ. मुं. शिंदे नामांतरावरील देश, माणसं, मूल्य इत्यादी या कवितेत म्हणतात.

भजनातून आली । चिरकल भीती
टाळांची टाळांनी । रगडली नाती
रात्रीचे संत झाले । पहाटेस वैरी
अभंगच ओकले । बंदूकीच्या फैरी

(नामांतर कविता – सं. दामोदर मोरे पृ. २५)

फ. मु. शिंदे यांनी नामांतर आंदोलनात दलितांवर झालेल्या अत्याचाराचे सूचक पण भेदक दर्शन घडवले आहे. तर अत्याचाराने उद्वीग्न झालेले कवी चंद्रकांत वानखेडे 'डोळेच नसते तर' या कवितेत म्हणतात.

हे डोळेच नसते या खाचेत तर
बरे झाले असते
कुणी त्यांना माझ्या खोबणीतून
जुलुमाने काढून घेतले नसते
नि दिसले नसते / माझ्या आई बहिणींचे विवस्त्र देह
भरल्या चौकात लांडग्यांनी तोडून ठेवलेले.

(नामांतर कविता – सं. दामोदर मोरे पृ.४५)

आंबेडकरी कविताही आंबेडकरी समाजाच्या दुर्बलांच्या, दुःखीतांच्या समस्यांना भिडते. त्यांच्यावरील अन्यायाविरूद्ध आवाज उठवते. प्रस्थापितांच्या तिरक्या चालीची ती

कठोर चिकित्सा करते आणि चळवळीच्या कार्यकर्त्यांना एक नव भानही देते. कवी पाटीलबुवा आंधळे यांनी तर 'आचे तेथे काय आहे?' या कवितेतून सामाजिक परिस्थिवर झगझगीत प्रकाश टाकला आहे. ते म्हणतात-

हे गांधीनगर/ते नेहरुनगर/ते तिकडे शिवाजीनगर
इथली नगरे यांनी वाटून घेतली आहेत!
हा बापट रोड, तो टिळक रोड, इकडे कर्वे रोड
अरे,
इथले रस्तेही यांनीच वाटून घेतले आहेत.
पुढे ते लिहितात-
स्वातंत्र्याच्या समाधीवर । त्यांचीच नावे आहेत.
मग आमचे इथे काय आहे? आमच्या बापाचे नाव
एका दगडाच्या विद्यापीठाला द्यायचे म्हटले
तर आम्हाला चिणून चिणून मारले.
या लोकशाहीत आणि समाजवादात
घोषणा तेवढ्या आमच्यासाठी आहेत.
– – – – – –
मग आमचे इथे काय आहे.

आंबेडकरी चळवळीची कविता जशी बहिर्मुख आहे तशी अंतर्मुख होणारी देखील आहे. जेव्हा दुसऱ्याकडे एक बोट आपण दाखवतो तेव्हा बाकीची बोटे आपल्याकडे असतात. याचं भान तिला आहे. म्हणून ती एका बाजूला प्रस्थापितांच्या परंपरावादी प्रवृत्तीवर क्षेपणास्त्रासारखी तुटून पडते तर दुसऱ्या बाजूला अंतर्मुख होऊन चळवळीतल्या नेत्यावर, कार्यकर्त्यांवर देखील ती पहारा ठेवते. नेत्यांनी चांगले काम केले तर त्यांना शब्द सुमनांचे हारही ती घालते. पण समाजहिताला डावलून त्या नेत्याच्या कार्यकर्त्यांच्या वर्तनातून स्वार्थाचा दुर्गंध येत असेल तर ही कविता शब्दांना शस्त्र बनवून त्यांच्या समाजविघातक प्रवृत्तीवर कठोर प्रहार करतांना दिसते. त्यामुळे आंबेडकरी कविता ही चळवळीची वाहक आहे. ती चळवळीची चिंता करते, चिकित्सा करते आणि मूलगामी चिंतनही करते. म्हणून आंबेडकरी चळवळीत साहित्याचा आणि विशेषतः कवितेचा वाटा अत्यंत मोलाचा आहे.

### चळवळीवर कवितेचा पहारा

कवी हा सजग प्रहरी असतो. चळवळीच्या स्थिती – गतीचे स्पंदने तो कवितेतून टिपत असतो. चळवळीच्या दृष्टीने कवींची जागल्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कवी शोषराव पिराजी धांडे यांच्या कविता संग्रहाचं शीर्षकच चळवळीच्या दृष्टीने बोलकं आहे. 'रस्ता सोडून चालला कुठं?' या संग्रहातील 'पर्याय' या कवितेत ते लिहितात-

चळवळ मला दिसली
मायच्या फाटक्या लुगड्यागत
बापाच्या जीर्ण धोतरासारखी

पुढे ते लिहितात-

चळवळ झाली जीर्ण वस्त्रासारखी
ज्याला दांडही भरता येत नाही
आणि ठिगळही लावता येत नाही

आता वस्त्र बदलल्याशिवाय पर्याय नाही. चळवळी कार्यकर्त्यांच्या नेत्यांच्या त्यागावर उभ्या असतात. पण कार्यकर्ते, नेते आपले ध्येय विसरून जेव्हा भोगाच्या मागे लागतात तेव्हा चळवळ नुसती वळवळ राहते. ‘कार्यकर्त्यांच्या कविता‘ या कवितेत धांडे लिहीतात-

कायकर्ता
चळवळीत झिंदाबाद-मुर्दाबादची
घोषणा देत गेला
अन् नेता त्याच्याच भरवशावर
तगडा होत गेला.

शेषराव धांडे यांची ‘एकता‘ ही कविता आंबेडकरी चळवळीतील फुटीरतेवर मार्मिकपणे बोट ठेवणारी आहे. आर.पी.आय. चय्ा नेत्यांना अंतर्मुख करणारी आहे.

काल परवा माझ्या मुलाने
प्रश्न विचारला-
“पप्पा, तुमचा ‘आरपीआय‘ कोणता ?”
मी अवाक झालो म्हणालो बेटा का ?”
तो म्हणाला, ‘तुम्ही आपसात भांडता
एकमेकांविरोधी बोलता, असंच भांडल्याने
शत्रू केव्हाही हल्ला करू शकतो.
तुम्ही इयत्ता तिसरीच्या पाठ्यपुस्तकातील
‘एकीचे बळ‘ पाठ शिकला नाही वाटते ?‘‘

आंबेडकरी चळवळीतील नेत्या-कार्यकर्त्यांनी ‘एकीत जय आणि बेकीत क्षय‘ हे सूत्र लक्षात घ्यावे हेच त्या निरागस बालकाला या कवितेतून सूचवायचे आहे.

**आंबेडकरी चळवळ**

सामाजिक | आर्थिक | शैक्षणिक | राजकीय | साहित्यिक | धार्मिक | सांस्कृतिक

आंबेडकरी चळवळीच्या स्थितीगतीचा आलेख या सप्तअंगातून विचार केल्यासच साकारता येतो. उपरोक्त प्रत्येक घटकाची चिकित्सा आणि चिंतन केल्यास या चळवळीची

कोणत्या क्षेत्रात आघाडी आणि वरील कोणत्या क्षेत्रात पिछाडी आहे याचे चित्र साकार करता येऊ शकते. इथे विस्तारभयास्तव फक्त विचारांची दिशा दर्शविली आहे.

राजसत्ता ही अशी किल्ली आहे की, जिच्यामुळे कोणतेही कुलूप उघडले जाते. 'शासनकर्ती जमात बना' असा बाबासाहेबांचा संदेश होता पण महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीच्या नेत्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश या दोन राज्यातील दलित राजकीय आंदोलनातला फरक 'भीम की बेटी' या हिंदी कवितेत साकार झाला आहे. त्याचा मराठी अनुवाद असा-

काल पर्यंत ते
आम्हाला सीडी बनवून
बसत आलेत
सुवर्णमयी सत्तेच्या सिंहासनावर
भीम कन्येचा
महापराक्रम तर पहा
त्यांना सीडी बनवून
ती बसत आली सत्तेच्या सिंहासनावर

(नीलें शब्दों की छाया में-दामोदर मोरे,
सौरभ प्रकाशन, दिल्ली-पृ. ७२)

'जात' हे समाजातील धगधगते वास्तव आहे. ज्यांना जातीचे काटे रुततात, बोचतात, रक्त बंबाळ करतात. त्यांना ती नको आहे. पण ज्यांना या जाती-जातीमुळे सत्ता, संपत्ती, सन्मान मिळतो. स्वार्थ साधला जातो. श्रेष्ठत्वाचा अहंकार कुरवाळला जातो. आपल्यापेक्षा कुणीतरी खालच्या दर्जाचा आहे याचे ज्यांना समाधार वाटते त्यांना 'जात' जाणे नको आहे. जातीव्यवस्था आणि वेगवेगळ्या पोशाखात वावरणारी अस्पृश्यता नष्ट करणें हे आंबेडकरी चळवळी पुढचे आव्हान आहे. त्यासाठी या चळवळीतीलअंतर्धटकात जी जातीय अहंकारांची धारदार शिंगे आहेत ती मोडावी लागतील. आणि संघटीत होऊन जाती अंताचा कार्यक्रम हाती घ्यावा लागेल. माणूस म्हणून माणसाने माणसाचा सन्मान केला पाहिजे. 'एक माणूस एक मूल्य' यासाठी आंबेडकरी चळवळीचा लढा आहे. स्वतःच्या जातीत लग्न करणार नाही अशी प्रतिज्ञा करण्याची गरज आहे किंवा स्वतःच्या जातीत लग्न करण्यावर बंदी आणणारा कायदा अस्तित्वात आला तरच जाती व्यवस्था नष्ट होईल. दलित चळवळीच्या धुरीनांनी हे लक्षात घेतले पाहिजे की मजबूत संघटनेशिवाय संघर्ष दुबळा ठरतो. चळवळी पुढे ठोस स्थानात्मक कार्यक्रम नसेल तर चळवळ वळवळ ठरते.

## नागरिकांसाठी पंचशील

सामाजिक स्वास्थ्य निर्माण करावयाचे असेल, समताधिष्ठीत समाजाची निर्मिती करायची असेल, दलितांची दलिततत्वातून सुटका करून त्यांना मनुष्यत्वाकडे घेऊन जावयाचे असेल तर प्रत्येक नागरीकाने पुढील पंचशीलाचे पालन केले पाहिजे.

डिसेंबर २०१० मध्ये ठाणे येथे संपन्न झालेल्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अंतर्गत जे राज्यस्तरीय विद्यार्थी साहित्य संमेलन झाले होते. त्या संमेलनाचा प्रमुख म्हणून विद्यार्थ्यांना मी पाच प्रतिज्ञा दिल्या होत्या. त्या सर्वांनाच आवडल्या. हेच ते पंचशील होय.

१) देशाच्या आणि समाजाच्या हितासाठी मी समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचे काटेकोरपणे आणि प्रामाणिकपणे पालन करेन अशी मी प्रतिज्ञा करतो.

२) मराठी भाषा ज्ञानभाषा व्हावी यासाठी आणि मराठी समाज, साहित्य आणि संस्कृती यांच्या अभिवृद्धीसाठी मी सजगपणे सतत प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा करतो.

३) शारीरिक, मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या मी कुणाचाही गुलाम होणार नाही आणि मानवी मूल्यांचा मी पहारेकरी असल्याने कुणालाही गुलाम न करता, कुणाला तरी गुलाम करणाऱ्यांना रोखेन अशी मी प्रतिज्ञा करतो.

४) मी कुणावरही कोणत्याही स्वरूपाचा अन्याय किंवा कुणाचेही शोषण करणार नाही आणि माझे कुणी शोषण करण्याचा किंवा माझ्यावर अन्याय करण्याचा प्रयत्न झाल्यास मी तो सहन करणार नाही अशी मी प्रतिज्ञा करतो.

५) मी देशभक्त असल्याने माझ्या लाडक्या मातृभूमीवर आणि मी राष्ट्रभक्त असल्याने मातृभूमीवर राहणाऱ्या सर्व स्तरातील सर्व मानवी समुहांवर सारखेच प्रेम करण्याची आणि त्यांच्याशी भाऊ आणि बहीण म्हणून वागून त्यांचे रक्षण करण्याची मी प्रतिज्ञा करतो.

(स्पंदने युवा मनाची- प्रा. दामोदर मोरे,
व्यास क्रिएशन्स, पृ. २८).

❖❖❖❖

संदर्भग्रंथ :


१) नलिनी पंडित; *जातिवाद आणि वर्गवाद,* साधना प्रकाशन, पुणे, ३०, प्र.आ., १९६५.

२) नलिनी पंडित; *स्वातंत्र्योत्तरकाळातील दलितांचा प्रश्न,* साधना प्रकाशन, पुणे, दु.आ., १९७२.

३) सुमंत यशवंत व पुंडे दत्तात्रेय; *महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषय विचार,* प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९८८.

४) गंगाधर पानतावणे; *दलित वैचारिक वाङ्मय,* मुंबई विद्यापीठ, मुंबई, प्र.आ., मे, १९९५.

५) वैद्य प्रभाकर; *डॉ. आंबेडकर आणि त्यांचा धम्म,* शलाका प्रकाशन, मुंबई, प्र.आ., १९८१.

६) केशव मेश्राम व उषा मा. देशमुख; *दलित साहित्याची स्थितीगती,* मुंबई विद्यापीठ, मराठी विभाग, मुंबई, प्र.आ., १९९७.

७) रामचंद्र क्षीरसागर; *दलितांचा जाहीरनामा,* आनंद प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ., १९७८.

८) बाबुराव बागुल; *दलित साहित्य आजचे क्रांतिविज्ञान,* बुद्धिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर.

९) रावसाहेब कसबे; *आंबेडकर आणि मार्क्स,* सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९८५.

१०) जनार्दन वाघमारे; *समाज परिवर्तनाच्या दिशा,* साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ., १९९५.

११) प्रल्हाद जी. लुलेकर; *भंजनाचे भंजन,* शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ., मे, २००९.

१२) एस. एम. मायकेल (संपा.) व विद्या भाके (अनु.); *आधुनिक भारतातील दलित : दृष्टिकोन आणि मूल्ये,* डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्र.आ., २००८.

१३) घनश्याम शहा (संपा.); *दलितांची अस्मिता आणि राजकारण,* डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्र.आ., २००८.

१४) पोपट सातपुते; भास्कर शेळके, मिलिंद कसबे (संपा.); *चळवळ आणि साहित्य,* मा. रा. लामखडे गौरवग्रंथ, शब्दालय प्रकाशन; श्रीरामपूर, प्र.आ., २००९.

१५) कृष्णा किरवले; *दलित चळवळ आणि साहित्य,* प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९९६.

१६) योगेन्द्र मेश्राम; *दलित साहित्य उद्‌गम आणि विकास,* श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर, प्र.आ., १९९८.

१७) सी. टी. कांबळे व टी. एस. पवळे; *भारतीय सामाजिक चळवळीची रूपरेषा,* क्रिएटिव्ह पब्लिकेशन, नांदेड, प्र.आ., २०१०.

१८) जगन कराडे; *जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्र.आ., २००८.

१९) भालचंद्र फडके; *दलित साहित्य वेदना आणि विद्रोह,*

२०) रा. ग. जाधव; *निळी क्षितिजे,*

२१) शंकरराव खरात; *दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवृत्ती,*

२२) दत्ता भगत; *दलित साहित्य दिशा आणि दिशांतर,*

२३) दत्ता भगत; *वाङ्मयप्रवाह–दलित साहित्य,* यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.


❖❖❖❖